**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर/अमरावती यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २४९७/२००७**

**१) श्री पिताम्बर हिरभाऊ वडेरा,**
**९३, पल्लोटी नगर, के.जी.एन. सोसायटी,**
**गोरेवाडा रिंग रोड, नागपूर- ४४००१३.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी,**
**अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) कार्यालय,**
**नागपूर शहर.** **उत्तरवादी क्रं.१**

**३) जन माहिती अधिकारी तथा सहा.पोलीस आयुक्त,**
**अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) कार्यालय,**
**नागपूर शहर.** **उत्तरवादी क्रं.२**

**( आदेश पारित दिनांक २.१.२००९ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १०.१०.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या अपीलाची सुनावणी आज दिनांक २.१.२००९ रोजी ठेवण्यात आली. अपीलकर्ता श्री पिताम्बर हरिभाऊ वडेरा हे व्यक्तीगत हजर आहेत. उत्तरवादी क्रं.१, जन माहिती अधिकारी तथा सहा.पोलीस आयुक्त, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे तर्फे श्री एन.एस.पाटील, पोलीस उपनिरीक्षक हजर आहेत. उत्तरवादी क्रं.२ तथा प्रथम अपीलीय अधिकारी अपर पो. आयुक्त (गुन्हे) यांच्या तर्फे श्री एस.बी. जाधव, पोलीस उपनिरीक्षक हजर आहेत. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली.

२. अपीलात मागितलेली माहिती अपीलार्थी अर्जदार यांना मिळालेली आहे. जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सोबत जे मुळ दस्तऐवज (original record)

आणलेले आहेत, ते रेकार्ड अपीलार्थी अर्जदार यांना, दिनांक ९.८.२००७ चे पत्रान्वये रुपये ५४/- भरुन माहिती पुरविण्याबध्दल सूचना केली होती. त्याप्रमाणे अपीलार्थी अर्जदार यांनी ५४/- रुपये भरुन त्या सर्व रेकार्डची पाहाणी केली व त्यांना पाहिजे असलेल्या कागदपत्राच्या प्रती घेतलेल्या आहेत.

३. त्यानंतर अपीलार्थी अर्जदार यांचे म्हणणे असे आहे की, दिनांक १२.३.२००७ मध्ये उप प्रबंधक ( Dy.Registrar) उच्च न्यायालय खंडपीठ, नागपूर यांचे पत्र दाखविले. तसेच या पत्राची मुळ प्रत (original copy) प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा आयोगास दाखविली. त्या पत्राची प्रत सुध्दा अपीलार्थी अर्जदार यांना मिळालेली आहे. त्यामुळे हवी असलेली संपूर्ण माहिती अर्जदारास मिळालेली आहे. त्यांची दूसरी तक्रार अशी आहे की, चौकशीचा आदेश होऊनही हायकोर्टाच्या आदेशानुसार जी चौकशी करावयाची होती, त्या चौकशीच्या संबंधात अधिका-यांनी काहीही कार्यवाही केलेली नाही. त्यावर उत्तरवादी यांचे म्हणणे असे आहे की, चौकशी अहवाल प्राप्त झालेला आहे व त्याची सुध्दा प्रत अर्जदारास दिली. परंतु, त्यांचे म्हणणे असे आहे की, जी चौकशी झाली, त्यानुसार पुढे काहीही कारवाई केली नाही. त्याबाबतीत माहितीच्या अधिकाराखाली कार्यवाही कां केली नाही, याबाबत विचारणा करता येत नाही. त्यासाठी अपीलकर्ता यांना योग्य त्या अधिका-यांकडे किंवा न्यायालयाकडे जावून त्याबाबत दाद मागता येते. कार्यवाही कां केली नाही, या बाबतीत आयोगास विचारणा करता येत नाही. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ या कायद्यान्वये प्रकरणामध्ये जन माहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे जेवढी कागदपत्रे उपलब्ध आहेत, तेवढीच अर्जदारास मागता येते. जी माहिती लेखी स्वरुपात (on black & white paper) कागदावर उपलब्ध नाहीत,

ती माहिती मागता येत नाही. व अशी माहिती उपलब्ध नसल्यास जन माहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी तसे अर्जदारास लेखी कळविणे क्रमप्राप्त ठरते. अर्जदाराचे म्हणणे असे आहे की, चौकशी नंतर काहीही कारवाई झाली नाही. चौकशी अहवालाचा शेवटचा परिच्छेद बघितला असता त्यामध्ये हे प्रकरण गुंतागुंतीचे असल्यामुळे ते दिवाणी कोर्टात सुरु असून शेवटच्या टप्प्यावर आहे. व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, हे प्रकरण अजूनही प्रलंबित आहे. त्यामुळे हया संबंधात काहीही कागदपत्रे उपलब्ध नसल्यामुळे ती अर्जदारास देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

४. वरील सर्व बाबींचा विचारता करता अपीलकर्ता अर्जदार यांना मागितलेली सर्व कागदपत्रे मिळालेली असल्यामुळे गुणवत्तेच्या आधारावर अपीलाचा निर्णय देण्याची गरज भासत नाही. त्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांचे सदरचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २.१.२००९**

**( भास्कर पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग खंडपीठ**
**नागपूर/अमरावती**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर/अमरावती यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २०८३/२००७**

**१) श्री विठठलदास बुलीदानजी बाहेती,**
**नेहरु मैदान, धामणगांव रेल्वे, ता.धामणगांव,**
**जिल्हा अमरावती-४४४७०९.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,**
**चांदूर रेल्वे, ता. चांदूर रेल्वे, जिल्हा अमरावती.** **उत्तरवादी क्रं.१**

**३) जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार,**
**धामणगांव रेल्वे, जिल्हा अमरावती.** **उत्तरवादी क्रं.२**

**( अंतरिम आदेश पारित दिनांक २.१.२००९ )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १३.३.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता श्री विठठलदास बुलीदानजी बाहेती हे व्यक्तीगत हजर आहेत. उत्तरवादी क्रं.१ तथा जन माहिती अधिकारी(विद्यमान) तहसिलदार श्री धुर्वे हजर आहेत. उत्तरवादी क्रं.२ तथा प्रथम अपीलीय अधिकारी तथा विद्यमान उपविभागीय अधिकारी श्री पवार हजर आहेत. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता अर्जदार यांना एक ते दीड वर्ष उशिराने माहिती पुरविण्यात आल्याचे दिसून येते. तेव्हा जन माहिती अधिकारी श्री एस.एस.पखाले, नायब तहसिलदार हे होते. व त्यावेळी तहसिलदार श्री झलके हे होते. त्यामुळे माहिती पुरविण्यासाठी झालेल्या विलंबाबध्दल विद्यमान जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी काहीही सांगु शकत नाही. त्यामुळे झालेल्या विलंबाबध्दल तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना विचारणा करणे आवश्यक वाटते. तसेच त्यांचे स्पष्टीकरण असल्याशिवाय त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करणे योग्य होणार नाही. तत्कालीन जन माहिती अधिकारी हे सद्या अकोला येथे जिल्हाधिकारी कार्यालयात कार्यरत असल्याचे उत्तरवादी यांनी सांगितले.

त्याकरीता जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला यांचे मार्फत श्री एस.एस.पखाले, नायब तहसिलदार तथा तत्कालीन जन माहिती अधिकारी व श्री झलके, तत्कालीन तहसिलदार यांना सुनावणीची नोटीस पाठवून पुढील तारखेवर सुनावणीसाठी, माहिती देण्यासाठी झालेल्या विलंबाबाबत त्यांच्या स्पष्टीकरणासह हजर राहाण्याबध्दल कळविणे आवश्यक आहे. त्याकरीता सदरच्या अपीलाची अंतिम सुनावणीची पुढील तारीख ५.२.२००९ देण्यात येत आहे. सदर तारखेला आज हजर असलेले अपीलकर्ता, उत्तरवादी व वर उल्लेख केल्याप्रमाणे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीसाठी राज्य माहिती आयुक्त खंडपीठ कार्यालय, अमरावती, भातकुली तहसिल कार्यालय परिसर, शासकिय विश्रामगृहाजवळ, अमरावती येथे १०.३० वाजता हजर राहावे.

## आदेश

१) श्री एस.एस.पखाले, नायब तहसिलदार तथा तत्कालीन जन माहिती अधिकारी आणि श्री झलके, तत्कालीन तहसिलदार यांना जिल्हाधिकारी, अकोला यांचे मार्फत रितसर सुनावणीची नोटीस काढून सुनावणीसाठी त्यांच्या स्पष्टीकरणासह हजर राहाण्यास कळवावे.

२) निर्णयाची प्रत अपीलकर्ता, उत्तरवादी यांना पाठविण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २.१.२००९**

**( भास्कर पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग खंडपीठ**
**नागपूर/अमरावती**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर/अमरावती यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २०८४/२००७**

**१) श्री विठ्ठलदास बुलीदानजी बाहेती,**
**नेहरु मैदान, धामणगांव रेल्वे, ता.धामणगांव,**
**जिल्हा अमरावती-४४४७०९. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा.प्र.),**
**विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती. उत्तरवादी क्रं.१**

**३) जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी,**
**नगर परिषद धामणगांव रेल्वे, ता. धामणगांव रेल्वे,**
**जिल्हा अमरावती. उत्तरवादी क्रं.२**

**( अंतरिम आदेश पारित दिनांक २.१.२००९ )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १३.३.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता श्री विठ्ठलदास बुलीदानजी बाहेती हे व्यक्तीगत हजर आहेत. उत्तरवादी क्रं.१ तथा जन माहिती अधिकारी(विद्यमान) मुख्याधिकारी श्री एस.आर.डागमवार हजर आहेत. उत्तरवादी क्रं.२ तथा प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री एस.एम. बलखंडे, नायब तहसिलदार हजर आहेत. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता अर्जदार यांना उशिराने व अपूर्ण माहिती पुरविण्यात आल्याचे दिसून येते. तेव्हा जन माहिती अधिकारी श्री पी.डी. काळकर, (तत्कालीन मुख्याधिकारी), सद्या कार्यरत नायब तहसिलदार भातकुली तहसिल, कॅम्प, अमरावती हे होते. त्यामुळे माहिती पुरविण्यासाठी झालेल्या विलंबाबध्दल व अपूरी माहिती दिल्याबध्दल विद्यमान जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी काहीही सांगु शकत नाही. त्यामुळे झालेल्या

विलंबाबध्दल तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना विचारणा करणे आवश्यक वाटते. तसेच त्यांचे स्पष्टीकरण असल्याशिवाय त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करणे योग्य होणार नाही. तत्कालीन जन माहिती अधिकारी हे सद्या नायब तहसिलदार, भातकुली तहसिल, कॅम्प, अमरावती येथे कार्यरत असल्याचे उत्तरवादी यांनी सांगितले. त्याकरीता तहसिलदार कार्यालय, भातकुली यांचे मार्फत श्री पी.डी. काळकर, नायब तहसिलदार तथा तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना सुनावणीची नोटीस पाठवून पुढील तारखेवर सुनावणीसाठी, माहिती देण्यासाठी झालेल्या विलंबाबाबत व अपूरी माहिती दिल्याबाबत त्यांच्या स्पष्टीकरणासह हजर राहाण्याबध्दल कळविणे आवश्यक आहे. त्याकरीता सदरच्या अपीलाची अंतिम सुनावणीची पुढील तारीख ५.२.२००९ देण्यात येत आहे. सदर तारखेला आज हजर असलेले अपीलकर्ता, उत्तरवादी व वर उल्लेख केल्याप्रमाणे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीसाठी राज्य माहिती आयुक्त खंडपीठ कार्यालय, अमरावती, भातकुली तहसिल कार्यालय परिसर, शासकिय विश्रामगृहाजवळ, अमरावती येथे १०.३० वाजता हजर राहावे.

## आदेश

१) श्री पी.डी. काळकर, नायब तहसिलदार तथा तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना तहसिलदार, भातकुली जि. अमरावती यांचे मार्फत रितसर सुनावणीची नोटीस काढून सुनावणीसाठी त्यांच्या स्पष्टीकरणासह हजर राहाण्यास कळवावे.

२) निर्णयाची प्रत अपीलकर्ता, उत्तरवादी यांना पाठविण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २.१.२००९**

**( भास्कर पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग खंडपीठ**
**नागपूर/अमरावती**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर/अमरावती यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २५१७/२००७**

**१) श्री उदयभान दमडूजी मालाधारी,**
**प्लॅाट क्रं.४४, रोड क्रं.१०, विश्वकर्मानगर,**
**मेडीकल कॅालेजचे मागे, नागपूर -२७. — अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक,**
**विभागीय कार्यालय, म.रा.मार्ग परिवहन महामंडळ,**
**रेल्वे स्टेशनजवळ, नागपूर. — उत्तरवादी क्रं.१**

**३) जन माहिती अधिकारी तथा विभागीय वाहतुक अधिकारी,**
**म.रा.मार्ग परिवहन महामंडळ, विभागीय कार्यालय,**
**रेल्वे स्टेशन जवळ, नागपूर. — उत्तरवादी क्रं.२**

**( आदेश पारित दिनांक ५.१.२००९ )**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक २४.१०.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता श्री उदयभान दमडुजी मालाधारी हे व्यक्तीगत हजर आहेत. उत्तरवादी क्रं.१ तथा जन माहिती अधिकारी, विभागीय वाहतुक अधिकारी श्री व्ही.टी. गव्हाळे हजर आहेत. उत्तरवादी क्रं.२ तथा प्रथम अपीलीय अधिकारी, विभाग नियंत्रक, श्री एस.एम. आंबाडेकर हजर आहेत. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता अर्जदार यांना आवश्यक असलेल्या माहितीचे जोडपत्र-अ नुसार विवरण दिलेले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार त्यांना हवी असलेली सर्व माहिती मिळालेली आहे व त्यामुळे त्यांना सदरचे अपील मागे घ्यावयाचे आहे. त्यांनी तशी आयोगाकडे लेखी विनंती केली आहे. अपीलकर्ता यांनी त्यांचे अपील मागे घेत असल्याबध्दल आयोगाकडे केलेली लेखी विनंती मान्य करण्यात येवून सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांचे सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

**नागपूर**
**दिनांक ५.१.२००९**

**( भास्कर पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग खंडपीठ**
**नागपूर/अमरावती**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर/अमरावती यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २५१६/२००७**

**१) श्री संजय मनोहरराव दहिकर,**
**कोष्टीपूरा, सिताबर्डी, नागपूर. — अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपनिगम आयुक्त,**
**महानगरपालिका, नागपूर. — उत्तरवादी क्रं.१**

**३) जन माहिती अधिकारी तथा प्रमुख लेखा व वित्त अधिकारी,**
**महानगरपालिका, नागपूर. — उत्तरवादी क्रं.२**

**( अंतरिम आदेश पारित दिनांक ५.१.२००९ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २४.१०.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता श्री संजय मनाहरराव दहिकर हे व्यक्तीगत हजर आहेत. उत्तरवादी क्रं. १ तथा जन माहिती अधिकारी तथा प्रमुख लेखा व वित्त अधिकारी श्री गुणवंत ना. शेळके हे हजर आहेत. उत्तरवादी क्रं.२ तथा प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपनिगम आयुक्त श्री पी.आर. बोखड, हजर आहेत. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. म्हणणे एकूण घेतले.

२. अपीलकर्ता अर्जदार यांनी त्यांच्या माहितीचा अर्ज दिनांक १४.११.२००६ मध्ये आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन यामध्ये दर्शविल्याप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. त्याप्रमाणे अर्जदारास माहिती मिळालेली नाही. त्यांना माहितीचे शेडयुल देण्यात आले आहेत. परंतु, त्यांना वित्त व लेखा विभागाकडून राजस्व सहाय्यक (Revenue Assistant) या पदाचे वेतन सुधारण्यासाठी झालेला पत्रव्यवहार तसेच त्यावर निगम आयुक्त (Municipal Commissioner) यांचे दिनांक २१.११.२००५ चे मंजूरी आदेशाप्रमाणे दिनांक १९.१.२९९६ रोजी सुधारित वेतन (revised pay scale) लागू करण्यात आले, इत्यादि संबंधात प्रमाणित प्रती त्यांना मिळालेल्या नाहीत, असे त्यांचे म्हणणे आहे.

३. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे असे म्हणणे आहे की, ते नव्याने रुजू झालेले आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जो निर्णय दिलेला आहे त्यामध्ये सुध्दा अपीलार्थीने हवी असलेली माहितीसंबंधाने योग्य माहिती अधिकारी यांचा शोध घेवून त्या संबधीत अधिका-यांकडून माहिती

घ्यावी असे आदेश दिलेले आहे. जन माहिती अधिकारी हे हजर असून त्यांचे सुध्दा असे म्हणणे आहे की, अर्जदारास हवी असलेली माहिती ही दूस-या विभागाशी संबंधीत आहे व ती उपलब्ध करुन देण्याबाबत निगम अधीक्षक,(स्थापना विभाग) व कर अधिक्षक, महानगरपालिका, नागपूर यांना तशा प्रकारे लेखी पत्र दिनांक ७.१२.२००६ अन्वये कळविले आहे. परंतु, हया संबंधी कर अधीक्षक यांनी पत्राद्वारे असे कळविले आहे की, या विभागात ही माहिती उपलब्ध नाही. हया बाबत निगम अधीक्षक, सामान्य प्रशासन विभाग यांचेशी पत्रव्यवहार करावा. त्यामुळे ही माहिती मिळविण्यासाठी १५ दिवसांचा अवधी लागेल, असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. त्यानुसार अपीलार्थी अर्जदार, जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी मिळून माहिती असलेल्या योग्य त्या विभागात माहितीचा शोध घेवून माहिती उपलब्ध करुन घेण्यात यावी.

४. वरील बाबींचा विचार करुन सदरच्या अपीलाची अंतिम सुनावणीची तारीख १९.१.२००९ रोजी सकाळी १०.३० वाजता ठेवावी. यासंबंधी निगम अधीक्षक,(सामान्य प्रशासन), व कर अधीक्षक, महानगरपालिका, नागपूर यांना सुध्दा तशा प्रकारची नोटीस काढून त्यात अर्जदारास हव्या असलेल्या माहितीचा उल्लेख द्यावा व वर नमूद केल्याप्रमाणे अपीलाच्या सुनावणीसाठी त्यांना सुध्दा माहितीसह/रेकार्डसह हजर राहाण्यास कळवावे.

## आदेश

१) सदरच्या अपीलाची अंतिम सुनावणीची तारीख १९.१.२००९ रोजी सकाळी १०.३० वाजता देण्यात यावी. त्यात अर्जदाराने मागितलेल्या माहितीचा उल्लेख करावा. व सुनावणीसाठी आवश्यक दस्तऐवजासह उपस्थित राहाण्याकरीता निगम अधीक्षक (सामान्य प्रशासन), कर अधीक्षक, महानगरपालिका, नागपूर यांना हजर राहाण्याबाबत कळविण्यात यावे.

२) आदेशाची प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ५.१.२००९**

**( भास्कर पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग खंडपीठ**
**नागपूर/अमरावती**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर/अमरावती यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २५२४/२००७**
**अपील क्रमांक २५२५/२००७**

**१) श्री संघपाल वासुदेव गौरखेडे,**
**न्यू खलाशी लाईन, कामठी, ता.कामठी, जि.नागपूर** **अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप आयुक्त,**
**नगरपालिका प्रशासन, नागपूर.** **उत्तरवादी क्रं.१**

**३) जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी,**
**नगर परिषद कार्यालय, कामठी, ता. कामठी, जि.नागपूर** **उत्तरवादी क्रं.२**

**( आदेश पारित दिनांक ५.१.२००९ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १८.१०.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता श्री संघपाल वासुदेव गौरखेडे हे व्यक्तीगत हजर आहेत. उत्तरवादी क्रं.१ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, कामठी श्री सुरेश बोरकर हजर आहेत. उत्तरवादी क्रं.२ तथा प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री बी.एस. शिंगणे, सहाय्यक प्रादेशिक संचालक, नगर पालिका प्रशासन हे हजर आहेत. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज ५.१.२००९ रोजी घेण्यात आली. त्यांचे म्हणणे ऐकूण घेतले.

२. अपीलकर्ता अर्जदार यांनी मागितलेल्या माहितीचे अनुषंगाने दिनांक ९.८.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपीलकर्ता यांना माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्याचे कळविण्यात आले आहे. व सदरच्या पत्रावर माहिती घेण्यास नकार केला अशी नोंद आहे. त्यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, अशा प्रकारचे कोणतेही पत्र घेवून त्यांचेकडे कोणीही आले नाही.

३. अपीलकर्ता अर्जदार यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपआयुक्त, नगरपालिका प्रशासन यांचेकडे प्रथम अपील केले आहे. त्यानुसार दिनांक ३.९.२००७ व १४.९.२००७ रोजी सुनावणी घेण्यात आली. त्या सुनावणीमध्ये अपीलकर्ता व प्रतिवादी, नगर परिषद, कामठी श्री बोरकर, मुख्याधिकारी हे व्यक्तीशः उपस्थित होते. तेथे सुध्दा अपीलकर्ता यांनी अशी तक्रार केली की, आतापर्यंत त्यांना माहिती पुरविण्यात आलेली नाही. प्रतिवादींनी त्यावर असे सांगितले की, अपीलकर्ता यांना मागितलेली माहिती उपलब्ध नसल्यामुळे पुरविता आली नाही. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १७ सप्टेंबर, २००७ रोजी देण्यात आला असून त्यात असे म्हटले आहे की, सदर माहिती उपलब्ध नाही म्हणून पुरविता आली नाही. परंतु, माहिती उपलब्ध नसल्याबध्दल अपीलकर्ता यांना कळविण्यात आले नाही, असे प्रतिवादींनी मान्य केले आहे.

४. वरील सर्व कागदपत्रे बघीतल्यानंतर अपीलकर्ता यांना आवश्यक असलेली माहिती त्यांनी दूस-या संबंधीत विभागाकडे/अधिका-यांकडे रितसर अर्ज करुन घेणे क्रमप्राप्त ठरते. करीता त्यांनी तशा प्रकारचा अर्ज संबंधीत अधिकारी यांचेकडे करावा. तसेच त्यांचे दूसरे म्हणणे असे आहे की, नगर पालीका प्रशासनाने श्री सडबाजी श्रावण मेश्राम यांच्या घराच्या बाजूला गल्लीमध्ये नाली बांधण्याचा प्रयत्न केला होता. परंतु, त्यांनी तसे करु दिले नाही व कामठी येथे दिवाणी न्यायालयात त्यासंबंधात दावा दाखल करण्यात आला व नगर पालिकेला नाली बांधण्यापासून परावृत्त केले. व त्यामुळे नगरपरिषदेचे सदस्य/अधिकारी मिळून दूस-या अनाधिकृत लेआऊट मध्ये नालीचे बांधकाम केले. त्यावर जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, नाली बांधकामासबंधी नगरपरिषदेने काहीही खर्च केलेला नाही. त्यामुळे त्यांचेकडे हयासंबंधी कोणतीही माहिती उपलब्ध नाही.

५. वरील सर्व बाबींचा विचार करुन अपीलकर्ता अर्जदार यांना योग्य त्या अधिका-यांकडे तपशिलवार अर्ज करुन माहिती मिळविणे गरजेचे आहे. अर्जदाराने मागितलेली माहिती उत्तरवादी यांचेकडे उपलब्ध नसल्यामुळे त्यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे. अपीलकर्ता यांना योग्य त्या विभागाकडे अर्ज करुन त्यांना हवी असलेली माहिती मागणी करण्याची मुभा देण्यात येत आहे.

६. **अपील क्रमांक २५२५/२००७** मध्ये सुध्दा अपीलकर्ता यांनी वरीलप्रमाणेच माहिती मागितलेली असल्यामुळे व त्यामध्येही वरीलप्रमाणे उत्तरवादी यांचा खुलासा असल्यामुळे पुन्हा निर्णय देण्याची आवश्यकता भासत नाही. अपील क्रमांक २५२५/२००७ हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक २५२४/२००७ व अपील क्रमांक २५२५/२००७ खारीज करण्यात येत आहे.

२) सदरच्या निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ५.१.२००९**

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग खंडपीठ**
**नागपूर/अमरावती**

January,०९Balki

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर/अमरावती यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २५२८/२००७**

**१) श्री संजय विठठलराव सत्येकार,
डॉ.आंबेडकर चौक, जे.एन.रोड कन्हान,
ता. पारशिवनी, जिल्हा नागपूर. — अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,
सिव्हील लाईन्स, नागपूर. — उत्तरवादी क्रं.१**

**३) जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी,
रामटेक, ता.रामटेक, जिल्हा नागपूर. — उत्तरवादी क्रं.२**

**( आदेश पारित दिनांक ६.१.२००९ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २९.९.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या अपीलाची आज दिनांक ६.१.२००९ रोजी सुनावणी ठेवण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहेत. उत्तरवादी क्रं.१ तथा जन माहिती अधिकारी डॉ. नलीनी भोयर, उपविभागीय अधिकारी, रामटेक हजर आहेत. उत्तरवादी क्रं.२ तथा प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने श्रीमती अर्जना कोचरे हजर आहेत. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. सुनावणीचे वेळी असे लक्षात आले की, अर्जदारानी आवश्यक असलेली माहिती त्यांच्या दिनांक २९.९.२००७ च्या अर्जद्वारे उत्तरवादी यांचेकडे मागितलेली दिसून येते. उपविभागीय कृषि अधिकारी, रामटेक यांनी दिनांक १३.७.२००७ व २४.१२.२००८ रोजी अर्जदाराला पत्र देवून माहितीसाठी आवश्यक असलेले रुपये ७०/- चा भरणा करावा माहिती घेवून जावी. परंतु आपण माहितीच्या छायांकित प्रतीसाठी आवश्यक रक्कम रुपये ७०/- या कार्यालयात भरलेली नाही किंचा चालनची प्रत सुध्दा सादर केलेली नाही,असे कळविलेले आहे. तरी तशा प्रकारे पैशाचा भरणा करुन चालनची प्रत सादर करुन माहिती घेवून जावी अशा सूचना दिल्याचे दिसून येते. प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या सांगण्यावरुन, अर्जदार स्वत: दिनांक १.८.२००७ रोजी प्रत्यक्ष कार्यालयात आले होते, त्यावेळी सुध्दा त्यांना हवी असलेली माहिती देण्याबध्दल त्यांनी तयारी

दर्शविली व पैसे भरण्याबध्दल कळविण्यात आले. तरी सुध्दा त्यांनी माहिती घेण्यासाठी किंवा पैसे भरण्यासाठी कुठल्याही प्रकारची तयारी दाखविली नाही असे दिसते. तसेच श्री एस.एन. कोरडे, कार्यालयीन अधीक्षक, उपविभागीय अधिकारी कार्यालय, रामटेक हे स्वत: दिनांक २७.१२.२००७ रोजी अर्जदाराकडे जावून अर्जदाराला हवी असलेली माहिती देण्याची तयारी दर्शविली व त्यासाठी ७०/- रुपयाचा भरणा करण्याबध्दल किंवा भरणा केल्याची चालान सादर करावी व व्यक्तीश: माहिती मागविलेली असल्यामुळे ती घेवून जावी असे कळविले. परंतु, अर्जदाराने दिनांक २७.१२.२००७ नंतर व्यक्तीश: जावून ७०/- रुपयाचा भरणा केला नाही किंवा भरणा केल्याबध्दलची चालान सुध्दा दाखविली नाही किंवा तशा प्रकारचा कोणताही पत्रव्यवहार त्यांनी केलेला दिसून येत नाही. म्हणून दिनांक २९.१२.२००७ रोजी त्यांनी सदर माहिती त्यांच्या घरच्या पत्यावर रजिस्टर पोस्टाने पाठविली परंतु त्याची पोचपावती अजून पर्यंत त्यांच्या कार्यालयास मिळाली नाही.

२. वरील सर्व बाबींचा विचार करता अपीलकर्ता अर्जदार यांचा माहिती घेण्याचा मुळ उद्येश नसून संबंधीत अधिका-यांना त्रास देण्याच्या हेतूने अर्ज केल्याचे प्रथम दर्शनी दिसून येते. तसेच आज सुनावणीच्या तारखेबाबत अर्जदारास रितसर नोटीस पाठवून सुध्दा ते गैरहजर आहेत. या सर्व बाबींवरुन हे सिध्द होते की, अर्जदारास माहिती घेण्यासाठी कोणतेही स्वारस्य नाही. करीता सदरचे अपील हे खारीज करण्यात येवून निकाली काढण्यास पात्र आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांचे सदरचे अपील खारीज करण्यात येवून निकाली काढण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

.

**नागपूर**
**दिनांक ६.१.२००९**

**( भास्कर पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग खंडपीठ**
**नागपूर/अमरावती**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर/अमरावती यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २५३३/२००७**

**१) श्री बबन तुळशिराम उराडे,**
**द्वारा माधूरी चाफळे क्वार्टन नं. जी-२०,**
**निरी कॅालनी, दिक्षाभूमी रोड, नागपूर** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा कोषागार अधिकारी,**
**नागपूर.** **उत्तरवादी क्रं.१**

**३) जन माहिती अधिकारी ,कोषागार अधिकारी कार्यालय,**
**नागपूर.** **उत्तरवादी क्रं.२**

**( आदेश पारित दिनांक ६.१.२००९ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २८.९.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता श्री बबन तुळशिराम उराडे हे व्यक्तीगत हजर आहेत. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ६.१.२००९ रोजी घेण्यात आली. उत्तरवादी क्रं.२ जन माहिती अधिकारी तथा उप कोषागार अधिकारी श्री विनय तिवारी हे हजर आहेत. तसेच ते उत्तरवादी क्रं.१ तथा प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीनेही हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.३.२००७ व ४.४.२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे माहिती व्यक्तीशः हवी आहे यासाठी अर्ज केला. त्यामध्ये खालील बिलाच्या व त्यासोबत जोडलेल्या सर्व कागदपत्रांच्या छायांकित प्रती पुरविण्याची कृपा करावी. कार्यालयाचे नांव, पीठासीन अधिकारी शाळा न्यायाधिकरण, नागपूर D.D.O.No.१९८९ (१) अतिथी भत्ता ग्रास रक्कम ६१८७५/-, निव्वळ रक्कम ५४०८५/-, ट्रेझरी बील नं.१००२४ टोकन क्रं.१६०३, व्हाऊचर नं.४३९, दिनांक ३१.३.२००७. (२) निवासी शिपाई भत्ता ग्रास रक्कम ३२८२१/-, निव्वळ रक्क्म ३२८२१/-, ट्रेझरी बिल क्रं.१०१५७९, टोकन क्रं.४४, व्हाऊचर ४५१ दिनांक ३१.३.२००७. वरील दोन्ही बिलांच्या व त्या सोबत जोडलेल्या कागदपत्रांच्या प्रती देण्याची कृपा करावी, अशी माहिती मागितलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे पत्र क्रमांक ३४०/२००७, दिनांक ११.४.२००७ अन्वये असे कळविले आहे की, देयके सादर करताना ती परिपूर्ण असणे ही

जबाबदारी त्या कार्यालयाची आहे. वरील देयके ही तक्रारकर्ता ज्या कार्यालयात कार्यरत आहे त्याच कार्यालयामधून पाठविण्यात आलेली आहे. त्यामुळे त्या देयकाची प्रत त्यांना साहजिकच त्या कार्यालयातून मिळू शकते. माहिती अधिकारी यांचे म्हणण्यानुसार दिनांक १४.३.२००७ रोजी कोषागार कार्यालयात माहितीच्या अधिकारात माहिती मागितली होती तेव्हा जन माहिती अधिकारी, कोषागार कार्यालय, नागपूर यांनी सविस्तर पत्र पाठवून आपण महालेखाकार, नागपूर यांचेकडून माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी कळविले आहे व पुन्हा पत्र क्रमांक कोष/लेखापरीक्षा/६६५०/२००७, दिनांक १९.५.२००७ अन्वये या कार्यालयाचे दिनांक १८.४.२००७ च्या पत्रानुसार पुन्हा कळविले आहे की आपण मागितलेली माहिती या कार्यालयात नाही. हया संबंधात जन माहिती अधिकारी यांचे सुध्दा असे म्हणणे आहे की, त्यांना देयके १५ दिवसांचे वर प्रलंबित ठेवता येत नाही व ती देयके नियमानुसार मंजूर करुन ती महालेखाकार कार्यालयात पाठवितात.

३. अपीलकर्ता यांनी ज्या देयकांच्या बाबतीत माहिती मागितलेली आहे त्याचा तपशिल त्या तक्रारीत असून ती देयके मार्च शेवट, २००७ ची दिसते. व तक्रारकर्ता यांचा अर्ज हा दिनांक ३०.३.२००७ चा आहे. नियमाप्रमाणे जन माहिती अधिकारी यांना ३० दिवसांची मुदत असते. ती मुदत कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती शोधून ती मिळवून देण्यासाठी असते. परंतु, पाठविलेली देयके ही त्वरीत तपासून १५ दिवसांच्या आंत त्यांना ती महालेखाकार यांचेकडे पाठवावी लागते. त्यामुळे अर्जदाराला एक महिन्याचा कालावधी संपल्यानंतर माहिती मिळाली नसल्यास उजर करण्याचा अधिकार आहे. व त्यावेळेला त्यांनी मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध नसल्यामुळे माहिती अधिकारी यांना जबाबदार धरता येत नाही.

४. तसेच अर्जदाराने माहीती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तरानंतर प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील करावयास पाहिजे होते. व हया बाबतीत उत्तरवादी यांच्या सांगण्यावरुन लेखा व कोषागार हे या बाबतीत प्रथम अपीलीय अधिकारी आहे. व अर्जदाराने केलेले अपील हे संबंधीत अधिकारी यांचे न केल्यामुळे त्याबाबत बरोबर निर्णय देण्यात आलेला नाही. अपीलकर्ता यांनी त्यावर दूसरे अपील हे राज्य माहिती आयोगासमोर दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय नसल्यामुळे हया आयोगासमोरील केलेले द्वितीय अपील हे फेटाळण्यात येत आहे. तरी

अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ३०.३.२००७ च्या अर्जाप्रमाणे हवी असलेली माहिती अजून त्यांना आवश्यक असल्यास त्यांनी योग्य त्या कार्यालयाकडे अर्ज करुन माहिती मिळविण्याची त्यांना मुबा आहे. त्यामुळे अपीलात माहिती मागण्यासाठी दिलेले कारण योग्य नसल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांचे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ६.१.२००९**

**( भास्कर पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग खंडपीठ**
**नागपूर/अमरावती**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर/अमरावती यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २५३२/२००७**

**१) श्री बबन तुळशिराम उराडे,**
**द्वारा माधूरी चाफळे क्वार्टन नं. जी-२०,**
**निरी कॅालनी, दिक्षाभूमी रोड, नागपूर** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा सह निबंधक वर्ग-१ (निम्न श्रेणी)**
**नागपूर(ग्रामिण) कार्यालय, जुनघरे निवास, प्लॅाट नं.९०,**
**शिवाजीनगर, धरमपेठ विस्तार, नागपूर-१०.** **उत्तरवादी क्रं.१**

**३) जन माहिती अधिकारी तथा दुय्यम निबंधक, रामटेक,**
**तहसिल कार्यालय, रामटेक, ता.रामटेक, जि. नागपूर.** **उत्तरवादी क्रं.२**

**( आदेश पारित दिनांक ६.१.२००९ )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २८.९.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता श्री बबन तुळशिराम उराडे हे व्यक्तीगत हजर आहेत. उत्तरवादी क्रं.२ जन माहिती अधिकारी तथा दुय्यम निबंधक श्री के.ए.खान हजर आहेत. उत्तरवादी क्रं.१ तथा प्रथम अपीलीय अधिकारी सहा. जिल्हा निबंधक वर्ग-१ (निम्न श्रेणी) श्री बी.सी. ठाकरे हजर आहेत. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ६.१.२००९ रोजी घेण्यात आली. दोघांचेही म्हणणे ऐकूण घेतले.

२. अपीलकर्ता अर्जदार यांनी दिनांक २१.१२.२००६ रोजी केलेल्या अर्जाप्रमाणे माहिती मागितलेली आहे. त्यानुसार त्यांनी सर्व्हे नं.५९/२ आराजी १.०० एकर अकृषक मौजा परसवाडा ग्राम पंचायत बिजेवाडा खैरी ता. रामटेक प.ह.३८ मधील श्री प्रल्हाद हरिभाऊ राहाटे यांचे नांवे असलैल्या शेतीच्या लेआऊट मधील प्लॅाट नं.३७ ची रजिस्ट्रीची प्रत देण्यांत यावी, ज्याचा अं.क्रं.१०१३, दिनांक ९.६.२००६ हा आहे. आवश्यक शुल्काची माहिती दिल्यास त्वरीत प्रदान करण्यात येईल. करिता अ.क्रं.१०१३ दिनांक ९.६.२००६ च्या रजिस्ट्रीची छायांकित प्रत त्वरीत देण्याची कृपा करावी, अशा प्रकारची माहिती मागितलेली दिसून येते. दुय्यम निबंधक, रामटेक यांनी दिनांक १.३.२००६ रोजी यु.पी.सी.द्वारे पत्र पाठवून अर्जदाराला असे कळविले आहे की,

दस्तऐवजाच्या संगणीकृत नकला करीता २०/- रुपये प्रति पान प्रमाणे फी निर्धारित केली आहे. आपण मागणी केलेले दस्ताऐवज क्रं.१०१३ मध्ये एकुण २१ पाने असून त्या करीता आपणास नकल फी ४२०/- रु.+ टपाल खर्च सर्व साधारणत: १५/- रुपये तसचे नकले करीता १०/- चे मुद्रांक किंवा कोर्ट फी तिकीट आवश्यक आहे. आपणास विनंती करण्यात येते की, वरील प्रमाणे आकारण्यात आलेला शुल्क या कार्यालयाकडे प्रत्यक्षपणे किंवा मनिआर्डर/डी.डी.द्वारे जमा केल्यास आवश्यक असलेली नकल आपणास ताबडतोब पुरविण्यात येईल. त्यावर अपीलकर्ता अर्जदार यांनी दिनांक ७.४.२००७ चे पत्राप्रमाणे असे कळविले आहे की, आपण मागितलेला खर्च हा माहितीच्या अधिकार अधिनियमात बसत नसून तो न मागता आपण दस्तऐवज पुरवावयास हवा होता. त्यानुसार अपीलकर्ता यांनी प्रथम अपील सहाय्यक निबंधक, वर्ग-१ (निम्न श्रेणी) व मुद्रांक जिल्हाधिकारी तथा अपीलीय अधिकारी, नागपूर ग्रामीण, नागपूर यांचेकडे कलम १९(१) व नियम ५(१) खाली अपील दाखल केले आहे. परंतु अपीलाची सुनावणी घेवून त्या अपीलाचा निर्णय दिनांक २७.६.२००७ रोजी निकालात काढून तसे अपीलकर्ता यांना कळविण्यात आलेले आहे. अपील फेटाळण्याचे कारण असे दिले आहे की, कलम १९(१) व नियम ५(१) अन्वये अपील दाखल केले नाही.

३. वरील सुनावणी दरम्यान उत्तरवादी क्रं.१ व २ यांनी त्यांची फी आकारण्यासंबंधी असलेला गैरसमज दूर झाल्याचे मान्य केले आहे. त्यांनी असे सांगितले की, त्यांच्या नियमाप्रमाणे हव्या असलेल्या दस्तऐवजाच्या प्रती देण्याकरीता जी फी आकारणी करण्यात येते तशी आम्ही अपीलकर्ता यांना मागणी केलेली आहे. परंतु, माहितीच्या अधिकाराखाली कुठल्याही दस्तऐवजाची प्रत मागणी केल्यास ती प्रमाणीत असण्याची गरज नाही. त्यांना हव्या असलेल्या माहितीच्या छायांकित प्रती देवून त्यावर माहितीच्या अधिकाराखाली ही माहिती पुरविण्यात येत आहे, याबाबत प्रमाणित करण्यात येवून त्यांना माहिती पुरवावी लागते व त्यानुसार त्यांनी अशा प्रकारची प्रत जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अर्जदाराला विना मुल्य देण्याचे कबुल केले. व त्याप्रमाणे आजपासून ८ दिवसांत हया आयोगासमोर कबुल केल्याप्रमाणे अर्जदाराला हवी असलेल्या माहितीची प्रत पाठवितील, असे मान्य केले आहे.

४. वरील सर्व बाबींचा विचार करुन व प्रथम अपीलाचा निर्णय गुणवत्तेवर अमान्य केल्यामुळे सदरचे द्वितीय अपील सुध्दा खारीज करण्यात येत आहे. परंतु, अर्जदाराचा माहिती मागण्याचा उद्येश सफल व्हावा या दृष्टीने व जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्याचे मान्य केल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांचे सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ६.१.२००९**

**( भास्कर पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग खंडपीठ**
**नागपूर/अमरावती**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर/अमरावती यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २५४०/२००७**

**१) श्री समीर महादेवजी गोस्वामी,**
**पडोळे नगर, वाठोडा रोड, नागपूर-८. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप निगम आयुक्त,**
**महानगरपालिका, नागपूर. उत्तरवादी क्रं.१**

**३) जन माहिती अधिकारी तथा आरोग्य अधिकारी,**
**महानगर पालिका, नागपूर. उत्तरवादी क्रं.२**

**( आदेश पारित दिनांक ७.१.२००९ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ४.१०.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता श्री समीर महोदेवजी गोस्वामी हे व्यक्तीगत हजर आहेत. उत्तरवादी क्रं.२ तथा जन माहिती अधिकारी, आरोग्य अधिकारी डॅा. मिलींद गणवीर, हजर आहेत. उत्तरवादी क्रं.१ तथा प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ७.१.२००७ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी यांचे म्हणणे एकूण घेतले.

२. जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, अपीलकर्ता यांना हवी असलेली संपुर्ण माहिती पुरविलेली आहे. माहिती पुरविल्यानंतर त्यामध्ये जी 'ॲक्शन ॲन्ड इन ॲक्शनचा' भाग असतो त्याबध्दल आयोगाला विचारपूस करण्याची अधिकारिता नाही. जन माहिती अधिकारी यांचेकडे असलेली माहिती पुरविली असल्यामुळे अपीलकर्ता यांचे समाधान झालेले आहे. व माहिती मिळाल्यानंतर अपीलकर्ता यांना काही उजर असल्यास ते योग्य त्या अधिका-

यांसमोर किंवा न्यायालयासमोर जावून त्याबध्दल त्यांचे समाधान करुन घेण्याची जबाबदारी ही अपीलकर्ता यांचेवर आहे.

३. वरील सर्व बाबींचा विचार करुन सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ७.१.२००९**

**( भास्कर पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग खंडपीठ**
**नागपूर/अमरावती**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर/अमरावती यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २५३९/२००७**

**१) श्री अंबादास पैकुजी बोंदरे,**
**२०९, गोकुळपेठ, नागपूर-१०.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी,**
**माध्यमिक शिक्षण विभाग, जि.प. नागपूर.** **उत्तरवादी क्रं.१**

**३) जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक,**
**माध्यमिक शिक्षण विभाग, जि.प. नागपूर.** **उत्तरवादी क्रं.२**

**( अंतिरिम आदेश पारित दिनांक ७.१.२००९ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ८.१०.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता श्री अंबादास पैकूजी बोंदरे हे व्यक्तीगत हजर आहेत. उत्तरवादी क्रं.२ तथा जन माहिती अधिकारी श्री लांजेवार, उपशिक्षणाधिकारी हजर आहेत. तसेच ते प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीनेही हजर आहेत. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ७.१.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी यांचे म्हणणे ऐकूण घेतले.

२. अपीलकर्ता यांचे म्हणण्यानुसार त्यांना काही माहिती मिळाली व काही माहिती अजून मिळालेली नाही. त्याबाबत त्यांना जी माहिती मिळाली नाही त्या दस्तऐवजाची त्यांनी यादी तयार करुन उपशिक्षणाधिकारी यांचेकडे दिली असून त्या यादीनुसार माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी यांनी कबूल केली आहे. यादीप्रमाणे माहिती आजपासून ८ दिवसांच्या आंत अपीलकर्ता यांना देण्यात यावी. करीता अपीलाची अंतिम सुनावणीची तारीख २८.१.२००९ रोजी सकाळी १०.०० वाजता देण्यात येत आहे. उपरोक्त तारखेला आयोगासमोर अपीलकर्ता व उत्तरवादी यांनी आवश्यक दस्तऐवजासह सुनावणीसाठी हजर राहावे.

**नागपूर**
**दिनांक ७.१.२००९**

**( भास्कर पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग खंडपीठ**
**नागपूर/अमरावती**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर/अमरावती यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २५४५/२००७**

**१) श्री भिमराव नागो साखरे,**
**मु.पो.कारंजा, ता.जि. गोंदिया** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी ,प्राथमिक शिक्षण विभाग,**
**जिल्हा परिषद, गोंदिया, ता.जि. गोंदिया.** **उत्तरवादी क्रं.१**

**३) जन माहिती अधिकारी तथा ,प्राथमिक शिक्षण विभाग,**
**जिल्हा परिषद, गोंदिया, ता.जि. गोंदिया.** **उत्तरवादी क्रं.२**

**( आदेश पारित दिनांक ७.१.२००९ )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १७.१०.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता श्री भिमराव नागो साखरे हे व्यक्तीगत हजर आहेत. उत्तरवादी क्रं.१ तथा जन माहिती अधिकारी श्री एस.जी. घरसेले, उपशिक्षणाधिकारी हे हजर आहेत. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ७.१.२००९ रोजी घेण्यात आली. त्यांचे म्हणणे एकूण घेतले.

२. अपीलकर्ता हे अपंग आहेत. त्यांनी माहितीच्या अधिकाराखाली दिनांक २९.५.२००७ ला जी माहिती मागितली आहे ती खालीलप्रमाणे आहे.

आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन : १) साक्षातकारासाठी पात्र हिन्दी आणि मराठी माध्यमाच्या उमेदवारांची पत्यासह यादी आणि टक्केवारी. (२) साक्षातकारासाठी पात्र हिन्दी आणि मराठी माध्यमाच्या उमेदवारांची अर्ज आणि डी.एड. पदवीची प्रत. (३) उमेदवार किती हप्त्यात रुजू करण्यांत आले. (४) उपरोक्त भर्ती प्रक्रियेत रुजू झालेल्या हिन्दी आणि मराठी माध्यमाच्या सर्व उमेदवारांची यादी, त्यांचा आरक्षण आणि प्रर्वगाचा तपशिल.

३. अपीलकर्ता व उत्तरवादी यांचे म्हणणे ऐकूण घेतल्यानंतर अपीलकर्ता यांना माहिती देण्याबध्दल उत्तरवादी यांनी स्विकृती दर्शविली. परंतु, माहिती व्यापक प्रमाणात असल्यामुळे अपीलकर्ता यांना निश्चित कोणती माहिती पाहिजे याबाबत शंका आहे. त्याकरीता अपीलकर्ता हे स्वत: शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद, गोंदिया यांचे कार्यालयात दिनांक १२.१.२००९

रोजी सकाळी ११.०० वाजता जावून उपलब्ध असलेल्या माहितीची पाहाणी करतील व त्यामध्ये जी माहिती त्यांना आवश्यक आहे त्या माहितीची यादी करुन ती शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना सादर करतील. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) हे त्यानंतर दिनांक १६.१.२००९ पर्यंत अपीलकर्ता यांना माहितीच्या छायांकित प्रती विनामुल्य देतील, असे त्यांनी आयोगासमोर कबुल केले.

४. वरील सर्व बाबींचा विचार करुन अपीलार्थी यांना अपील चालवायचे नाही. त्यांनी अपील मागे घेण्यासाठी आयोगास विनंती केली आहे, ती मान्य करण्यात येत आहे. अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) निर्णयाची प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ७.१.२००९**

**( भास्कर पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग खंडपीठ**
**नागपूर/अमरावती**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर/अमरावती यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २५१८/२००७**

**१) श्री ललीतराव पाटील,**
**न्यू.कॅालनी, म.न.पा.झोन कार्यालय १० चे मागे,**
**कोराडी रोड, नागपूर-१. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अतिरिक्त जिल्हाधिकारी,**
**जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर. उत्तरवादी क्रं.१**

**३) जन माहिती अधिकारी तथा नझुल तहसिलदार,**
**नागपूर शहर, नागपूर. उत्तरवादी क्रं.२**

**( अंतरिम आदेश पारित दिनांक ९.१.२००९ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २५.१०.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता श्री ललितराव पाटील हे व्यक्तीगत हजर आहेत. उत्तरवादी क्रं.१तथा प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री अनिल अवताडे, स्विय सहाय्यक हजर आहेत. उत्तरवादी क्रं.२ तथा जन माहिती अधिकारी श्री एन.एम. पैठणकर, नझूल तहसिलदार हजर आहेत. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज ९.१.२००९ रोजी घेण्यात आली. त्यांचे म्हणणे ऐकूण घेतले.

२. अपीलाच्या सुनावणीचे दरम्यान असे आढळून आले की, अपीलकर्ता यांनी त्यांच्या दिनांक २४.७.२००७ च्या अर्जाद्वारे राज्य जन माहिती अधिकारी तथा नझूल तहसिलदार यांचेकडे माहितीची मागणी केली होती. व त्यानुसार नझुल तहसिलदार यांनी दिनांक २३.८.२००७ ला पत्राद्वारे अपीलकर्ता यांना असे कळविले आहे की, आपण मागितलेल्या प्रकरणातील नोटीस व आदेशाच्या प्रति आपण दिनांक २७.८.२००७ रोजी स्वत: कार्यालयात येवून कागदपत्राची योग्य रक्कम भरुन प्राप्त करुन घ्याव्या. दिनांक २३.८.२००७ च्या पत्रावर कुठलाही जावक क्रमांक दिलेला नाही. तसेच पत्राच्या पाठीमागे त्यात अशी नोट दिली आहे की, सूचना पत्र धारकाच्या घरी दोन तीन दिवस गेलो असता सूचना पत्र धारकाचे घर बंद असून दरवाज्यास कुलूप लागलेले होते. आजुबाजूला चौकशी केली असता कुणीही

त्यांच्याविषयी काही सांगितलेले नाही. कुणीही साक्षीदार सहया करण्यास तयार नाही. करीता संबंधीत सूचना पत्राची एक प्रत त्यांच्या घरात टाकून चष्पा सर्विस केली. सबब रिपोर्ट सादर. त्याखाली शिपाई तह. नझूल यांची सही आहे व त्याखाली २४.८.२००७ अशी तारीख टाकलेली आहे.

३. दिनांक २३.८.२००७ च्या पत्रावरुन असे दिसून येते की, पत्रावर जावक क्रमांक टाकलेला नाही. पत्राच्या पाठीमागे दिलेली नोट दिनांक २४.८.२००७ ची आहे. व त्यामध्ये त्यांचे म्हणणे असे आहे की, दोन तीन दिवस घरी गेलो होतो. परंतु, दिनांक २३.८.२००७ व २४.८.२००७ यामध्ये तीन दिवसांचा कालावधी होत नाही. यावरुन सदरचे पत्र बनावट असल्याची शंका येते. तसेच अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे की, माहिती न मिळाल्यामुळे व दिनांक २३.८.२००७ चे पत्र न मिळाल्यामुळे त्यांना अपील दाखल करावे लागले. व दिनांक ६.१०.२००७ च्या प्रथम अपीलाच्या आदेशानुसार अपीलार्थींना पुढील ७ दिवसांचे आंत पाहिजे असलेली संपूर्ण व मुद्येनिहाय माहिती नियमानुसार शासकिय शुल्काचा भरणा केल्यानंतर दिनांक १३.१०.२००७ पर्यंत माहिती देण्याकरीता आदेशित करण्यात आले होते. परंतु, प्रथम अपीलाच्या आदेशाची प्रत दिनांक १२.१०.२००७ ला सायंकाळी ५.०० वाजता मिळाल्यामुळे व दूस-या दिवशी शनिवार/सुटी असल्यामुळे माहिती घेण्यासाठी दिनांक १३.१०.२००७ पर्यंत उपस्थित राहाणे शक्य झाले नाही. व त्यानंतर सुध्दा त्यांना हवी असलेली माहिती मिळालेली नाही.

४. वरील सर्व बाबींचा खुलासा नझुल तहसिलदार यांनी शपथेवर करावा जेणेकरुन हे अपील निकाली काढणे सोईचे होईल व अर्जदाराला हवी असलेली माहिती पुरविणे शक्य होईल. त्याकरीता अंतिम सुनावणीची पुढील तारीख २८.१.२००९ रोजी सकाळी १०.०० वा. देण्यात येत आहे. सदर तारखेला अर्जदाराला हवी असलेल्या माहितीसह आयोगासमोर नागपूर येथे सुनावणीसाठी उत्तरवादी व अपीलकर्ता यांनी हजर राहावे.

**नागपूर**
**दिनांक ९.१.२००९**

**( भास्कर पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग खंडपीठ**
**नागपूर/अमरावती**

January,०९Balki

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर/अमरावती यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २५५७/२००७**

**१) श्री अनिल बाबाराव सावरकर,**
**६१, श्रीकृपा, दुर्गानगर, दुर्गा मंदीर जवळ,**
**मानेवाडा रोड, नागपूर- २४. — अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा सचिव,**
**महाराष्ट्र ग्रामहित शिक्षण संस्था, नागपूर,**
**द्वारा आदर्श विद्या मंदीर, जूना सुभेदार ले आऊट (शारदा चौक),**
**नागपूर-२४. — उत्तरवादी क्रं.१**

**३) जन माहिती अधिकारी तथा प्रभारी मुख्याध्यापिका,**
**आदर्श विद्या मंदीर, जूना सुभेदार ले आऊट (शारदा चौक),**
**नागपूर-२४. — उत्तरवादी क्रं.२**

**( आदेश पारित दिनांक ९.१.२००९ )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ८.११.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता श्री अनिल बाबाराव सावरकर हे व्यक्तीगत हजर आहेत. उत्तरवादी क्रं.१ तथा प्रथम अपीलीय अधिकारी श्री चंद्रकांत जवदंड, सचिव हजर आहेत. उत्तरवादी क्रं.२ तथा जन माहिती अधिकारी श्रीमती अनिता चंद्रकांत जवदंड, मुख्याध्यापिका हजर आहेत. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ९.१.२००९ रोजी घेण्यात आली. त्यांचे म्हणणे ऐकूण घेतले.

२. सुनावणीच्या दरम्यान असे आढळून आले की, अर्जदाराला काही माहिती मिळाली व काही माहिती अजून मिळालेली नाही. उत्तरवादी यांनी अर्जदाराला आज सुध्दा काही माहिती पुरविली आहे व उर्वरित माहिती अपीलकर्ता यांना देण्याची तयारी उत्तरवादी यांनी दर्शविली. अपीलकर्ता यांनी उर्वरित कागदपत्रे प्राप्त करुन घेण्याकरीता दिनांक १६.१.२००९ रोजी दूपारी ३.०० वाजता जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात जावून व त्यांना हव्या असलेल्या कागदपत्राची पाहाणी करुन त्याप्रमाणे लेखी यादी देवून जन माहिती अधिकारी(मुख्याध्यापिका) यांचेकडून त्यांचे सहिनिशी माहिती प्राप्त करुन घ्यावी.

३. वरीलप्रमाणे अपीलकर्ता व उत्तरवादी यांनी मान्य केले आहे व अपीलकर्ता यांचे समाधान

झाल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांनी उर्वरित कागदपत्रे प्राप्त करुन घेण्याकरीता दिनांक १६.१.२००९ रोजी दूपारी ३.०० वाजता जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात जावून व त्यांना हव्या असलेल्या कागदपत्राची पाहाणी करुन त्याप्रमाणे लेखी यादी देवून जन माहिती अधिकारी(मुख्याध्यापिका) यांचेकडून त्यांचे सहिनिशी माहिती प्राप्त करुन घ्यावी. अपीलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) निर्णयाची प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ९.१.२००९**

**( भास्कर पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग खंडपीठ**
**नागपूर/अमरावती**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर/अमरावती यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक /२००७**

**१) श्री प्रमोदकुमार हरीश्चंद्र अग्रवाल**
**मनोहर चौक, पोलीस लाईन समोर,**
**गोंदिया-४४६०१, ता.जि. गोंदिया.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा निवासी उप जिल्हाधिकारी,**
**जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदिया, ता.जि. गोंदिया.** **उत्तरवादी क्रं.१**

**३) जन माहिती अधिकारी, नझुल शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय,**
**गोंदिया. ता.जिल्हा गोंदिया.** **उत्तरवादी क्रं.२**

**( अंतरिम आदेश पारित दिनांक ९.१.२००९ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ४.११.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता श्री प्रमोदकुमार हरिश्चंद्र अग्रवाल हे व्यक्तीगत हजर आहेत. उत्तरवादी क्रं. १ तथा प्रथम अपीलीय अधिकारी श्री आर.बी. चाफे, निवासी उप जिल्हाधिकारी हजर आहेत. उत्तरवादी क्रं.२ तथा जन माहिती अधिकारी श्री यु.जी. वैद्य, सहाय्यक अधीक्षक, नझुल शाखा हजर आहेत. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ९.१.२००९ रोजी घेण्यात आली. तक्रारीतील त्यांचे म्हणणे ऐकूण घेतले.

२. अपीलकर्ता अर्जदार यांच्या माहितीच्या अर्जानुसार त्यांनी एकुण १२ मुद्यांवर माहिती मागितलेली आहे. त्यासाठी त्यांनी जो दिनांक ३१.७.२००७ रोजी अर्ज केलेला आहे, त्यामध्ये त्यांनी मुद्येसुद माहिती मागितलेली आहेत. त्यापैकी त्यांना आतापर्यंत मुद्या क्रमांक ९ व १० या दोन मुद्यांची माहिती मिळालेली आहे. व बाकी मुद्यांची माहिती त्यांना मिळालेली नसून

उत्तरवादी तर्फे माहिती देण्यासाठी टाळाटाळीचे उत्तर देण्यात येत आहे असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे. दिनांक २६ सप्टेंबर, २००७ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा निवासी उप जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदिया यांनी दिलेल्या आदेशानुसार अपीलकर्ता अर्जदार यांनी मुद्या क्रमांक १,२,३,४,६,९ व १२ चे अनुषंगाने नायब तहसिलदार, नझुल तहसिल कार्यालय, गोंदिया यांचेशी संपर्क साधून माहिती घेण्यात यावी, असे कळविले आहे. तसेच आवश्यकता वाटल्यास त्यांचे विरुध्द तहसिलदार, गोंदिया यांचेकडे प्रथम अपील करावे. तसेच मुद्या क्रमांक ७ चे अनुषंगाने नगर परिषद, गोंदिया यांचे विरुध्द प्रादेशिक संचालक, नगर पालिका प्रशासन, नागपूर यांचेकडे आवश्यक असल्यास अपील करावे. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अर्जदाराने मागितलेली माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपाची असून ती देता येत नाही कारण कायद्यामध्ये अशा प्रकारची तरतूद नाही म्हणून सदरचे अपील हे फेटाळलेले आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपील फेटाळण्यासाठी दिलेले कारण हे योग्य नाही. कारण माहिती जरी प्रश्नार्थक दिसत असली तरी ती निश्चित स्वरुपाची (specific) आहे. त्याबाबत माहिती उपलब्ध आहे किंवा नाही, असल्यास ती पुरविण्याची गरज आहे व माहिती उपलब्ध नसल्यास तसे निश्चित स्वरुपाचे उत्तर जन माहिती अधिकारी यांनी देणे गरजेचे ठरते. म्हणून अपील फेटाळण्याचे कारण योग्य नाही.

३. अपीलकर्ता अर्जदार यांनी जी माहिती मागितलेली आहे त्यासंबंधात प्रथम अपीलीय अधिकारी तथा निवासी उप जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदिया यांचे म्हणण्यानुसार मागितलेली माहिती ही उपविभागीय अधिकारी, गोंदिया, नायब तहसिलदार,

नझुल तहसिल कार्यालय, गोंदिया, मुख्याधिकारी, नगर परिषद, गोंदिया तसेच नझुल सर्व्हेअर, तहसिल कार्यालय, गोंदिया यांचेकडे उपलब्ध आहे. त्यानुसार या आयोगासमोर त्यांची रेकार्डसह उपस्थिती असणे आवश्यक आहे जेणेकरुन अर्जदाराला हवी असलेली माहिती हया स्तरावर सुध्दा देता येणे शक्य होईल. म्हणून खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) वरील सर्व बाबी लक्षात घेवून उपविभागीय अधिकारी, गोंदिया, नायब तहसिलदार, नझुल तहसिल कार्यालय, गोंदिया, मुख्याधिकारी, नगर परिषद, गोंदिया तसेच नझुल सर्व्हेअर, तहसिल कार्यालय, गोंदिया या अधिका-यांना आयोगातर्फे नोटीस पाठवून त्यांना अर्जदाराने मागितलेल्या माहितीसंबंधी उपलब्ध असलेल्या संपुर्ण रेकार्डसह पुढील अंतिम सुनावणीची तारीख २३.१.२००९ रोजी दूपारी १.३० वाजता आयोगासमोर नागपूर येथे हजर राहण्यास कळविण्यात यावे. व रेकार्ड मधून अर्जदाराला हवी असलेली माहिती उपलब्ध करुन देण्याबध्दल झालेल्या विलंबाचे स्पष्टीकरणासह त्यांनी हजर राहावे.

**नागपूर**
**दिनांक ९.१.२००९**

**( भास्कर पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग खंडपीठ**
**नागपूर/अमरावती**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर/अमरावती यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**
**अपील क्रमांक २३८२/२००७**

**१) श्री नामदेव मुकूंदराव चिमुरकर,**
**पशुचिकित्सालय, पुलर, पं.स. भिवापूर,**
**मोखे बर्डी ता. भिवापूर, जिल्हा नागपूर. ... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी,**
**जिल्हा परिषद, नागपूर.**
**३) जन माहिती अधिकारी तथा खंड विकास अधिकारी,**
**पंचायत समिती, भवापूर. .. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १४.१.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १७.९.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १४.१.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत. त्यांचे म्हणणे एकूण घेतले.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २९.७.२००६ रोजी माहिती अधिकारी म्हणून खंड विकास अधिकारी, पंचायत समिती, भिवापूर यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

**आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल**: "सन १९८६ या वर्षी नियुक्ती पासून सन १३.५.१९९८ या कालावधीतील वार्षक वेतन वाढ तवेच त्या कालावधीतील कालबध्द पदोन्नती संवर्गातील वेतन निश्चिती मध्ये असलेल्या त्रुटी पुर्तता करुन विलंब झालेल्या शासकिय दस्तऐवजाबाबत वैयक्तिक नस्ती येतील गोपनिय शेरे आपले स्तरावरुन सन १९९८ पासून मागणी केलेली असता टाळाटाळ केल्याचे माझ्या निदर्शनास आले. त्याबाबत पदोन्नतीचा कार्यकाळ दिनांक १३.५.१९८६ ते दिनांक १३.५.१९९८ या कालावधीतच देण्यास पाहिजे असता या प्रकरणाबाबत कोणांकडून योग्य ती दखल वेळीच घेतली गेली नाही. सन २००४ अन्वये नियमबाहय बुध्दीपुरस्परपणे कार्यवाही केली. सन १ एप्रिल, २००५ पासून देण्यात आलेली कालबध्द पदोन्नती विरुध्द अपील सादर करीत आहे."

सदरची माहिती कार्यालयीन पत्राद्वारे मला मिळावी असे नमूद केलेले दिसून येते. सदरच्या अर्जामध्ये स्पष्टपणे कोणती माहिती मागितली आहे, हे स्पष्ट होत नसल्यामुळे त्यांना तोंडी त्याबध्दल विचारणा करण्यात आली होती व त्यांच्या गोपनिय अहवालांच्या संदर्भामध्ये दिनांक १५.७.२००६ रोजी संपूर्ण माहिती त्यांना दिलेली असल्यामुळे लेखी माहिती दिलेली नाही. सदरच्या दिनांक १५.७.२००६ च्या दिलेल्या माहितीबध्दल त्यांची पोच आहे, असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. त्यामुळे समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी दिनांक २.६.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाच्या निर्णयाच्या संदर्भामध्ये दिनांक २.८.२००७ रोजी जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांनी श्री चिमुरकर, परिचर यांच्या गोपनिय अहवालांच्या प्रती कार्यालयास प्राधान्याने उपलब्ध करुन द्याव्या, असे उप मुख्य कार्यपालन अधिकारी यांना कळविलेले दिसून येते. तसेच सदरच्या पत्राची प्रतीलिपी श्री चिमुरकर यांना दिलेली दिसून येते. एकुणच दाखल केलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपीलकर्ता यांना जरी दिनांक १५.७.२००६ रोजी त्यांच्या अर्जाच्या अनुषंगाने संपूर्ण माहिती उपलब्ध झाली असली तरी त्यांची अपेक्षा ही कालबध्द पदोन्नती मिळावी अशी दिसून येते. व तसे त्यांनी त्यांच्या राज्य माहिती आयोगाकडील द्वितीय अपीलामध्ये सन १९९३, ९४, १९९५ते २००० आणि २००१ ते २९९५ पावेतो रजा वेतन प्रकरणातील दिरंगाई केल्याने तसेच चुकीचे अहवाल शिफारस समितीपूढे सादर केल्याने मला कळविण्यात आलेले नाही. अशा प्रकारचे निवेदन केलेले दिसून येते. तसेच वरील सर्व विभाग प्रमुखांच्या कार्यालयातून मिळालेल्या माहितीमुळे व्यथित होऊन कालबध्दल पदोन्नती कालावधी वर्ष १२ पुर्ण झाले. त्या कालावधीतील दिनांक १.४.२००५ ला लागू करण्यात आली व कशी? करीता कालबध्द पदोन्नतीकरीता माहितीचे प्रयोजन व त्याबाबतची कारणे अशी विनंती केली आहे.

३. वर नमूद केल्याप्रमाणे अपीलकर्ता यांना त्यांच्या सेवेच्या संदर्भातील संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे, असे खंड विकास अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले. मात्र, अपीलकर्ता यांना कालबध्द पदोन्नती प्रकरणाचे रजा वेतनाच्या प्रकरणातील दिरंगाई व अनियमितता याबाबत वरील कारणे अपेक्षित आहे, असे दिसून येते. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतूदी प्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणात उपलब्ध असलेली

माहिती ही कागदपत्राच्या छायांकित प्रतीच्या स्वरुपात उपलब्ध करुन देता येते. कोणत्याही प्रकरणात निर्णय प्रक्रियेच्या संदर्भात कारण उपलब्ध करुन देणे अपेक्षित नाही. तसेच निर्णय प्रक्रियेच्या संदर्भात सुध्दा कोणतीही कार्यवाही करण्याची तरतूद अधिनियमात नाही. असे असले तरी अपीलकर्ता यांना खंड विकास अधिकारी, पंचायत समिती, भिवापूर यांनी दिनांक १८.१.२००७ रोजी कळविलेल्या पत्राप्रमाणे सेवा पुस्तकात श्री चंदनखेडे, कनिष्ठ सहाय्यक व श्री पी.जे. राठोड, तत्कालीन खंड विकास अधिकारी यांचे काळातील नोंद असलेल्या माहितीच्या छायांकित प्रती उपलब्ध झालेल्या नसल्यामुळे त्या उपलब्ध करुन देण्यात याव्यात, अशी अपीलकर्ता यांनी आयोगाकडे विनंती केली आहे. व त्याकरीता सदरचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून त्यांच्या सेवेच्या संदर्भात दिनांक १५.७.२००६ रोजी माहिती उपलब्ध झाली असली तरी श्री चंदनखेडे, कनिष्ठ सहाय्यक व श्री पी.जे. राठोड, तत्कालीन संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती भिवापूर यांच्या कालावधीत सेवा पुस्तकात झालेल्या नोंदीची माहिती हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना विना मुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) सदरच्या निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १४.१.२००९**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग खंडपीठ**
**नागपूर.**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर/अमरावती यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २३८८/२००७**

**१) श्री सचिव, श्री समर्थ वाचनालय, गाडेगांव**
**मु. गाडेगांव, पो. घोडेगांव, ता. तेल्हारा,**
**जिल्हा अकोला. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम मंडळ, अकोला,**
**बांधकाम भवन, गोरक्षण रोड, अकोला. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम उपविभाग, आकोट, ता. आकोट,**
**जिल्हा अकोला. उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक १४.१.२००९ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १८.८.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १४.१.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत. त्यांचे म्हणणे एकूण घेतले.

२. अपीलकर्ता सचिव, समर्थ वाचनालय, गाडेगांव यांनी दिनांक २३.४.२००७ रोजी माहिती अधिकारी, उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, आकोट यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

**आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल** :"मा. आमदार भाऊ साहेब पुंडकर यांच्या स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत गाडेगांव ता. तेल्हारा येथील श्री समर्थ वाचनालयाच्या इमारतीच्या बांधकाम करणे बाबत कार्यवाहीच्या सर्व पत्रव्यवहाराच्या सत्यपती मिळणेबाबत. (१)मा. आमदार श्री भाऊ साहेब पुंडकर यांचे जिल्हा नियोजन समिती अकोला यांना पत्र दिनांक २.१०.२००५ (२) मा.जिल्हाधिकारी यांचे पत्र सा.बा.वि.अकोला क्रं.नियो/कक्ष २३/आर्थिक/१०१४/२००५, दिनांक ७.११.२००५ (३) सा.बा.विभाग, अकोट यांना जा.क्रं.८२१६/४ दिनांक १८.११.२००५ (४) सा.बां.उपविभाग अभियंता अकोट यांचे पत्र १५५४, दिनांक १५.१२.२००५ (५) श्री समर्थ

वाचनालयाचे सा.बा.उपविभाग, अकोट यांना पत्र दिनांक २७.११.२००६ (६) कार्यालय उपविभागीय अभियंता सा.बां.उपविभाग, अकोट यांचे पत्र दिनांक १७.१२.२००६ (७) सचिव, श्री समर्थ वाचनालय, गाडेगांव यांचे पत्र सा.बा.उपविभाग कार्यालय, अकोट दिनांक १९.१२.२००६ " सदरची माहिती ही व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २३.४.२००७ रोजी उपविभागीय अभियंता यांनी सचिव, समर्थ वाचनालय यांना स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत गाडेगांव येथील वाचनालयाच्या बांधकामाची माहिती "नियोजन अधिकारी, नियोजन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला यांना कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अकोला यांचे पत्र क्रमांक १०९७, दिनांक १२.२.२००७ अन्वये मंजूरी करीता सादर केली आहे. अंदाजपत्रकास मंजूरी प्राप्त होताच बांधकामास सुरवात करण्यात येईल, असे कळविलेले दिसून येते." उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे दिनांक १२.६.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचे कारण हे माहिती उपलब्ध करुन घेण्यापेक्षा प्रकरणात विलंब कां होत आहे, अशा प्रकारचे कारण विचारलेले आहे. प्रथम अपीलाच्या निर्णयापुर्वी दिनांक ३०.६.२००७ रोजी पुन्हा अपीलकर्ता यांना ८ मुद्यांच्या माध्यमातून एकुण ८ पत्रांच्या सत्यप्रती उपलब्ध करुन दिलेल्या दिसून येतात. त्यानंतर अपीलाची सुनावणी होऊन दिनांक १०.७.२००७ रोजी निर्णय दिलेला असून सदरच्या निर्णयामध्ये अर्जातील मुद्या क्रमांक ६ व ८ ची माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. चर्चेअंती अपीलकर्ता यांचे विषयांकित प्रकरणी समाधान झालेले असून त्यांची कोणतीही तक्रार राहीलेली नाही असे मत सचिव, समर्थ वाचनालय, गाडेगांव यांनी व्यक्त केले. तसेच त्यांनी अपील मागे घेत असल्याचे दिनांक २.७.२००७ च्या पत्रान्वये लेखी सुध्दा दिलेले आहे. त्यामुळे सदर प्रकरणाची कार्यवाही पुर्ण झाली असल्याने सदर अपील निकाली काढले असल्याबाबत सर्वानुमते चर्चेअंती ठरले व त्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात आलेले दिसून येते. असे असले तरी पुन्हा राज्य माहिती आयोगाकडे वरीलप्रमाणे अपील दाखल केलेले दिसून येते.

३. द्वितीय अपील मेमो मध्ये प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपील करण्याचे कारणांपैकी फक्त ४ थ्या मुद्यांवर चर्चा केली. १ ते ३ मुद्यांवर चर्चा करण्यास तयार नव्हते, अशा प्रकारे द्वितीय अपीलाचे कारण दिलेले आहे. सदरचे द्वितीय अपील सचिव, समर्थ वाचनालय, गाडेगांव

यांनी दाखल केले आहे. मात्र, अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, अकोला यांचेकडे दिनांक २.७.२००७ रोजी उपरोक्त माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत समर्थ वाचनालय, गाडेगांव येथील कामाची माहिती मागितली होती, ती प्राप्त झाली असून समाधान झालले आहे. सबब, अपील मागे घेत आहे असे ग्रंथपाल यांनी लिहून दिलेले दिसून येते. व त्यात सचिव यांनी सुध्दा मुद्या क्रमांक २ ते ५ चे पत्रांच्या सत्यप्रती प्राप्त झाल्या असे लेखी दिलेले आहे. व त्यामुळे आदेशामध्ये तशा प्रकारचा उल्लेख दिलेला दिसून येतो. वास्तविक अशा प्रकारे प्रथम अपीलाच्या संदर्भात लेखी दिलेले असल्यामुळे द्वितीय अपील दाखल करण्याची आवश्यकता नव्हती. सदरच्या प्रकरणात संस्थेचे सचिव अर्ज करतात, अपील दाखल करतात. ग्रंथपाल हे प्रथम अपीलाच्या सुनावणीला हजर राहातात. व द्वितीय अपीलाच्या संदर्भात सहसचिव हजर राहातात. व प्रत्येकाने घेतलेला निर्णय दुस-यास माहिती नाही. व त्यामुळे संथेला माहितीचा अधिकार हा कलम ३ प्रमाणे देण्यात आलेला दिसून येत नाही. वरील सर्व कारणास्तव सदरचे द्वितीय अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २३.४.२००७ च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे व प्रथम अपील सुध्दा मागे घेण्यात आलेले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १४.१.२००९**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर/अमरावती यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २३८९/२००७**

**१) श्री प्रमोद शहादेवराव जायले,**
**मु.पो. आकोली ज. ता. आकोट, जि. अकोला. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,**
**अकोट, जिल्हा अकोला. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार, आकोट,**
**जिल्हा अकोला. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १४.१.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २३.८.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १४.१.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत. त्यांच्या वतीने त्यांचे प्रतिनिधी हजर आहेत. त्यांचे म्हणणे एकूण घेतले.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ७.६.२००७ रोजी माहिती अधिकारी म्हणून तहसिलदार यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

**आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल** :"मौजे पणज येथील स्व.धा.दुकानदार एम.जे.मांडवे व एस.एम.साविकार यांनी सन माहे एप्रिल २००४ ते माहे मार्च, २००७ या कालावधीमध्ये प्रत्येक महिन्या नुसार दिलेल्या सी फार्म प्रतीची झेरॅाक्स प्रती तसेच वरील कालावधीमध्ये उचल

केलेल्या राशन मालाकरीता भरलेली चलान प्रती झेरॅाक्स प्रत्येक महिन्यावाईज." सदरची माहिती व्यक्त्ीश: घेणार असे नमूद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत



माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ५.७.२००७ रोजी स्मरणपत्र दिलेले दिसून येते. त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक १७.७.२००७ रोजी उप विभागीय अधिकारी आकोट यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भात सुध्दा निर्णय न झाल्यामुळे दिनांक १३.१२.२००७ रोजी पुन्हा तहसिलदार यांचेकडे अपीलकर्ता यांनी अर्ज केलेला दिसून येतो. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २२.८.२००७ रोजी देण्यात आलेला असून माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.५.२००६ रोजी सुध्दा अर्ज करुन माहिती मागितली होती. त्या अर्जाच्या संदर्भात निरीक्षण अधिकारी यांनी दिनांक ८.६.२००७ रोजी माहिती अधिकारी तथा तहसिलदार यांना माहिती उपलब्ध करुन देण्यास मुदत वाढवून द्यावी असे कळविलेले दिसून येते. दिनांक ८.६.२००७ रोजी तहसिलदार, आकोट यांनी अव्वल कारकून (पुरवठा) तहसिल कार्यालय, आकोट यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी असे कळविलेले दिसून येते. दिनांक २१.६.२००७ रोजी निरीक्षण अधिकारी, आकोट यांनी पुन्हा मुदत वाढवून देण्यात यावी असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर पुन्हा दिनांक १९.६.२००७ रोजी अपीलकर्ता यांनी स्मरणपत्र दिल्याचे दिसून येते. परंतु, माहिती उपलब्ध झालेली दिसून येत नाही. मात्र, निरीक्षण अधिका-यांच्या पत्रावरुन असे दिसून येते की, सदरची माहिती ही दुकानदारांकडून संकलीत करुन उपलब्ध करुन द्यावी असे दिसून येते. व त्यामुळे प्रत्येक वेळेस निरीक्षण अधिकारी यांनी मुदत

वाढ मागितलेली दिसून येते. परंतु, एक वर्षाच्या वर कालावधी झाल्यावर सुध्दा माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे सदरच्या प्रकरणात संबंधीत निरीक्षण अधिकारी यांचे विरुध्द कार्यवाही करणे



आवश्यक ठरते. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत मागितलेली माहितीच्या छायांकित प्रती विनामुल्य व्यक्तीशः उपलब्ध करुन देण्यात याव्या.

२) अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांचे आदेशाप्रमाणे निरीक्षण अधिकारी यांनी आतापर्यंत उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे संबंधीत निरीक्षण अधिकारी यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२( प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येत आहे. त्यांना लागु असलेल्या सेवा नियमाप्रमाणे योग्य ती चौकशी करुन शिस्तभंगाची कार्यवाही तहसिलदार, आकोट यांनी करावी.

३) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १४.१.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर/अमरावती यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २३९४/२००७**

**१) श्री दिलीपकुमार हरीदास फुले,**
**मु.देवमुंढरी पो.खात, ता.मौदा, जि.नागपूर** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,**
**रामटेक. ता.रामटेक, जिल्हा नागपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार, मौदा,**
**जिल्हा नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १५.१.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १८.९.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १५.१.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. जन माहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी गैरहजर आहेत. त्यांचे म्हणणे एकूण घेतले.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १.६.२००७ रोजी तहसिल कार्यालय मौदा येथे राज्य जन माहिती अधिकारी यांना १७ जुलै, २००७ पासून आजपर्यंत सहपत्रात दर्शविल्याप्रमाणे एकुण १७ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती ही अपीलकर्ता यांना दिनांक १३.७.२००७ रोजी उपलब्ध करुन देण्यात आली असून अपीलकर्ता यांनी दिनांक १८.७.२००७ रोजी प्राप्त केलेली दिसून येते. सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ५.७.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दिनांक २.८.२००७ रोजी माहितीच्या अधिकारात आपण जोडपत्र २ मध्ये विचारणा केलेली माहिती तहसिलदार मौदा यांचेकडे तयार असून पोस्टाचा व झेरॅाक्सचा खर्च पाठविण्याबाबत त्यांनी त्यांचे पत्र दिनांक १९.७.२००७ अन्वये आपणास

कळविण्यात आले आहे. त्यानुसार आपण आवश्यक असलेल्या खर्चाची रक्कम तहसिलदार मौदा यांचेकडे भरणा करुन माहिती प्राप्त करुन घेण्यात यावी, असे कळविलेले दिसून येते. त्यानुसार



दिनांक ८.८.२००७ रोजी अर्जदार घरी नसल्यामुळे चष्मा करण्यात आला असा खुलासा दाखल करण्यात आलेला दिसून येतो. असे असले तरी अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. द्वितीय अपीलामध्ये आदेश मिळाले नाही, अशा प्रकारची तक्रार करण्यात आलेली दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही प्रस्तुतकार-२ यांनी उपलब्ध करुन द्यावी म्हणून दिनांक १९.६.२००७ रोजी पत्र दिलेले दिसून येते व त्या शाखेकडून माहिती उपलब्ध झाल्यावर अपीलकर्ता यांनी ती उपलब्ध करुन घेतलेली दिसून येते. अपीलकर्ता यांनी त्यांच्या माहितीच्या अर्जासोबत २ जोडपत्र जोडलेले दिसून येतात व मुद्येनिहाय माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपीलकर्ता यांच्या गांवठाणातील अतिक्रमण काढण्याचे संदर्भात तक्रार दिसून येते. परंतु, गांवठाणातील अतिक्रमण ही बाब ग्राम पंचायत स्तरावरील असल्यामुळे तशा प्रकारचे उत्तर दिलेले दिसून येते. तसेच बहुतांश मुद्ये हे प्रश्नार्थक स्वरुपात आहे. त्याबाबत सुध्दा जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यांनी वारंवार ग्राम पंचायतीला आदेश दिलेले आहे. परंतु, ग्रामपंचायत कोणत्याही प्रकारची कार्यवाही करीत नाही. त्यामुळे त्या प्रकारची माहिती सदरच्या प्रकरणात उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच तहसिलदार, मौदा यांनी राज्य माहिती आयोगाकडे खुलासा दाखल करताना श्री दिलीप कुमार हरिदास फुले यांनी माहितीच्या अधिकारात मागितलेली माहिती ही वेगवेगळया विभागांशी संबंधीत असून दाखल केलेल्या तक्रारी हया अधिकारी व कर्मचारी यांच्यावरील आकसापोटी केल्याचे दिसून येते. तहसिल व पंचायत समितीच्या संबंधीत एकुण माहितीचे १५ अर्ज असून त्याची यादी यासोबत संलग्न आहे. त्याप्रमाणे तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, पोलीस खात्याशी संबंधीत सुध्दा त्यांच्या तक्रारी आहेत. त्यांनी मागितलेल्या माहितीशी त्यांचा काही एक संबंध नसतांना सुध्दा ते माहिती मागवित असतात. सबब, आपल्या माहितीस्तव सादर करीत आहे जेणेकरुन त्यांच्या नेहमीच्याच तक्रारीने माहिती अधिका-यांना विनाकारण मानसिक त्रास सोसावा लागत आहे, तो कदाचित

कमी होईल, असे आयोगाच्या निदर्शनास आणलेले आहे. सोबत १५ माहितीच्या अर्जाची यादी त्यांनी दिलेली आहे. आजच अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक २३९३/२००७ व अपील क्रमांक



२३९५/२००७ या अपीलांची सुनावणी झाली. त्यामध्ये सुध्दा अपीलकर्ता यांनी खाजगी जागेच्या वादाच्या संदर्भामध्ये पोलीस अधिकारी व उप कार्यकारी अधिकारी वगैरे.. यांचेकडे माहिती मागितलेली आहे असे दिसून आले. उक्त अपीलात अपीलकर्त्यांच्या घराच्या नळ कनेक्शनच्या संदर्भात त्यांना खाजगी जागेत नळ कनेक्शन हवे आहे व ती जागा अतिक्रमीत आहे, असे त्यांचे म्हणणे आहे. व त्याकरीता त्यांनी हे सर्व अर्ज केलेले आहेत असे दिसून येते. परंतु, अतिक्रमण काढण्याचे अधिकार हे ग्राम पंचायतीला आहेत. त्या गांवामध्ये सी.टी.सर्व्हे झालेला नसल्यामुळे अतिक्रमण आहे किंवा नाही हे तहसिलदार यांचे कार्यालयातून सांगता येणार नाही, असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. पण वारंवार त्यांनी ग्राम पंचायतीला अतिक्रमण काढण्याबध्दल आदेश दिलेले आहेत. यावरुन माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी प्रमाणे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे हा निष्कर्ष काढावा लागतो. तसेच त्यांच्या इतर तक्रारीच्या संदर्भामध्ये योग्य त्या अधिकाराच्या तरतूदीप्रमाणे त्यांनी तक्रार करुन दाद मागून घेणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १५.१.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर/अमरावती यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २३१९/२००७**

**१) श्री उल्हाससिंह मोहनसिंह चव्हाण,**
**अनुश्री बिल्डींग क्वाटर नं.१, कांता नगर,**
**अमरावती. ..अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी,**
**अकोला. ..उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,**
**मुर्तीजापूर, जिल्हा अकोला. ..उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १५.१.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.७.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १५.१.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. जन माहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कागदपत्रे दाखल केलेली आहेत. त्यांचे म्हणणे एकूण घेतले.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २६.४.२००७ रोजी राज्य जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, मुर्तीजापूर यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

**आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल**:"आपण माझे मुलाचे जात प्रमाणपत्र प्रकरणात त्रुटी संबंधित दि. १६.३.२००७ व १३.४.२००७ चे पत्र दिले आहे. व दि. १३.४.२००७ च्या पत्रात वरिष्ठांना खोटी व दिशाभूल करणारी माहिती देवून त्यांची दिशाभूल करुन माझे वर खोटे आरोप लावले आहेत तरी आपण मला त्याचा खुलासा व आपले कडील सदर पत्रात माझेवर लावलेल्या आरोपा बाबतचे पुरावे दयावेत." सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ५.५.२००७ रोजी अपीलकर्ता यांना उपविभागीय अधिकारी, मुर्तीजापूर यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २.६.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दिनांक २१.३.२००७ रोजी

आदेश पारित करण्यात आलेला असून माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात आलेले दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी त्यांच्या दिनांक २६.४.२००७ च्या अर्जात जी माहिती मागितलेली आहे, त्यात दिनांक १६.३.२००७ व १३.४.२००७ च्या पत्रांचे अवलोकन केले असता त्यामध्ये कोणत्याही प्रकारचे आरोप केलेले आहे, असे दिसून येत नाही. अपीलकर्ता यांनी मुलाचे जात प्रमाणपत्र मिळण्यासाठी जो अर्ज सक्षम अधिका-यांकडे केलेला आहे, त्या अर्जाची छाननी करताना त्यातील असलेल्या त्रुटी हया दाखविण्यात आलेल्या दिसून येतात. व कोणत्याही प्रकरणात छाननी करताना दाखविलेल्या त्रुटी हे आरोप होत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांना दिनांक ७.५.२००७ रोजी जे उत्तर दिलेले आहे ते योग्य आहे व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १५.१.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर/अमरावती यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २२९४/२००७**
**अपील क्रमांक २२९५/२००७**

**अपील क्रमांक २२९४/२००७**
**१) श्री महेश चैतराम पाली,**
**३६६, टांगा स्टॅन्ड, धरमपेठ, नागपूर-१०. ..अपीलकर्ता**

**अपील क्रमांक २२९५/२००७**
**२) श्री बेनी महादेव सपहा,**
**भाजी मंडी, कामठी दर्गाजवळ, ता.कामठी,**
**जिल्हा नागपूर. ..अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**३) प्रथम अपीलीय अधिकारी तथा राज्य मागासवर्ग आयोग,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे, नवीन प्रशासकिय इमारत, तिसरा माळा,**
**शंशोधन अधिकारी, पुणे-१. ..उत्तरवादी**
**४) जन माहिती अधिकारी, राज्य मागासवर्ग आयोग,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे, नवीन प्रशासकिय इमारत, तिसरा माळा,**
**शंशोधन अधिकारी, पुणे-१. ..उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १९.१.२००९)**

**नि र्ण य**

दोनही अपीलकर्ता यांनी अनुक्रमे दिनांक २३.८.२००७ व २७.८.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या दोनही द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १९.१.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हे आजही गैरहजर असून पुढील पुढील तारखेची मागणी करण्यात आलेली आहे. परंतु, सदरची मागणी अमान्य करण्यात आलेली आहे.

२. **अपील क्रमांक २२९४/२००७** मध्ये श्री महेश चैतराम पाली यांनी दिनांक १६.३.२००७ रोजी जन माहिती अधिकारी, राज्य मागाववर्ग आयोग यांना मुद्येनिहाय खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

**आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल** :

"**मुद्या-१:-** धनगर (२९) तत्सम अनु.क्रं.(२२) वर नमूद **गडारिया** या जातीला, भटक्या जाती प्रवर्ग मध्ये समाविष्ट करण्याकरिता या जाती समुहाच्या, संगठन किंवा कोणी अर्ज, आवेदन

केला होता का? जर अर्ज आवेदन केला असेल तर त्याचे आवेदन पत्राची छायांकित साक्षांकित प्रत माहिती म्हणून पुरविण्याची कृपा करावी. किंवा जर **गडारिया** या जातीचे कोणीही संगठन, समुहाच्या लोकांनी अर्ज केला नसेल तर राज्य मागासवर्ग आयोग द्वारे स्वतः निर्णय व शिफारीस करुन **गडारिया** या जातीला भटक्या जाती तत्सम म्हणून समाविष्ट करण्यात आले काय? कृपया सविस्तर अचुक माहिती पुरविण्यात यावी याबाबत आवेदन.

**मुद्या-२** :- राज्य मागासवर्ग आयोग पुणे द्वारे **गडारिया** या जातीला धनगर (२९) तत्सम मध्ये समाविष्ट करण्याकरीता नियमा प्रमाणे त्या समाजाचे किंवा जातीचे किमान ५० कुटूंबाची मुलाखत अनुसूची भरुन घ्यावी लागते. त्या अनुसूची प्रमाणे, दिलेल्या जसे

अ) सर्वसाधारण माहिती :- या मध्ये दिलेल्या रकाने भरलेले

ब) शैक्षणिक माहिती :- या मध्ये दिलेल्या रकाने भरलेले

क) आर्तिक माहिती :- या मध्ये दिलेल्या रकाने भरलेले

ड) सामाजिक माहिती :- या मध्ये दिलेल्या रकाने भरलेले

इ) धार्मिक माहिती :- या मध्ये दिलेल्या रकाने भरलेले

फ) आरोग्य विषयक :- या मध्ये दिलेल्या रकाने भरलेले

व) फक्त भटक्या जमाती साठी विशेष माहिती :- या मध्ये दिलेल्या रकाने भरलेले असे ५० लोकांचे कुटूंबासाठी मुलाखत अनुसूची भरुन दिलेल्या पुर्ण ५० लोकांचे कुटूंबासाठी मुलाखत अनुसूची भरुन दिलेल्या पुर्ण ५० अनुसूचीची छायांकित व साक्षांकित प्रत माहिती म्हणुन पुरविण्यात यावी.

**मुद्या-३** :- तसेच धनगर(२९) तत्सम अनु.क्रं.(२२) **गडारिया** या जातीला भटक्या जाती मध्ये समाविष्ट करण्यासाठी राज्य मागासवर्ग आयोग महाराष्ट्र राज्य द्वारे जाती समुह किंवा संगठन अध्यक्ष किंवा अर्जदार कडून नियमानुसार प्रश्नावली भरुन मागवितात त्या प्रश्नावली मध्ये.

१) सर्वसाधारण माहती :- यामध्ये ८ प्रश्न

२) भाषा बद्यल माहिती :- या मध्ये दिलेल्या २.३ प्रश्न

३) सामाजिक माहिती :- या मध्ये दिलेल्या ३.९ प्रश्न

४) शासकिय कर्मचारी/पुढारी माहिती :- या मध्ये दिलेल्या ५ प्रश्न

| | | |
|---|---|---|
| ५) | विवाह संबंधी माहिती | :- या मध्ये दिलेले ३ प्रश्न |
| ६) | समाजातील स्थान माहिती | :- या मध्ये दिलेले ३ प्रश्न |
| ७) | शिक्षण बद्यल माहिती | :- या मध्ये दिलेले ३ प्रश्न |
| ८) | आर्थिक बद्यल माहिती | :- या मध्ये दिलेले ६ प्रश्न |
| ९) | निवासी माहिती | :- या मध्ये दिलेले ३ प्रश्न |
| १०) | धार्मिक माहिती | :- या मध्ये दिलेल्या ४ प्रश्न |
| ११) | सर्वक्षणासाठी माहिती | :- या मध्ये दिलेल्या २ प्रश्न |
| १२) | मागणी | :- या मध्ये दिलेल्या ४ प्रश्न |

वरील प्रमाणे **गडारिया** या जातीला धनगर (२९) तत्सम अनु.क्रं.२२ वर समाविष्ट करण्यासाठी समाज प्रमुख किंवा अर्जदार कडून भरुन मागीतलेली वरील प्रमाणे प्रश्नावलीची छायांकित व साक्षांकित (एक) प्रत माहिती म्हणून पुरविण्यात यावी बाबत आवेदन पत्र.

**मुद्या-४** :- तसेच **गडारिया** या जातीला धनगर तत्सम अनु.क्रं. (२२) वर नमुद करण्यासाठी राज्य मागासवर्ग आयोग द्वारे मंत्रालयाकडे करण्यात आलेले शिफारस पत्र, अहवाल, नोटींग फाईलची झेरॉक्स व साक्षांकित प्रत माहिती म्हणुन पुरविण्यात यावी बाबत अर्ज आवेदन करतो."

३. अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी दिनांक २३.५.२००७ रोजी प्रथम अपील, प्रथम अपीलीय अधिकारी, राज्य मागासवर्ग आयोग यांचेकडे दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना संशोधन अधिकारी, राज्य मागासवर्ग आयोग यांना उत्तर दिलेले दिसून येते. व यावरुन अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, माहिती ही दिशाभूल करणारी दिलेली आहे व त्याकरीता त्यांना इतर मागासवर्गीय **अ.क्रं. ३२८ गडरिया जाती** ऐवजी **भटक्या जाती धनगर तत्सम २२ गडारिया** जातीची माहिती मिळण्यासाठी त्यांनी विनंती केलेली आहे. अपीलकर्ता यांचे असे म्हणणे आहे की, आता राज्य मागासवर्ग आयोगानी त्यांना जी माहिती दिलेली आहे ती माहिती ही इतर मागास वर्गीय जातीची दिलेली आहे. परंतु, भटक्या जातीत धनगर तत्सम २२ या जातीत

गडारिया या जातीची माहिती दिलेली नाही. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

४. **अपील क्रमांक २२९५/२००७** मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १६.७.२००७ रोजी शासकिय माहिती अधिकारी तथा राज्य मागासवर्ग आयोग यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

**आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल** :

"**मुद्या क्रं.१** : धनगर २९ तत्सम अनु.क्रं.(२२) वर नमूद गडारिया या जातीला, भटक्या जाती प्रवर्गामध्ये समाविष्ट करण्याकरीता या जाती समुहाच्या समाज संघटन किंवा गडारिया जातीचे इसमांनी आपल्याकडे अर्ज आवेदन केला होता काय? जर अर्ज आवेदन केला असेल तर त्याचे आवेदन पत्राची छायांकित, साक्षांकित प्रत माहिती म्हणुन पुरविण्याची कृपा करावी.

**मुद्या क्रं.२** : गडारिया या जातीचे कोणत्या संघटन, समूहाच्या लोकांनी अर्ज केला नसेल तर राज्य मागावसर्ग आयोग द्वारे स्वत: निर्णय व शिफारशी करुन गडारिया या जातीला भटक्या तत्सम म्हणुन समाविष्ट करण्यात आले काय? कृपया सविस्तर अचुक माहिती पुरविण्यात यावी बाबत आवेदन.

**मुद्या क्रं.३** : गडारिया या जातीला धनगर २९ तत्सम अनु.क्रं.(२२) वर नमुद करण्यासाठी राज्य मागासवर्ग आयोग द्वारे मंत्रालयाकडे करण्यात आलेल्या शिफारस पत्र, अहवाल नोटिंग फाईलची झेरॅाक्स व साक्षांकित प्रत माहिती म्हणून पुरविण्यात यावी आणि गडारिया ही जात कोणत्या व्यवसाया मुळे ओळखल्या जाते. कृपया संपूर्ण माहिती देण्यात यावी."

सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ३१.७.२००७ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु, अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक ७.८.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या अनुषंगाने दिनांक १८.८.२००७ रोजी जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी यांनीच पुन्हा माहिती दिलेली आहे, असे उत्तर दिलेले दिसून येते. परंतु, अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

५.	अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, गडरिया जातीचा भटक्या जमाती (अ.क्रं.२२ वर) मध्ये शासन स्तरावरुन समावेश करण्यात आलेला आहे, ही माहिती चुकीची आहे. भटक्या जाती मध्ये समावेश केलेल्या जाती समुहास गडारिया असे म्हटलेले आहे. व त्यामुळे गडारिया या जाती समुहाची माहिती त्यांना अपेक्षित आहे. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१)	दोनही अपीलकर्त्यांची अपीले ही मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना धनगर २९ तत्सम अ.क्रं.(२२) वर नमूद गडारिया या जातीला भटक्या जाती प्रवर्गामध्ये समावेश करण्याकरीता जे शासन निर्णय झालेले असतील व ज्या आधारावर त्या जातीचा समावेश हा वरीलप्रमाणे करण्यात आलेला असेल त्या निर्णयाच्या छायांकित प्रती व इतर तत्सम कागदपत्रे यांच्या छायांकित प्रती अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत विना मुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

२)	निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १९.१.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर/अमरावती यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १८८५/२००७**
**अपील क्रमांक २५७७/२००७**
**अपील क्रमांक २५७८/२००७**

**१) श्री बाबन जयराम अतकर,**
**रा.तांदळी खु., ता.पातूर, जिल्हा अकोला. ..अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक,**
**अकोला. ..उत्तरवादी**
**३) जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,**
**बाळापूर, ता. बाळापूर, जिल्हा अकोला. ..उत्तरवादी**
**४) जन माहिती अधिकारी तथा पोलीस स्टेशन अधिकारी,**
**पातूर, ता. पातूर, जिल्हा अकोला.**

**(आदेश पारित दिनांक १९.१.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी अपील क्रमांक १८८५/२००७ मध्ये दिनांक २७.६.२००७ आणि अपील क्रमांक २५७७/२००७ व अपील क्रमांक २५७८/२००७ मध्ये दिनांक १८.१२.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये तीन द्वितीय अपील दाखल केलेले आहेत. सदरच्या तीनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक १९.१.२००७ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. तीनही अपीलांमध्ये जन माहिती अधिकारी श्री भा.वी. तवर, पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन बाळापूर हे हजर आहेत. तसेच ते प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने हजर आहेत. त्यांचे म्हणणे एकूण घेतले.

२. **अपील क्रमांक १८८५/२००७** मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १४.१२.२००५ रोजी शासकिय माहिती अधिकारी तथा पोलीस स्टेशन अधिकारी, पातूर यांचेकडे (१) "दिनांक १६.११.२००४ च्या अर्जावरुन गुन्हा दाखल न करण्याविषयी. (२) उपरोक्त ९०/०४ कलम ३७९ दाखल गुन्हयातील जप्त केलेल्या मालमत्तेची विल्हेवाट कोणत्या प्रकारे लावण्यात आली त्या बाबतची माहिती." सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक २३.४.२००७ रोजी अपीलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक, अकोला यांचेककडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम

अपीलाच्या संदर्भामध्ये दिनांक ३०.४.२००७ रोजी पोलीस अधीक्षक, अकोला यांनी पोलीस निरीक्षक तथा सहाय्यक माहिती अधिकारी यांचेकडून खुलासा मागविलेला दिसून येतो व आपलेल्या खुलाशाप्रमाणे दिनांक १६.५.२००७ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. द्वितीय अपीलामध्ये उपरोक्त ९०/०४ मधील जप्त मालमत्तेची विल्हेवाट लावण्याबाबत (२) दिनांक १६.११.२००४ च्या अर्जावरील गुन्हा दाखल न करणे(कार्यवही) अशा प्रकारचे कारण दिलेले दिसून येते. परंतु सदरच्या अपीलाच्या सुनावणीच्या वेळेस अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांच्या दिनांक १४.१२.२००५ रोजी दाखल केलेला अर्जच मिळाला नाही. मात्र, अपीलामध्ये दोनही आदेशाच्या संदर्भामध्ये जी कार्यवाही झालेली आहे त्या कार्यवाहीची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. दिनांक १४.१२.२००५ च्या अर्जाच्या संदर्भामध्ये तत्कालीन पोलीस अधीक्षक, अकोला यांनी संबंधीत पोलीस निरीक्षक यांचे विरुध्द कारवाई केलेली आहे. अपीलकर्ता यांनी ॲफिडेव्हीट दाखल केलेले आहे, परंतु त्यात कारवाई करुन आणण्याच्या दृष्टीने प्रतिज्ञापत्र दाखल केलेले दिसून येते. तसेच श्री संदिप डिगांबर गोळे यांचे सुध्दा प्रतिज्ञापत्र सादर केले आहे. सदरच्या प्रतिज्ञापत्रामध्ये चोरीच्या विषयी माहिती दिलेली आहे. सदरचा अर्ज व अपीलाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी खालीलप्रमाणे खुलासा करण्यात आलेला आहे.

**खुलासा**: "माहितीचे अर्जानुसार अपीलकर्ता यांनी खालील मुद्यांची माहितीची मागणी केली होती.

मुद्या क्रं.१:- दिनांक १६.११.२००४ च्या अर्जावरुन गुन्हा दाखल न करण्याविषयी.

मुद्या क्रं.२:- अप.नं.९०/२००४ कलम ३७९ दाखल गुन्हयातील जप्त केलेल्या मालमत्तेची विल्हेवाट कोणत्या प्रकारे लावण्यात आली त्या बाबतची माहिती.

उपराक्त मुद्यांप्रमाणे माहिती प्राप्त न झाल्याचे अपीलकर्ता यांनी दि. ९.४.२००७ रोजी १५ महिने ९ दिवसानंतर मा. पोलीस अधीक्षक अकोला यांचे नावाने एएसआय रामहरी गावंडे १०९२ यांचे विरुध्द तक्रार अर्ज सादर केला.(सहपत्र २)

तक्रार अर्ज संबंधाने अर्जाची चौकशी पोलीस निरीक्षक पो.स्टे. पातूर मार्फतीने करण्यांत येवून चौकशीअंती अपीलकर्ता श्री बाबन जयराम अतकर यांचे विरुध्द जयंत वासुदेव भोई + १ यांनी तक्रार दिल्याने अपीलकर्ता श्री बाबन जयराम अतकर व त्यांचा मुलगा रामेश्वर बाबन अतकर यांचे विरुध्द शु.नं.७०/२००७ कलम १०७, ११६(३) सीआरपीसी प्रमाणे प्रतिबंधात्मक कार्यवाही केल्याने चिडून जावून तक्रार अर्ज दिल्याचे निष्पन्न झाले.

अपीलकर्ता यांचे महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम २००२ अन्वये दि. १४.१२.२००५ चे अर्जान्वये अर्जदारास माहिती न पुरविल्याचे व दि. ९.४.२००७ रोजीचा तक्रार अर्ज संबंधाने अपीलकर्ता यांचा दि. १४.१२.२००५ चा माहितीचा विनंती अर्ज सहा.पोउपनि सहदेव ब.नं.१७०१ यांनी डे ऑफिसर डयुटी असतांना अर्ज ताब्यात घेवून सहा.पोउपनि सुखदेव ब.नं.१४८३ (बिट इन्चार्ज) यांना देण्यांत आला.

उपरोक्त माहितीचे विनंती अर्ज जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक पो.स्टे.पातूर यांना प्राप्त करवून न दिल्याने पोलीस निरीक्षक पो.स्टे. पातूर यांचे जा.क्रं.५७०/०७ दि. २३.५.२००७ प्रमाणे सहापोउपनि.सहदेव १७०१ व सहापोउपनि सुखदेव १४८३ यांचे विरुध्द कसुरी अहवाल मा. पोलीस अधीक्षक यांना सादर करण्यांत आला. कसुरी अहवालान्वये केमाअ/०५-अपील/अतरक/२००७/५० अकोला, दि. १५.६.२००७ चे आदेशा अन्वये सहापोउपनि सहदेव १७०१ व सहापोउपनि सुखदेव १४८३ यांना सक्त ताकीद ची शिक्षा देण्यांत आली (सहपत्र ३ ते ५).

अपीलकर्ता यांचे महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम २००२ चे माहितीचे विनंती अर्जानुसार माहिती प्राप्त न झाल्याने केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये दि. १४.१२.२००५ रोजी दिलेल्या माहितीच्या विनंती अर्जानुसार दि. २३.४.२००७ रोजी प्रथम अपील अर्ज १६ महिन्यांनी सादर केला. (सहपत्र ६)

अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध होण्याचे हेतूने तत्कालीन अपीलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक अकोला श्री एस.डी. वाघमारे, यांनी अपील अर्ज ताब्यात घेवून अपीलकर्ता यांना सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत कळवून जा.क्रं.केमाअ/अपील/अतकर/३८/०७, दिनांक १६.५.२००७ रोजी माहिती विहित वेळेच्या आंत पुरविण्यात आली. (सहपत्र ७ ते १०)."

४. अपीलकर्ता यांच्या दिनांक १४.१२.२००५ च्या अर्जाच्या संदर्भामध्ये सह पोलीस उपनिरीक्षक श्री सहदेव १७०१ व सह पोलीस उपनिरीक्षक सुखदेव १४८३ यांचे विरोधात कसुरी अहवाल मा. पोलीस अधीक्षक यांना सादर करण्यात आला. त्याअन्वये दिनांक १५.६.२००७ च्या आदेशान्वये सहपोलीस उपनिरीक्षक सहदेव व सुखदेव यांना सक्त ताकिदची शिक्षा देण्यात आलेली आहे. यावरुन दिनांक १४.१२.२००५ च्या अर्जाचे संदर्भात कार्यवाही झालेली आहे असे दिसून येते. व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

५. अपील क्रमांक २५७७/२००७ मध्ये दिनांक ३.९.२००७ रोजी सदर अर्जानुसार माझे चंद्रपूर जिल्हयात नोकरीवर (जि.प.) असलेल्या व तेथेच कायम स्वरुपी वास्तव्यास असलेल्या मुलावर ३१.३.२००७ ला ११ वाजता गैर अर्जदारावर गुन्हा कोणतेही बयाण न घेता १०७, ११६(३) अन्वये तहसिल कोर्टात प्रतिबंधात्मक कार्यवाही योग्य आहे काय?कसे? जर योग्य असेल तर संबंधीता विरुध्द कार्यवाही करण्यात आली काय?, अशी माहिती शासकिय माहिती अधिकारी, विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती विभाग, अमरावती यांचे कार्यालयात मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने माहिती ही जन माहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध असल्यामुळे दिनांक २३.१०.२००७ रोजी माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, बाळापूर यांनी केळविलेले दिसून येते. परंतु, सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ११.१०.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ८.११.२००७ रोजी देण्यात आलेला दिसून येतो. व त्यातही कार्यवाही करण्याचा अधिकार दंडाधिकारी यांचा असतो, असा निर्णय दिलेला दिसून येतो व अपील हे, पुरविलेली माहिती बरोबर आहे म्हणून खारीज करण्यात आलेले दिसून येते. सदरच्या अर्जानुसार उपलब्ध झालेली माहिती योग्य असल्यामुळे व प्रथम अपीलाचा निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

६. अपील क्रमांक २५७८/२००७ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २४.८.२००७ रोजी शासकिय माहिती अधिकारी तथा विशेष पोलीस महानिरीक्षक यांचेकडे (१) "मी केलेल्या दिनांक १६.११.२००४ च्या अर्जाची नक्कल माझ्या मुळ अर्जावरुन (२) दिनांक १४.१२.२००५ च्या माहिती अर्जानुसार केलेल्या अर्जाची नक्कल व संबंधीत जबाबदार यांचेविरुध्द प्रशासकिय कार्यवाही

होऊ शकते किंवा कसे, याबाबत माहिती मिळण्याबाबत" अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १८.९.२००७ अन्वये माहिती पुरविण्यात आलेली दिसून येते. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, बाळापूर यांनी माहिती पुरविण्याचे संदर्भात माहिती उपलब्ध करुन दिल्याचे दिसून येते. व या कारणास्तव सदरचे अपील हे खारीज करण्यात आलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या निर्णयाचे अवलोकन केले असता त्यामध्ये मुद्येनिहाय तपशिलात अपीलकर्त्यांच्या प्रत्येक अर्ज व गुन्हयाच्या संदर्भात विवेचन केलेले दिसून येते, व त्यामुळे सदरचे अपील सुध्दा खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपील क्रमांक १८८५/२००७, अपील क्रमांक २५७७/२००७ व अपील क्रमांक २५७८/२००७ हे खारीज करण्यात येत आहेत.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १९.१.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर/अमरावती यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**
**अपील क्रमांक २४३३/२००७**

**१) श्री शालीकराम तानबाजी बोरकर,**
**शांतीनगर हाऊसिंग कॅालनी, क्वा.नं.LIG A-५**
**पो. नयापुरा, ता.जि. नागपूर. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी, अमरावती महानगरपालिका,**
**अमरावती. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी, अमरावती महानगरपालिका**
**(Revenue Section), अमरावती. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २०.१.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २४.९.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २०.१.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत. त्यांचे म्हणणे ऐकूण घेतले.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २३.७.२००७ रोजी जन माहिती अधिकारी, अकाऊंट सेक्शन, महानगरपालिका, अमरावती यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागीतलेली दिसून येते.

Description of information required: "The flat IInd floor located in Swastik Nagar behind Garden, Amravati. (ii) The name of Real owner be provided (iii) The market value of flat as..... (iv) whether owner is residing or not."

सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २४.८.२००७ रोजी युपीसी ने प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. व त्यानंतरही कोणत्याही प्रकारची कार्यवाही झालेली नसल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

२. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना त्यांच्या दिनांक २३.७.२००७ च्या अर्जाप्रमाणे कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध झालेली नाही व प्रथम अपीलाची सुध्दा सुनावणी किंवा निर्णय झालेला नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की,

अपीलकर्ता यांना दिनांक २३.८.२००७ रोजी युपीसीने माहिती पाठविण्यात आली आहे. परंतु, तरी सुध्दा अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, सदरची माहिती त्यांना मिळालेली नाही. प्रथम अपीलाच्या संदर्भात प्रथम अपीलीय अधिकारी यांचे कार्यालयात प्रथम अपील उपलब्ध झालेले नाही असे दिसून येते. अपीलकर्ता यांनी सदरचे अपील हे युपीसीने पाठविलेले होते. यावरुन प्रथम अपीलीय अधिकारी यांचे कार्यालयात कोणत्याही प्रकारचे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे अर्ज किंवा अपीलांच्या संदर्भात स्वतंत्रपणे व्यवस्था करण्यात आलेली नाही असे दिसून येते. व त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी किंवा विभाग प्रमुख यांची याबाबतची अकार्यक्षमता दिसून येते. असे असले तरी, अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. परंतु, अजूनही अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली नसेल तर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २३.८.२००७ रोजीचे पत्र क्रमांक ३९९ हे अपीलकर्ता यांना पुन्हा उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २३.७.२००७ च्या अर्जाप्रमाणे हा निर्णय मिळाल्यापासून २३.८.२००७ रोजी पाठविलेल्या पत्राची छायांकित प्रत पुन्हा प्रत्यक्ष उपलब्ध करुन देण्यात यावी व अपीलकर्ता यांचेकडून पोच घेण्यात यावी.

२) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २०.१.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

January,०९Balki

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर/अमरावती यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २४३५/२००७**

**१) श्री  रवि गोविंदराव इंगळे,**
**संपादक, साप्ताहिक नाथ नगरीची खबर,**
**ता.मंगरुळपीर, जिल्हा वाशिम ४४४४०३.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अभियंता,**
**लघुसिंचन उपविभाग, जि.प.मंगरुळपीर,**
**ता. मंगरुळपीर, जिल्हा वाशिम.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता,**
**लघु सिंचन उपविभाग, जि.प.मंगरुळपीर, जि. वाशिम.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २०.१.२००९)**

**निर्णय**

अपीलकर्ता यांनी दिनांक २०.६.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २०.१.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी उशिराने हजर झाले.

अपीलकर्ता यांनी त्यांचे पत्र दिनांक २०.१.२००९ अन्वये आयोगाकडे "विद्यमान न्यायालयास विनंती की, दिनांक १९.१०.२००६ रोजी मागितलेली माहिती प्राप्त झाली असून माझे समाधान झाले आहे. सदर अपील खारीज करण्याची विनंती आहे," असे लेखी दिलेले असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर**
**दिनांक २०.१.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

January,०९Balki

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर/अमरावती यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २४४०/२००७**

**१) श्री रवि गोविंदराव इंगळे,**
**संपादक, साप्ताहिक नाथ नगरीची खबर,**
**ता.मंगरुळपीर, जिल्हा वाशिम ४४४४०३.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,**
**पंचायत समिती, मंगरुळपीर, ता. मंगरुळपीर, जिल्हा वाशिम.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी ,**
**पंचायत समिती, मंगरुळपीर, ता. मंगरुळपीर,**
**जिल्हा वाशिम.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २०.१.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २०.६.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २०.१.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ८.२.२००७ रोजी राज्य जन माहिती अधिकारी, पंचायत समिती, मंगरुळपीर यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

**आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल** : "थोरात साहेब, गट विस्तार अधिकारी स्वयं सहाय्यता बचत गट विभाग यांचेकडून खालील माहिती आवश्यक आहे. (१) आपण तालुक्यातील किती बचत गटांचे काम पाहली नावांची यादी (२) सन २००६ या आर्थीक वर्षात किती व कोणत्या बचत गटांना किती रुपयांचे कर्ज उपलब्ध करुन दिले (३) तालुक्यात किती बचत गट सक्रिय कामे करीत आहे यादी (४) बचत गटांना मिळणा-या सवलती व योजनांच्या नावांची यादी." सदरची माहिती टपालाद्वारे घेणार, फी भरण्यास तयार आहे व सूचना पत्र देण्याची विनंती केलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दिनांक १५.३.२००७ रोजी अपीलकर्ता यांना माहितीच्या अतिरिक्त खर्चाबाबत कळविण्यात आलेले दिसून येते. त्याप्रमाणे दिनांक

२३.३.२००७ रोजी खर्चाचा भरणा केल्याचे कळविलेले दिसून येते. व त्यानंतर माहती उपलब्ध करुन दिलेली आहे व त्यावर अपीलकर्ता यांनी पोच दिलेली आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली आहे हा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. व त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांच्या माहितीच्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २०.१.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर/अमरावती यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २५३१/२००७**

**१) श्री बबन तुळशिराम उराडे**
(द्वारा माधुरी चाफळे क्वार्टर नं.जी २०
निरी कॅालनी, दिक्षाभूमी रोड, नागपूर.) **..अपीलकर्ता**
**सद्याचा पत्ता : तुळशिनगर, खात रोड, भंडारा,**
**पो.ता.जि. भंडारा.**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी,**
**शिक्षण संचालक कार्यालय, माध्यमिक व उच्च माध्यमिक,**
**शिक्षण संचालनालय, सेंट्रल बिल्डींग, पुणे-१**
**३) जन माहिती अधिकारी ,**
**माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय,**
**सेंट्रल बिल्डींग, पुणे-१.** **..उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २१.१.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २८.९.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २१.१.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. जन माहिती अधिकारी यांचे तर्फे री सदानंद शिंदे, प्रशासन अधिकारी, शिक्षण संचालनालय, पुणे हे हजर आहेत. त्यांचे म्हणणे एकूण घेतले.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १२.४.२००७ रोजी राज्य जन माहिती अधिकारी, शिक्षण संचालक माध्यमिक व उच्च माध्यमिक कार्यालय यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

**आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल** : "श्री ए.पी. मत्ते, वि.अ. शाळा न्यायाधिकरण, नागपूर यांनी आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करुन शासकिय रक्कमेची लाखो रुपयाची अफरातफर केल्या बाबतचे प्रकरण वि.अ.यांचे निदर्शनास आणून दिल्यामुळे वि.अ.यांचे भयंकर मानसिक, आर्थिक व शारिरिक त्रास सहन करुन सदर प्रकरण गोपनिय पत्राद्वारे दिनांक २६.१२.२००६, ७.२.२००७ व दिनांक ७/४/२००७ ला आपले कार्यालयास कळवून मी माझे कर्तव्य पुर्ण केले.

परंतु आपले कार्यालयाने काय कार्यवाही केली. याबध्दल माहिती कळु शकले नाही. करीता खालील मुद्यांवर माहिती मागविण्यात येत आहे. (१) दिनांक २६.१२.२००६ चे गोपनिय पत्रातील १ ते ९ मुद्यांवर आपण कोणती कार्यवाही केली. मुद्ये निहाय माहिती द्यावी तसेच यासंबंधात संबंधीत कार्यालयाशी केलेल्या कार्यवाहीची कागदपत्राच्या प्रती देण्यात याव्या. (२) दिनांक ७.२.२००७ च्या पत्रावर आपले कार्यालयाकडून मार्गदर्शन मागविण्यात आले होते ते पत्र देण्यात आले नाही. याची माहिती तसेच त्या संबंधात केलेल्या कार्यवाहीची कागदपत्रे देण्यात यावी. आपण मार्गदर्शन न दिल्यामुळे वि.अ. यांनी बोगस देयके मंजूर केली. (३) दिनांक ७.४.२००७ च्या पत्रानुसार वि.अ.यांनी बोगस बिले मंजूर करुन उचल केली त्या संबंधात आपण केलेल्या कार्यवाहीची माहिती द्यावी. (४) श्री ए.पी. मत्ते यांनी अधिकाराचा दुरुपयोग करुन उचल केलेली रक्कम वसुल करण्याबाबत त्यांचेवर कोणती कायदेशिर कार्यवाही केली, याची माहिती देण्यात यावी." सदरची माहिती सर्वसाधारण टपालाद्वारे द्यावी असे नमूद केलेले दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ४.६.२००७ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक यांचे कार्यालयात प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाच्या अनुषंगाने सुध्दा कोणत्याही प्रकारची कार्यवाही झालेली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. सदरच्या माहितीच्या अर्जाच्या संदर्भात मात्र अपीलकर्ता यांना दिनांक १५.६.२००७ रोजी शिक्षण संचालका करीता (माध्यमिक व उच्च माध्यमिक) यांनी अपीलकर्ता यांना त्यांनी केलेल्या तक्रारीच्या चौकशीच्या संदर्भात विधी व न्याय विभागाकडून मार्गदर्शन मागणे योग्य होईल असे संचालनालयाचे दिनांक १.४.२००७ च्या पत्रान्वये शासनाकडून याबाबत मार्गदर्शन मागविण्यात आलेले आहे. शासनाकडून आदेश प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्यात येईल, असे कळविण्यात आलेले दिसून येते. तसेच राज्य माहिती आयोगाकडे जन माहिती अधिकारी यांनी जो खुलासा दाखल केला आहे तो खुलासा असंबंध्द आहे. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, दिनांक २६.१२.२००६, ६.२.२००६ व दिनांक ७.४.२००७ रोजी ज्या तक्रारी केलेल्या आहेत त्या तक्रारीच्या संदर्भात काय कार्यवाही

झाली अशा प्रकारची माहिती मागितलेली आहे. परंतु, त्या माहितीच्या वर्णनाचे कोणतेही आकलन न करता जो खुलासा दाखल केला आहे तो खुलासा सर्वस्वी गैरलागू आहे. अपीकर्ता यांनी त्यांच्या माहितीच्या अर्जामध्ये कोणत्याही प्रकारची कार्यवाहीची मागणी केलेली नाही व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी जो खुलासा दाखल केला आहे तो खुलासा विचारात घेता येत नाही. तसेच सदरच्या खुलाशामध्ये अपीलकर्ता यांच्या तक्रारीच्या संदर्भात जी पुढील कार्यवाही करण्यात आलेली आहे, त्या कार्यवाहीची माहिती देण्यात आलेली दिसून येते. परंतु, याबध्दलची कार्यवाही जन माहिती अधिकारी यांनी केलेली नाही तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा पथम अपीलाच्या संदर्भात कोणत्याही प्रकारची चौकशी केलेली नाही. यावरुन शिक्षण संचालनालयातील अधिकारी/कर्मचारी यांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदींची कोणत्याही प्रकारची माहिती नाही असा निष्कर्ष काढणे आवश्यक ठरते. व शिक्षण संचालका पर्यंत सुध्दा त्याची माहिती असु नये याबाबत खेद व्यक्त करणे क्रमप्राप्त ठरते. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी अशा प्रकारचे पदनाम आहेत. परंतु, शिक्षण संचालनालयास त्याबाबत कोणत्याही प्रकारचे ज्ञान आहे असे दिसून येत नाही. शिक्षण संचालनालयाने दिनांक १.४.२००७ रोजी पत्र पाठवून शासनाचे मार्गदर्शन मागविले आहे. परंतु, त्यानंतर सुध्दा काय कार्यवाही झाली याबध्दल कोणत्याही प्रकारची माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्याची तसदी ही शिक्षण संचालनालयाने घेतलेली दिसून येत नाही.

४. वास्तविक अपीलकर्ता यांनी जी तक्रार केलेली आहे ती गंभिर आहे व त्याबाबत कोणीही अधिकारी हे गंभीर दिसून येत नाही, असेही खेदाने म्हणावे लागते. असे असले तरी, अपीलकर्ता यांना माहिती विहित मुदतीत उपलब्ध करुन दिली नाही त्याबाबतची अनियमितता ही जन माहिती अधिकारी यांनी केलेली आहे. तसेच प्रथम अपीलाचा सुध्दा निर्णय दिलेला नसल्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन केलेले दिसून येते. असे असले तरी अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक १२.४.२००७ च्या माहितीच्या

अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक १२.४.२००७ च्या अर्जात मागितलेल्या माहिती प्रमाणे हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आंत छायांकित प्रतिच्या स्वरुपात रजिस्टर पोस्टाने, विना मुल्य माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) सदरच्या निर्णयाची एक प्रत शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, सेंट्रल बिल्डींग, म.रा. पुणे-१ यांचेकडे स्वतंत्रपणे पोस्टाने पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २१.१.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर/अमरावती यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २५४७/२००७**
**अपील क्रमांक २५४८/२००७**

**अपील क्रमांक २५४७/२००७**
**१) श्री बबन तुळशिराम उराडे**
(द्वारा माधुरी चाफळे क्वार्टर नं.जी २०
निरी कॅालनी, दिक्षाभूमी रोड, नागपूर.)
**सद्याचा पत्ता : तुळशिनगर, खात रोड, भंडारा,**
**पो.ता.जि. भंडारा.** **..अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी**
**पंचायत समिती, मौदा, ता.मौदा, जिल्हा नागपूर.**

**३) जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी,**
**ग्राम पंचायत कार्यालय, कोंदामेंढी, ता.मौदा, जि.नागपूर** **..उत्तरवादी**

**अपील क्रमांक २५४८/२००७**
**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार, मौदा,**
**ता.मैादा, जिल्हा नागपूर.**
**३) जन माहिती अधिकारी तथा तलाठी,**
**मौजा कोंदामेंढी, ता. मौदा, जिल्हा नागपूर.** **..उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २१.१.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २५.९.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केली आहेत. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक २१.१.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत. त्यांचे म्हणणे एकूण घेतले.

२. **अपील क्रमांक २४४७/२००७** : मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ३.३.२००७ रोजी ग्राम विकास अधिकारी, कोंदामेंढी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

**आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल :** (१) "महादेव सोमा बावनकुळे रा.कोंदामेंढी यांचे मृत्यूनंतर त्यांना दोन मुले श्रावण व दामोधर तसेच बयनाबाई तुळशिराम उराडे, रा. रामटेक

कौशल्याबाई हरीभाऊ रहाटे, रा. रामटेक, सुबद्राबाई भोजराम दिपटे, रा. मोहाडी व सुमत्राबाई श्रीराम मदनकर रा. असेली हया चार मुली वास्तव्यास असताना फक्त मुलांची नांवे चढविण्यात आली ती कोणत्या कागदपत्रावरुन चढविण्यात आली त्याची प्रत देण्यात यावी. (२) मुलीचे नांव वारसान मध्ये व नमूना आठ मध्ये कां दाखविण्यात आले नाही, त्याची माहिती देण्यात यावी. (३) महादेव सोमा बावनकुळे यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारसान म्हणून त्यांचे घराचे संपत्तीवर (बाजारातील नाका हया घरावर) त्यांच्या मुलींचे नांव नमूना आठ मध्ये चढवून नमुना आठची सुधारित प्रत देण्यात यावी." सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक १०.४.२००७ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक १६.५.२००७ रोजी अपीलकर्ता यांना सदरची माहिती टपालाद्वारे उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. परंतु सदरच्या उपलब्ध झालेली माहिती ही अपूर्ण असल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते. परंतु, दिनांक ८.१०.२००७ रोजी पुन्हा सादर केलैल्या अर्जान्वये व मा. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) जिल्हा परिषद, नागपूर यांनी दिनांक ६.११.२००७ रोजीचे पत्रान्वये दिलेल्या निर्देशानुसार त्यांचे मार्फत अपीलकर्ता यांना माहिती अधिकारी यांनी पुनश्च माहिती दिलेली आहे.तसेच अपीलकर्ता यांच्या दिनांक ३.१२.२००७ च्या अर्जान्वये माहिती अधिकारी तथा अधीक्षक पंचायत विभाग, जिल्हा परिषद, नागपूर यांनी त्यांना कळविले आहे असा खुलासा सादर केलेला आहे. ग्रामपंचायत कोंदामेंढी येथे माहे मार्च, २००७ मध्ये कार्यरत असलेले तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी श्री सी.एल. घोरपडे यांनी दिलेल्या लेखी निवेदना नुसार माहितीचे अधिकारा अंतर्गत मागणी केलेला रेकार्ड हा २७ वर्षा पूर्वीचा म्हणजेच सन १९७९-८०, १९८०-८१ सालचा असल्यामुळे तसेच कोंदामेढी ग्राम पंचायत येथील अतिरिक्त कार्यभार असल्यामुळे सदर रेकार्डचा शोध घेण्यास विलंब झाल्याचे लेखी दिलेले आहे. करीता अनुपालन मान्य करावे अशी विनंती केलेली दिसून येते. तसेच दिनांक ६.११.२००७ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या निर्देशानुसार पुनश्च माहिती पुरविण्यात आलेली आहे, असाही खुलासा त्यांनाी केलेला आहे. तसेच श्री सी.एल. घोरपडे, माजी ग्राम विकास अधिकारी यांनी सुध्दा आयोगाकडे तसाच खुलासा दाखल केलेला दिसून

येतो. असे असले तरी अपीलकर्ता यांचे असे म्हणणे आहे की, त्यांना अपूर्ण माहिती मिळाली. नमूना नंबर ८ मध्ये ज्या आधारावर नांवे लावण्यात आली ती कागदपत्रे उपलब्ध झालेली नाही. तसेच मुद्या क्रमांक २ व ३ मध्ये मुलींचे नांव कां लावण्यात आले नाही वगैरे त्यांनी प्रश्न विचारलेले आहे व सुधारित नमूना नंबर ८ ची प्रत देण्यात यावी अशी विनंती केलेली आहे. परंतु, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतूदी प्रमाणे कोणत्याही निर्णयाचे कारण देण्याची आवश्यकता नाही. तसेच कोणत्याही निर्णय प्रक्रियेची कार्यवाही करण्याची आवश्यकता नाही व त्यामुळे मुद्या क्रमांक २ व ३ ची माहिती उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता नाही. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, नमूना नंबर ८ शी संबंधीत कोणतेही कागदपत्र ग्राम पंचायत कार्यालयात उपलब्ध नसल्यामुळे ते उपलब्ध करुन देता येत नाही. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांचे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

३. **अपील क्रमांक २४४८/२००७ :** मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ३.३.२००७ रोजी मौजा कोंदामेंढी येथील सर्व्हे नंबर ११२,११३,४५४,४५५ व ४५६ या शेताचा चालू वर्षाचा ७/१२ ची प्रत माहिती अधिकारी तथा तलाठी मौजा कोंदामेंढी यांना मागितलेली दिसून येते. परंतु, विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक १०.४.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलावर सुध्दा कोणत्याही प्रकारची कार्यवाही प्रथम अपीलीय अधिकारी तथा मंडल अधिकारी यांनी केलेली दिसून येत नाही. व त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा अधिनियमाच्या तरतूदींचे उल्लंघन केले आहे असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. जे माहिती अधिकारी प्रथम अपीलाचा निर्णय देत नसतील तर त्यांचे विरुध्द तहसिलदार यांनी प्रशासकिय कार्यवाही करणे आवश्यक आहे. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तलाठी यांनी अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती म्हणजेच ७/१२ चा उतारा उपलब्ध करुन दिलेला नसल्यामुळे त्यांनी माहिती देण्याची टाळाटाळ केलेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो व त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तलाठी यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २०(२) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करणे

आवश्यक आहे. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे सदरचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक २४४७/२००७ मध्ये जशी आहे तशी माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपील क्रमांक २४४८/२००७ हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ३.३.२००७ रोजीच्या अर्जामध्ये मागितलेली माहिती हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत विना मुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

३) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तलाठी, कोंदामेंढी, तालुका मौदा, पो. कोंदामेंढी, जिल्हा नागपूर यांनी अपीलकर्ता यांच्या दिनांक ३.३.२००७ च्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येत आहे. सदरच्या शिस्तभंगाची कार्यवाही ही उपविभागीय अधिकारी, रामटेक यांनी करावयाची आहे. त्याकरीता निर्णयाची एक प्रत स्वतंत्रपणे पोस्टाने उपविभागीय अधिकारी, रामटेक, जि. नागपूर यांना पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी.

४) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २१.१.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर/अमरावती यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २४५५/२००७**

**१) श्री कमलकिशोर सितारामजी गुप्ता,**
**गुप्ता कॉम्पलेक्स सबनिस प्लॅाट, अमरावती-४४४६०६. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अध्यक्ष,**
**नुतन विदर्भ शिक्षण मंडळ, जोग चौक, अमरावती,**
**न्यु हायस्कुल कनिष्ठ महाविद्यालय, जोग चौक, अमरावती. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य,**
**न्यु हायस्कुल कनिष्ठ महाविद्यालय जोग चौक, अमरावती**
**ता.जि. अमरावती. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २२.१.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ९.८.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २२.१.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे कागदपत्रे दाखल झालेली आहेत. त्यांचे तर्फे व माहिती अधिकारी यांचे तर्फे ॲड. राजेंद्र पांडे हजर आहेत. त्यांनी युक्तीवाद केला.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ८.३.२००७ रोजी जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, न्यु हायस्कुल कनिष्ठ महाविद्यालय, जोग चौक, अमरावती यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

**आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल** : (१) "संस्थेने माझी नियुक्ती ज्या घटकात दाखविली होती त्या घटकाची शिखणाधिकारी मा.वि.(जि.प.) यांच्या कार्यालयात सादर केलेली यादी. (२) १०० बिंदू नामावलीनुसार वरील घटकात १९८४ पासून पदोन्नती कां दिली नाही. (३) संस्थेचे माजी विद्यार्थी अशोक अंबादास गुप्ता व दुर्गाशंकर सिताराम गुप्ता यांच्या टि.सी.उपयोग तत्कालीन मुख्याध्यापक पांडे यांनी मा. उच्य न्यायालय खंड पीठ, नागपूर येथे केला काय, कोणत्या अधिकारान्वये. (४)याचिका क्रं.४५४४/२००३ ची प्रमाणित नक्कल. (५) संस्थेने ३० जून, २००४ शासन निर्णयाला मा. उच्च न्यायालयात आवाहीत केलेल्या ३० नोव्हेंबर, २००६ निकालाची प्रत. (६) संस्थेने मला न्यु हायस्कुल (मेन) कनिष्ठ महाविद्यालयाच्या जाहिरातीनुसार

पी.टी.आय.पदावर नियुक्ती कां दिली नाही." सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केले आहे. सदरचा अर्ज दिनांक २६.३.२००७ रोजी प्राप्त झाला असे दिसून येते व त्यामुळे दिनांक २६.४.२००७ रोजी मागितलेल्या माहितीच्या करीता तत्कालीन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी, मुख्याध्यापक, न्यु हायस्कुल मेन अमरावती या नांवाने रुपये २००/- (अक्षरी रुपये दोनशे फक्त) चा धनादेश जमा करावा असे कळविलेले दिसून येते. व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी रुपये २००/- चा धनादेश जमा केलेला होता, असे त्यांनी आयोगापुढे सांगीतले. परंतु, तरीही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १८.६.२००७ रोजी प्रथम अपील केलेले दिसून येते. परंतु, प्रथम अपील हे मुदतबाहय असल्याचे कारणाने फेटाळण्यात आलेले दिसून येते. व त्यानंतर कोणत्याही प्रकारची माहिती अपीलकर्ता यांना दिलेली नाही, असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. खुलासा दाखल करताना विद्यमान माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देण्यात कां आली नाही, या बाबत कारण सांगता येत नाही असे मान्य केले आहे. परंतु, माहिती विना शुल्क उपलब्ध करुन देण्यात येईल, असे सांगीतले. संस्थेच्या तर्फे सदरच्या संस्थेला शासनाकडून कोणतेही अनुदान प्राप्त नसल्यामुळे संस्था, प्राधिकरण या व्याख्येत येत नाही, असा संस्थेतर्फे खुलासा दिलेला आहे. परंतु, कोणत्याही शासकिय संस्थेस शाळा सुरु करण्याच्या वेळेस परवानगी मिळते व त्या शाळेस अनुदान प्राप्त होते. याचा अर्थ, सदरचे अनुदान हे संस्थेसच प्राप्त होते. व त्यामुळे संस्था ही सार्वजनिक प्राधिकरण या व्याख्येत येत नाही हा खुलासा ग्राहय धरता येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांना सदरची माहिती ही छायांकित कागदपत्राच्या स्वरुपात उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. अपीलकर्ता यांनी पदोन्नती कां दिली नाही, असा प्रश्न विचारलेला आहे किंया या पदावर नियुक्ती कां दिली नाही असाही प्रश्न विचारलेला आहे. त्या संदर्भात संस्थेचे ठराव किंवा टिपणी असतील तर त्या टिपणीची कागदपत्रे उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील

व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ८.३.२००७ च्या अर्जाप्रमाणे हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत रजिस्टर पोस्टाने विना मुल्य उपलब्ध असलेली माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता यांनी माहितीच्या खर्चाकरीता दिनांक २.६.२००७ रोजी रुपये २००/- चा धनादेश दिलेला असल्यामुळे व तरीही माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे रुपये २००/- हे अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत परत करण्यात यावे.

३) सदरच्या निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २२.१.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर/अमरावती यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २४६०/२००७**

**१) श्री काशिराम राजाराम इढोळे,**
**C/o श्री ब.मा.इढोळे पाटील, प्लॉट नं.७,**
**स्वामी विवेकानंद नगर, रिसोड रोड, लाखाळा,**
**जिल्हा वाशिम. — अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,**
**पंचायत समिती, वाशिम. — उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा सचिव,**
**ग्राम पंचायत, अडोळी, ता.जि. वाशिम. — उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २२.१.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १०.९.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २२.१.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत. त्यांचे म्हणणे एकूण घेतले.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २२.५.२००७ रोजी सचिव, ग्राम पंचायत अडोळी यांचेकडे (१) माहे १ डिसेंबर, २००६ ते ३० एप्रिल, २००७ या ५ महिन्यांच्या काळात विविध फंडातून केलेल्या कामाचे व काढण्यात आलेल्या पैशाचे हिशोब (संयुक्त खातेदारांचे नांवासह व खाते क्रमांकासह). (२) स्मशान भूमीचे शेडचे कामास कोणत्या फंडातून मंजूरी मिळाली व त्या फंडातून एकुण किती रक्कम कधी काढण्यात आली. (३) सदर फंडाचे खाते कोणाचे नांवे आहे व त्या फंडात आज किती रक्कम जमा आहे, अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक २३.६.२००७ रोजी गट विकास अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. परंतु प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. सदरच्या द्वितीय अपीलाच्या सुनावणीच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे निवेदन दिलेले असून सदरच्या निवेदनामध्ये तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री अे.एन. आरु यांना अर्ज दिला होता. मुळ अर्ज ठेवून घेवून ग्राम पंचायत कर्मचारी श्री पंढरी इढोळे यांना छायांकित प्रतीवर सही करण्यास सांगितले. त्याप्रमाणे ग्राम पंचायत कर्मचा-यांनी त्यावर सही करुन ती प्रत मला दिली. त्याबध्दलचा पुरावा म्हणून संबंधीताचे दिनांक २८.१२.२००८ चे निवेदनाची छायांकित प्रत पुनश्च सोबत जोडत आहे. श्री इढोळे हे जबाबदार ग्राम पंचायत कर्मचारी असून ते ग्राम पंचायतचा टॅक्स सुध्दा स्वत:चे सहिने पावती देवून वसुली करतात. त्यामुळे माझा मुळ अर्ज कृपया ग्राहय धरण्यात यावा, ही विनंती. ग्राम पंचायत उपसरपंचासह ११ पैकी ७ सदस्यांनी दिलेले तक्रार निवेदन दिनांक २.६.२००७ मधील मुद्या क्रमांक ४ नुसार सुध्दा दिनांक २७.४.२००७ च्या ग्राम पंचायत सभेच्या दिवशी श्री ब.मा. इढोळे यांनी माहिती अधिकारा अंतर्गत दिलेले २ अर्ज श्री आरु साहेब, जन माहिती अधिकारी यांनी घेण्यास नकार दिल्याचे स्पष्ट होते. आपल्या माहितीस्तव सदर पत्र सोबत जोडले आहे. पंचायत समिती स्तरावरुन सुध्दा गट विकास अधिकारी यांचेकडून संबधीत सचिवास माहिती देण्याबाबत कोणतेही निर्देश सुमारे १८ महिन्यांपर्यत देण्यात आलेले नाही. त्यानंतर अर्थातच थोडयाच दिवसांनी पंचायत समिती मधील कामकाजाबध्दल अनियमितता व भ्रष्टाचार या यामुळे गट विकास अधिकारी श्रीमती हळदे एम.पी. हया निलंबीत झाल्या आहेत. संबंधीत माहिती मी ग्राम पंचायत सचिव हा काम पारदर्शकपणे करीत नसल्यामुळे व ते जमा खर्चाचे हिशोब देत नसल्यामुळे भ्रष्टाचार होऊ नये या प्रमाणिक उद्येशाने माहिती मागितली आहे. तरी माझ्या वरील उद्येशाचा विचार करुन जन माहिती अधिकारी श्री आरु साहेब यांनी माहिती देण्याचे टाळण्याचे उद्येशाने माहितीचा अर्ज न मिळण्याबाबत जाणूबुजून पवीत्रा घेतल्यामुळे व पुढे सुध्दा मला मागितलेली माहिती आता पर्यंत न दिल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २० प्रमाणे शास्ती करण्याकरीता ही विनंती. शासन स्तरावरुन तरी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे तरतुदींची अंमलबजावणी प्रामाणिकपणे करण्यात येवून भ्रष्टाचाराची साखळी तोडावी, ही अपेक्षा. सौ. कमल त्र्यंबक इढोळे, उपसरपंच यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद वाशिम यांचेकडे दिनांक २.६.२००७ रोजी सरपंच सौ.लिला पडधान व

प्रभारी सचिव श्री नारायण आरु यांची एकाधिकारशाही उपसरपंचा व सदस्यांना ठरावाच्या विरोधी सहया करु देण्यास मज्जाव बाबत सक्त कार्यवाही करण्याबध्दल तक्रार करण्यात आलेली दिसून येते. ग्राम पंचायत अडोली येथील सरपंचा सौ. लिला पडधान व प्रभारी सचिव श्री नारायण आरु यांनी ग्राम पंचायतीला आपली बटिक बनवून वेठीस धरले आहे, अशा प्रकारची तक्रार केलेला अर्ज जोडलेला आहे. दिनांक २८.१२.२००८ रोजी श्री उध्दव बळीराम इढोळे, सरपंच, श्री लक्ष्मण नारायण इढोळे, सदस्य, सौ. कमल त्र्यंबक इढोळे, उपसरपंच यांच्या सहया असलेले एक निवेदन आयोगाकडे दाखल करुन श्री काशीराम राजाराम इढोळे यांनी एक अर्ज, श्री बळीराम माधवराव इढोळे यांनी दोन अर्ज असे एकुण ३ अर्ज आमचे समक्ष ग्राम पंचायत कार्यालयात दिले होते. त्यावेळी श्री एन.ए.आरु यांनी त्यावर स्वत: सही न करता त्यावर ग्राम पंचायत कर्मचारी श्री पंढरी इढोळे यांस सही करण्यास सांगितले. त्याप्रमाणे श्री पंढरी इढोळे यांनी आमच्या समक्ष अर्जाच्या झेरॉक्स प्रतीवर सही दिलेली होती.

४. यावरुन असे दिसून येते की, दिनांक २.६.२००७ रोजी सरपंचा सौ. लिला पडधान होत्या. दिनांक २८.१२.२००८ रोजी उध्दव बळीराम इढोळे हे सरपंच होते. या वरुन या दोन गटामधील हा वाद दिसून येतो. दिनांक १२.१२.२००८ रोजी सचिव, ग्राम पंचायत अडोळी यांनी गट विकास अधिकारी यांना मी अडोळी ग्राम पंचायतला कार्यरत असताना माझ्या कालावधीमध्ये वरील विषयासंबंधीचा अर्ज प्राप्त झाला नाही म्हणून या विषयासंबंधीची माहिती माझ्या अगोदरचे कार्यरत ग्रामसेवक श्री एस.एस. सुरोसे यांचेकडून माहिती घ्यावी, अशी माझी धारणा आहे. मी कार्यभार जेव्हा घेतला त्यावेळी माझ्या अगोदरच्या ग्रामसेवकाने माझ्याकडे याविषयी संबंधीत प्रलंबित अर्ज प्रभारात दिला नाही. आयोगापुढे सुध्दा अर्ज त्यांचेकडे स्विकृत झालेला नाही, असेच त्यांनी दिलेले दिसून येते. विद्यमान ग्राम पंचायत सचिव यांचे असे म्हणणे आहे की, अडोळी ग्राम पंचायत मध्ये एकही ग्रामसेवक हा सलग टिकत नाही. व आलेल्या ग्रामसेवकांच्या सारख्या बदल्या होत असतात. त्याकरीता त्यांनी बदल्यांचे आदेश दाखल केले आहेत. विद्यमान ग्राम सचिवाचे म्हणणे असे आहे की, सदरच्या गांवामध्ये उपोषण करुन माझी बदली करण्यात आली होती. परंतु, त्यानंतर कोणीही ग्राम सेवक त्या ग्राम पंचायतचा पदभार घेण्यास तयार नसल्यामुळे माझ्याकडे तीन ग्राम पंचायत असून सुध्दा व मी पुर्वी तेथे होतो असताना सुध्दा

सदरच्या ग्रामपंचायतचा कार्यभार त्यांना देण्यात आलेला आहे. तसेच दिनांक २२.१.२००९ रोजीच्या पंचनाम्याबध्दल सुध्दा निवेदन ग्राम पंचायत कर्मचारी खुलासा वगैरे.. सादर केलेले दिसून येते. व त्यातही माहितीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला नव्हता, असे दिलेले दिसून येते. त्यानंतर आयोगाच्या नोटीस सोबत माहितीचा अर्ज उपलब्ध झाल्या नंतर मी माहिती देण्यासाठी अपीलकर्ता यांचेकडे गेलो असता त्यांनी माहिती घेण्यास नकार दिला. त्याबाबतचा पंचनामा दिनांक ५.१.२००९ रोजीचा दाखल केलेला दिसून येतो. त्यावर सरपंच, ग्राम पंचायत,अडोळी, उपसभापती, वाशिम वगैरे.. यांच्या सुध्दा सहया दिसून येतात. सदरची माहिती विनामुल्या असूनही घेण्यास नकार दिल्यामुळे हजर असलेल्या ग्रामस्थंचे समोर पंचानामा करुन दिनांक ७.१.२००९ रोजी ती माहिती अपीलकर्ता यांना रजिस्टर पोस्टाने पाठविली असता अद्यापर्यंत सदरची पोच अप्राप्त आहे, असा खुलासा गट विकास अधिकारी यांनी सुध्दा दिलेला आहे. सदरच्या रजिस्टर पोस्टाची पावती या ठिकाणी दाखल केली आहे. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील खारीज करणस पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २२.५.२००७ च्या अर्जाप्रमाणे माहिती रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन दिली असल्यामुळे व त्यांनी माहिती प्रत्यक्ष उपलब्ध करुन घेण्यास नकार दिला असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २२.१.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

January,०९Balki

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर/अमरावती यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २४५४/२००७**

**१) श्री दिनेश रामराव सांभारे,**
**रा. गुरुकृपा कॅालनी, डेंटल कॅालेजच्या मागे,**
**(मेहरानंद दळण केंद्राजवळ), अमरावती-४४४६०२. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी,**
**जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती.**
**ता.जि. अमरावती. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी,**
**जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २२.१.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १.८.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २२.१.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. जन माहिती अधिकारी हजर आहेत. तसेच ते प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फेही हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे कागदपत्रे दाखल करण्यात आलेली आहेत. त्यांचे म्हणणे एकूण घेतले.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३.५.२००७ रोजी जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी, यवतमाळ यांचेकडे कु. वनमाला धर्माजी नगराळे ही प्रकल्पग्रस्त उमेदेवार असल्यामळे नोंदणी रजिस्टर मधील प्रतीक्षा यादीच्या क्रमांकासह नियुक्ती प्राधिका-यांना नियुक्ती देणे संदर्भात पाठविलेल्या शिफारशीचे पत्राची साक्षांकित प्रत, स्पिड पोस्ट टपालाद्वारे घेणार, अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १२.६.२००७ रोजी प्रथम अपील, जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांचेकडे दाखल केलेली दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भात सुध्दा दिनांक १०.६.२००७ रोजी अर्जदार यांना हवी असलेली माहिती त्यांनी जिल्हा पुनर्वसन अधिकारी, यवतमाळ यांचे कार्यालयात प्रत्यक्ष उपस्थित होऊन घेऊन जावी असा निर्णय देण्यात आलेला दिसून येतो. दिनांक १०.७.२००७ रजिस्टर पोस्टाने माहिती पाठविली परंतु, तपास लागला नाही

असा शेरा लिहून पोस्टाकडून पत्र परत आले. यावरुन अपीलकर्ता यांना निर्णय उपलब्ध झाला नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलाच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी यांनी असे सांगीतले की, अपीलकर्त्यांचा दिनांक ३.५.२००७ चा अर्ज हा दिनांक ७.५.२००७ रोजी उपलब्ध झाल्यानंतर दिनांक ८.५.२००७ ला रजिस्टर पोस्टाने माहिती पाठविली होती. तपास लागला नाही असा शेरा लिहून पत्र पोस्टाकडून परत आले. तसेच दिनांक १०.८.२००७, ८.१०.२००७ व १०.१.२००८ अन्वये पोस्टाने अर्जदार यांना पत्राने कळविण्यात आले, असे सुध्दा खुलाशात नमूद केले आहे.

४. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न झालेला आहे हा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. परंतु, अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही व ती आज अपीलाच्या सुनावणीच्या वेळेस त्यांना दाखविण्यात आली. त्यावरुन अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे त्या संदर्भातील अर्ज जिल्हाधिकारी कार्यालयात केलेला असल्यामुळे व जिल्हाधिकारी कार्यालयाची पोच असल्यामुळे सदरच्या अर्जाची नोंद जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांचे कार्यालयात नसल्यामुळे त्या प्रकारचे उत्तर त्यांनी दिलेले आहे. मात्र अपीलकर्ता यांनी दिलेल्या अर्जाच्या संदर्भामध्ये जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांनी आता नोद घेतलेली आहे. कु. वनमाला धर्माजी नगराळे यांच्या नांवाची नोंदे संबंधीत प्रकल्पग्रस्त नोंदवहीमध्ये प्रतिक्षा यादीमध्ये झालेली आहे, अशी माहिती त्यांना आता देण्यात आली आहे. व त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २२.१.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर/अमरावती यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत मुळ अपील क्रमांक ३१३४/२००७ मधील पारित आदेशाचे अनुषंगाने-**

**किरकोळ अर्ज क्रं ७/२००७**

**१) श्री पी.जे. राठोड,**
**जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी(उ.श्रे.)**
**पंचायत समिती, चिखलदरा, जि. अमरावती. ..... अर्जदार**

**(आदेश पारित दिनांक २३.१.२००९)**

## नि र्ण य

अपील क्रमांक ३१३४/२००७ मध्ये दिनांक १.१.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली होती. सदरच्या सुनावणीस अपीलकर्ता व माहिती अधिकारी हे दोघेही हजर नसल्यामुळे जन माहिती अधिकारी यांना अधिनियमाचे कलम २० प्रमाणे शास्ती कां लादण्यात येवू नये अशा प्रकारचा खुलासा मागविण्यात आला होता. त्याप्रमाणे अर्जदार तथा माहिती अधिकारी यांनी दिनांक १५.११.२००८ रोजी खुलासा दिलेला आहे. व सदरच्या खुलाशाप्रमाणे तसेच अपीलकर्ता यांनी दिनांक २२.१०.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे रजिस्टर पोस्टाने सदरच्या अपीलाच्या संदर्भामध्ये "माहिती अधिका-यांनी अपीलार्थीला पुरविलेल्या माहितीमुळे अपीलार्थीचे पुर्ण समाधान झाले असून या संदर्भात अपीलार्थीची कोणतीही तक्रार राहीली नाही. त्यामुळे अपीलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले अपील क्रमांक ३१३४/२००७ अपीलार्थीला चालवायचे नाही. म्हणून अपील खारीज करण्यात यावे" अशी विनंती केलेली आहे. परंतु, सदरचे पत्र हे राज्य माहिती आयोगाचे कार्यालयात विलंबाने उपलब्ध झाले असल्यामुळे त्याबाबतची नोंद आयोगाला घेता आली नाही. यावरुन माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरच्या निर्णयातील आदेश क्रमांक २ हे रद्द करण्यात येत आहे. सदरचा निर्णय हा किरकोळ अर्जासोबत तसेच अपील क्रमांक ३१३४/२००७ च्या निर्णयासोबत दाखल करण्यात यावा.

**आदेश**

१) अपील क्रमांक ३१३४/२००७ मधील आदेश क्रमांक २ हे रद्द करण्यात येत आहे.

२) सदरच्या निर्णयाची एक प्रत जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी (उ.श्रे.), पंचायत समिती, चिखलदरा, जिल्हा अमरावती यांना पोस्टाने पाठविण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २३.१.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

January,०९Balki

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर/अमरावती यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २४०९/२००७**
**अपील क्रमांक २४१०/२००७**

**१) श्री आनंद गाडगे (ॲड.)**
**५०, नवीन सुभेदार ले आऊट,**
**नागपूर-२४. — अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्र.कुलगुरु,**
**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,**
**नागपूर. — उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा परीक्षा नियंत्रक,**
**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,**
**नागपूर. — उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २३.१.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ६.८.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केले आहे. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक २३.१.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा परीक्षा नियंत्रक हजर आहेत. प्रथम अपीलाची कागदपत्रे दाखल केली आहेत. खुलासा दाखल झालेला आहे.

२) **अपील क्रमांक २४०९/२००७** मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १६.४.२००७ रोजी प्राचार्य/संचालक, विज्ञान संस्था यांचेकडे माहिती अधिकारी म्हणून खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

**आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल** : "I want certified copy of examination form of two student of your respected institution alongwith their marklist.(Application form for summer २००७, M.Sc IInd year, Physics)
(१) Nilima G. Patil Sr.No.४ (२) Priyanka V. Tabhane Sr.No.३ - According to application card list given by college. The examination is on the face, it is requested you to make it as soon as possible."

योग्य त्या फी चा भरणा करण्यास तयार आहो, असे नमूद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २०.४.२००७ रोजी माहिती अधिकारी, विज्ञान संस्था यांनी कुलसचिव व माहिती अधिकारी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांना श्री आनंद गाडगे यांची २००७ ची माहिती पुरविण्याबाबतचा अर्ज आपणांकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे. अर्जदाराने मागितलेली माहिती ही विद्यापीठाशी संबंधीत आहे. आपण या अर्जावर योग्य ती कार्यवाही करुन अर्जदारास त्याप्रमाणे कळविण्याचे करावे, असे कळविलेले असून त्याची प्रत अपीलकर्ता यांना अग्रेषित केलेली दिसून येते. सदरचे पत्र सोबत सहपत्र म्हणून मुळ माहितीचा अर्ज दिलेला आहे. अपीलकर्ता यांनी दिनांक २४.४.२००७ रोजी एक स्मरणपत्र कुलसचिव यांना दिलेले दिसून येते. दिनांक ११.५.२००७ रोजी कुलसचिव व माहिती अधिकारी यांनी परीक्षा नियंत्रक व माहिती अधिकारी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांना अपीलकर्त्यांच्या संदर्भामध्ये माहिती ही आपल्या विभागाशी संबंधीत आहे. कृपया अर्जावर आपण कार्यवाही घेवून माहिती विषयी काय ते अर्जदारास कळवावे, असे कळविलेले दिसून येते. व सदरच्या पत्राची प्रतीलीपी अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ३१.५.२००७ रोजी परीक्षा नियंत्रक व माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना आपण मागितलेल्या माहितीच्या संदर्भात आपणास सदर माहिती गोपनिय असल्याचे कारणामुळे व दूस-या विद्यार्त्यांची असल्यामुळे माहितीच्या अधिकारातील  कलम ८(छ) च्या अनुषंगाने आपणास देता येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी, असे कळविलेले दिसून येते. त्याबाबत अपीलकर्ता यांनी दिनांक ११.६.२००७ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्र-कुलगुरु यांना सदर अर्ज परीक्षा नियंत्रक व माहिती अधिकारी यांनी पाठविला या उत्तराचे विरोधात आहे असे कळविलेले दिसून येते. तत्पुर्वी अपीलकर्ता यांनी दिनांक २८.५.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. व प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २५.६.२००६ रोजी देण्यात आलेला असून जन माहिती अधिकारी यांचा निर्णय कामय करण्यात आलेला असून अधिनियमातील तरतुदी नुसार अर्जदाराने माहिती अधिकारी, शासकिय विज्ञान संस्था, नागपूर यांचेकडून माहिती प्राप्त न झाल्यामुळे अपीलीय अधिकारी, शासकिय

विज्ञान संस्था, नागपूर यांचेकडे अपील दाखल करणे आवश्यक होते. व परीक्षा नियंत्रक व माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य असल्यामुळे दाखल करण्यात आलेले अपील खारीज करण्यात येत आहे, असा निर्णय दिलेला दिसून येतो. सदरच्या निर्णयाच्या विरुध्द अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. द्वितीय अपील मेमो मध्ये अपीलाचे कारण देताना अपीलीय अधिकारी व प्र-कुलगुरु, नागपूर विद्यापीठ यांचेकडून अपीलार्थीला पत्र, समन्स किंवा बालाविणे आले नाही. अपीलार्थीला कोणत्याही प्रकारे बाजू मांडण्याची वेळ देण्यात आली नाही. तसेच कोणत्याही प्रकारचे Hearing करण्यात आलेली नाही. तसेच त्रयस्थ पक्षाची माहिती असल्यामुळे गोपनिय स्वरुपाची माहिती पुरविणे बंधनकारक नाही. विज्ञान संस्थेने त्रयस्थ पक्षाचे अभिप्राय मागविणे आवश्यक होते. अर्जदाराने शासकिय विज्ञान संस्थेकडून माहिती प्राप्त न झाल्यामुळे अपीलीय अधिकारी, शासकिय विज्ञान संस्था यांचेकडे अपील करणे आवश्यक होते, असे कळवून प्रथम अपील नाकारले म्हणून द्वितीय अपील दाखल केले आहे.

४. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करताना विज्ञान संस्थेतील जन माहिती अधिकारी यांनी सदरचा अर्ज हा कुलसचिव यांचेकडे हस्तांतर केल्यानंतर कुलसचिवांनी तो पुन्हा परीक्षा नियंत्रक यांचेकडे हस्तांतर केला व विलंबाने माहिती उपलब्ध करुन दिली, असे आयोगाच्या निदर्शनास आणले. तसेच सदरच्या उत्तरामध्ये कोणत्याही प्रकारचे विश्लेषण, माहिती उपलब्ध नाही म्हणून दिले नाही, असे त्यांचे म्हणणे आहे. तसेच ते कोणत्या प्रकारचे गोपनिय आहे याबध्दलचे सुध्दा विश्लेषण त्यांनी दिलेले नाही. व दूस-या विद्यार्थ्याची माहिती असल्यामुळे ते अधिनियमाच्या कलम ११ प्रमाणे विचारणा करुन सुनावणी घेवून निर्णय देणे आवश्यक होते, असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु, त्याप्रमाणे कोणत्याही प्रकारची कार्यपध्दती जन माहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी केलेले नाही व ते तसे दिसून सुध्दा येत आहे. त्यावर विद्यमान परीक्षा नियंत्रक व माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही विद्यार्थ्यांच्या परीक्षेच्या संदर्भातील आहे. विद्यार्थ्यांनी परीक्षेचा फार्म भरल्यानंतर त्यावर गुप्त क्रमांक दिलेला असतो व त्यामुळै सदरची माहिती गोपनिय आहे असे कळविण्यात आले होते. असे असले तरी सदरची माहिती ही त्रयस्थ पक्षाची असल्यामुळे जन

माहिती अधिकारी यांनी त्रयस्थ पक्षास कलम ११(१) प्रमाणे विचारणे आवश्यक होते. व तसे विचारले नसल्यामुळे व आयोगासही निर्णय देण्याच्या पूर्वी अधिनियमाचे कलम १९(४) प्रमाणे त्रयस्थ पक्षाच्या संदर्भात माहिती असल्यामुळे त्यांचे म्हणणे ऐकूण घेणे हे बंधनकारक असल्यामुळे त्रयस्थ पक्षाच्या संदर्भामध्ये नोटीस काढून त्यांचे म्हणणे ऐकुण घेणे आवश्यक आहे. परंतु, आयोगानी प्रत्यक्ष ऐकूण घेतले तर त्रयस्थ पक्षाचा प्रथम अपीलाचा हक्क जातो. त्यामुळे सदरची प्रक्रिया ही जन माहिती अधिकारी तथा परीक्षा नियंत्रक यांनीच करणे आवश्यक आहे. परंतु, त्याकरीता त्रयस्थ पक्षाचा निवासाचा पत्ता हा आवश्यक आहे. अपीलकर्ता यांना त्याबाबत विचारले असता त्यांचे जवळ त्यांच्या निवासाचा पत्ता नाही व त्यामुळे विद्यार्थ्याच्या महाविद्यालयातील जो निवासाचा पत्ता दिलेला असेल त्या पत्यावर नोटीस काढून सदरची प्रक्रिया सुरु करणे या शिवाय मार्ग नाही. व त्याकरीता अंतरिम निर्णय देणे संयुक्तिक राहील.

५. **अपील क्रमांक २४१०/२००७** मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ११.५.२००७ रोजी जन माहिती अधिकारी तथा परीक्षा नियंत्रक यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागीतलेली दिसून येते.

आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल :- (१) "Certified copy of the Examination Form along with all mark sheets and submitted document therewith, and (२) On which basis the student is appearing (giving Examination) for examination of summer २००७? Is the student passed First year in Re-valuation or Re-totaling or in examination of Winter २००६?

That the description of the student given below :-

Name : Priyanka Vilas Tabhane

College : Institute of Science, Behind Nagpur University, Nagapur

College Code : ००१

Examination : M.Sc.२nd (Physics)

Year : Summer २००७."

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दिनांक ३०.५.२००७ रोजी कु. प्रियंका विलास तभाने, एम.एस्सी.भाग-१(भौतिकशास्त्र) या विद्यार्थीनीचा हिवाळी २००६ मध्ये पुनर्मुल्यांकना करीता किंवा

रिटोटलींग करीता अर्ज प्राप्त झालेला नाही. त्यामुळे हिवाळी २००६ बाबत माहिती पुरविणे शक्य नाही असे कळविलेले दिसून येते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे दिनांक ११.६.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दिनांक २५.७.२००७ रोजी अपीलीय अधिकारी व प्र-कुलगुरु यांनी निर्णय दिलेला असून अधिनियमाचे कलम ८(छ) अंतर्गत अर्जदाराला माहिी पुरविणे बंधनकारक नसल्यचा निर्णय देवून अर्जदारास माहिती पुरविता येत नाही, हा माहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय कायम ठेवून अपील निकाली काढलेले दिसून येते. व सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

६. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करताना असे सांगितले की, अधिनियमाचे कलम ८(छ) प्रमाणे कोणत्या प्रकारे माहिती गोपनिय आहे याबध्दलचे कारण दिलेले दिसून येत नाही व त्यामुळे दिलेले उत्तर हे सुसंगत नाही. त्यावर परीक्षा नियंत्रक तथा माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, सदरची माहिती ही विद्यार्थ्याची वैयक्तिक माहिती असल्यामुळे त्याच्या जीविताचा प्रश्न किंवा त्याच्या सुरक्षेचा प्रश्न उपस्थित होऊ शकतो असे जे जन माहिती अधिकारी यांचे विश्लेषण आहे, ते मान्य करता येत नाही. असे असले तरी त्रयस्थ पक्षाची माहिती असल्यामुळे मात्र त्रयस्थ पक्षाची संमती अधिनियमाच्या तरतूदीप्रमाणे घेणे आवश्यक होते. ती प्रक्रिया केलेली नसेल तर आयोगास अधिनियमाचे कलम १९(४) प्रमाणे ती प्रक्रिया करणे बंधनकारक आहे. परंतु, आयोगाने म्हणणे ऐकुण घेतल्यास प्रथम अपीलाचा हक्क जाईल व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनीच ही प्रक्रिया अधिनियमाचे कलम ११(१) प्रमाणे सुरु करणे व त्याप्रमाणे निर्णय देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अंतरिम आदेश देणे संयुक्तिक राहील.

## **अंतरिम आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक २४०९/२००७ व २५१०/२००७ मध्ये अपीलकर्ता यांनी त्यांचे अर्ज अनुक्रमे दिनांक १६.४.२००७ व ११.५.२००७ मध्ये मागितलेली माहिती ही त्रयस्थ

पक्षाची माहिती असल्यामुळे त्रयस्थ पक्षाच्या संदर्भात अधिनियमाचे कलम ११(१) प्रमाणे प्रक्रिया सुरु करुन त्याप्रमाणे निर्णय देणे संयुक्तिक राहील.

२) सदरच्या निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २३.१.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर/अमरावती यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २४६१/२००७**

**१) श्रीमती चंदा अंकुशराव कांबळे,**
**श्री रुपचंदजी भगत, टेलीकॅाम नगर, सेवाग्राम रोड,**
**वर्धा. ता.जि. वर्धा.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी ,**
**आदिवासी आयुक्तालय, आदिवासी विकास भवन,**
**गिरीपेठ, नागपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी ,**
**आदिवासी आयुक्तालय, आदिवासी विकास भवन,**
**गिरीपेठ, नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २७.१.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १२.१०.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २७.१.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता स्वत: हजर आहेत तसेच त्यांचे तर्फे ॲड. श्री जी.एन. खानझोडे हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत. त्यांचे म्हणणे एकूण घेतले.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १३.७.२००७ रोजी राज्य शासकिय माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

**आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल** : "सौ.पी.एस.पिसुडडे यांच्या विषयी माहिती मिळण्याबाबत. (१) प्रथम नियुक्त कोणत्या पदावर झाली त्या आर्डरची सत्यप्रत. (२) त्यांना महिला अधीक्षिका या पदावर केव्हा सामावून घेण्यात आले ती ऑर्डरची सत्यप्रत (३) तीला प्राथमिक शिक्षक बनविण्यात आले काय? आल्यास कोणत्या (नियमाखाली) नियमानुसार बनविण्यात आले ती ऑर्डर सत्यप्रत (४) त्यांच्या सर्व्हीस बुकाच्या प्रथम नियुक्ती असलेल्या १ व २ पेज नं.उतारा सत्यप्रत (५) ती शिक्षीका सध्या कोणत्या पदावर कार्यरत आहे ती माहिती." सदरची माहिती व्यक्तीश: आवश्यक आहे, असे नमूद केले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ३.९.२००७ रोजी प्रथम अपील दाखल

केलेले दिसून येते. प्रथम अपीला नंतर सुध्दा माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. सदरची मागितलेली माहिती ही त्रयस्थ पक्षाची माहिती असल्यामुळे अधिनियमाचे कलम ११ प्रमाणे त्रयस्थ पक्षाची संमती घेणे हे बंधनकारक असते. परंतु, तशा प्रकारची कोणतीही कार्यवाही तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी केलेली नाही. मात्र, अपीलकर्ता यांना दिनांक ३०.६.२००७ रोजी कार्यासन क्रं.४ आस्थापना यांना सदरची माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता पत्र पाठविलेले दिसून येते व सदरच्या पत्राची प्रतिलीपी अपीलकर्ता यांना दिलेली दिसून येते. परंतु सदरचे पत्र अपीलकर्ता यांना उपलब्ध झाले नाही, असे त्यांचे म्हणणे आहे. व त्याकरीता जावक नोंदवहीचा पुरावा सुध्दा सादर केलेला नाही. त्यानंतर सदरच्या मागितलेल्या माहिती पैकी दिनांक ७.११.२००७ रोजी प्रथम नियुक्ती आदेशाची प्रत उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तसेच सेवा पुस्तकाच्या संदर्भातील उतारा सुध्दा उपलब्ध करुन दिलेला दिसून येतो. व इतर माहिती त्यांना दिलेली नाही. असे असले तरी अपीलकर्ता यांनी तोंडी असे सांगितले की, सेवाभरती नियमाची प्रत त्यांना उपलब्ध झाल्यास त्यांची कोणतीही तक्रार असणार नाही व त्याकरीता अपीलकर्ता यांना सेवा भरतीच्या नियमाची तसे समायोजनाच्या आदेशाची प्रत उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना सेवा भरती नियमाची प्रत तसेच सौ. पी.एस. पिसुडडे यांचे समायोजन केले असल्यास त्याबाबतच्या आदेशाची प्रत ही रजिस्टर पोस्टाने, विना मुल्य हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २७.१.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर/अमरावती यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २५२७/२००७**

**१) श्री भाष्कर मिठूजी डोंगरे,**
**कस्तुरबाँ वार्ड (क्रिष्णापूरा) गोंदिया,**
**(पंचशिला झेंडयाजवळ) ता.जि. गोंदिया-४४१६०१. ..अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा सचिव,**
**महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ तांत्रिक कर्मचारी सहकारी**
**क्रेडिट सोसायटी लि. भंडारा, मुस्लीम लायब्ररी चौक,**
**भंडारा -४४१९०६. ..उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी**
**महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ तांत्रिक कर्मचारी सहकारी**
**क्रेडिट सोसायटी लि. भंडारा, मुस्लीम लायब्ररी चौक,**
**भंडारा -४४१९०६. ..उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २७.१.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३.१०.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २७.१.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी यांचे तर्फे ॲड. एम.एल. भूरे हजर आहेत. त्यांचे म्हणणे एकूण घेतले.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १२.६.२००७ रोजी माहिती अधिकारी म्हणून व्यवस्थापक, महाराष्ट्र विद्युत मंडळ तांत्रिक कर्मचारी सहकारी पत पेढी, भंडारा यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली असून सदरची माहिती पोस्टाने घेणार असे नमूद केलेले दिसून येते. सदरची माहिती पोस्टाने घेणार असे नमूद केले आहे.

**आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल:** (१) "Share matter from the date of membership to June, २००७. (२) Divident matter year २००० to २००६ = ७ years. (३) R.D.matter १९९५ to June २००७ = १२ years. (i) Total share amount deposited in favou of Shri Amrut Damaji Gharde from the date of membership to June, २००७. (ii) Total amount of dividend in favour of

Shri Amrut Damaji Gharde for the period of ७ years. (iii) Total amount of R.D. A/c A/cs with the maturity and non maturity from १९९५ June, २००७ with account number."

३ विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.७.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये कोणताही निर्णय दिलेला नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाच्या संदर्भामध्ये उत्तरवादी यांनी खालीलप्रमाणे खुलासा दाखल केला आहे व सोबत श्री अमृत दामाजी घरडे, ज्यांच्या संदर्भात माहिती मागितलेली आहे त्यांना दिनांक २०.१२.२००५ व १०.३.२००६ रोजी दिलेल्या पत्राची व उपलब्ध करुन दिलेल्या माहिती बध्दलची पत्र दाखल केलेली आहेत.

खुलासा : "प्रतिवादी आदरणिय माहिती आयोगाला येथे सविनय कळवितो की, श्री घरडे यांनी दिनांक १५.१२.२००५ च्या पत्राद्वारे त्यांना लागणारी माहिती आम्ही प्रतिवादी दिनांक २०.१२.२००५ च्या पत्रांद्वारे यांना संपूर्ण माहिती आवश्यक असलेल्या कागदपत्रांसोबत पुरविलेली आहे. (२) तरीही श्री घरडे यांनी वेळोवेळी पुन्हा पुन्हा तीच माहिती मागितली व त्यावर संस्थेने दि. १० मार्च, २००६ च्या पत्राद्वारे श्री घरडे यांनी सूचित केले की, आम्ही तुम्हांला आधीच संपूर्ण माहिती पुरविलेली असून पुन्हा पुन्हा तीच माहिती पुरविणार नाही.(३) आदरणिय माहिती आयोगाला प्रतिवादी येथे हि महत्वाची बाब लक्षांत आणून देत आहे की, श्री अमृत दामाजी घरडे यांनी को-ऑपरेटिव्ह कोर्टात संस्थेविरुध्द खोटी तक्रार केली ती आदरणिय कोर्टाने दिनांक १.३.२००५ ला फेटाळून लावली. (४) यात काही वाद नाही की, श्री डोंगरे यांनी आम्हाला श्री अमृत दामाजी घरडे यांच्या लोन अकाऊंट बध्दल पत्रव्यवहार करुन माहिती मागितली. परंतु बँकिंग रुलनुसार आम्ही श्री घरडे यांच्या पर्सनल अकाऊंटची माहिती कोणीही तिस-या व्यक्तीला देऊ शकत नाही व ती दिलीही नाही.(५) श्री अमृत दामाजी घरडे हे आमच्या संस्थेचे कर्मचारी सभासद होते व त्यामुळे त्यांनी केलेल्या व मागितलेल्या माहितीनुसार पत्रव्यवहाराद्वारे त्यांना आम्ही संपूर्ण माहिती पुरविलेली आहे. संस्थेने तरीही त्यांच्या असमाधानासाठी त्यांनी कधीही संस्थेत येऊन त्यांना आवश्यक असलेली कुठल्याही स्वरुपाची माहिती घेण्याची त्यांना

मुभा दिलेली आहे. तरीही आदरणिय आयोगाने हे लक्षात घ्यावे की, श्री घरडे हे आजपावेतो एकदाही संस्थेत आलेले नाहीत. (६) संस्थेने पाठविलेल्या संपूर्ण माहितीची पोचपावती येथे सोबत जोडलेली आहे. श्री डोंगरे हे या केसमध्ये असलेले Third Person आहेत म्हणून त्यांना कोणाचीही personal loan account ची माहिती आम्हाला देता येत नाही."

४. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करताना असे सांगितले की, ज्या श्री अमृत दामाजी घरडे यांची माहिती त्यांनी मागितली आहे ते त्यांचे मामेभाऊ आहे. व यावरुनच श्री घरडे यांना सर्व माहिती उपलब्ध झालेली असून सुध्दा व ही बाब श्री घरडे यांना माहिती असून सुध्दा किंवा अपीलकर्ता यांना माहिती असून सुध्दा त्यांच्याकडे माहिती ते पुन्हा मागत आहे. यावरुन माहिती मागण्याचा उद्येश हा दिसून येतो. दिनांक १०.३.२००६ रोजी श्री अमृत दामाजी घरडे यांना पुन्हा पुन्हा माहिती मागल्याबध्दल व्यवस्थापक यांनी कळविलेले दिसून येते. व त्यानंतरच अपीलकर्ता यांनी ही माहिती मागितलेली दिसून येते. असे असले तरी सदरची माहिती ही निश्चितच त्रयस्थ पक्षाची माहिती आहे, हे सकृत दर्शनी दिसून येते. व तसे अपीलकर्ता यांच्या आयोगापुढील युक्तीवादावरुन सुध्दा दिसून येते. अपीलकर्ता हे सदरच्या सार्वजनिक प्राधिकरणाच्या म्हणजेच पतपेढीचे सदस्य नाही. अधिनियमाचे कलम ६ प्रमाणे अर्जदारास माहितीच्या संदर्भातील कारण जरी विचारता येत नसले तरी सुध्दा त्रयस्थ पक्षाची माहिती असल्यामुळे जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक यांनी अधिनियमाचे कलम ११ प्रमाणे श्री घरडे यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी किंवा नाही याबध्दल प्रक्रिया सुरु करणे आवश्यक होते. कारण रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ॲक्ट प्रमाणे किंवा बँकींग रेग्युलेशन ॲक्ट प्रमाणे कोणत्याही बँकेतील किंवा सहकारी पत पेढीतील माहिती ही खातेदारांची वैयक्तिक माहिती असल्यामुळे त्रयस्थ पक्षास उपलब्ध करुन देण्यास मनाई केलेली आहे व त्यामुळे जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक यांनी श्री अमृत दामाजी घरडे यांना त्यांच्या बध्दलची माहिती ही अपीलकर्ता अर्जदार यांना उपलब्ध करुन द्यावी किंवा नाही याबध्दल प्रक्रिया सुरु करणे

आवश्यक राहील व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक यांनी, अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती त्रयस्थ पक्षाची माहिती असल्यामुळे अधिनियमाच्या कलम ११(१) प्रमाणे कार्यवाही करुन त्याबध्दलचा निर्णय घेणे योग्य राहील.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २७.१.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २५३९/२००७**

**१) श्री अंबादास पैकुजी बोंदरे,**
**२०९, गोकुळपेठ, नागपूर-१०.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी,**
**माध्यमिक शिक्षण विभाग, जि.प. नागपूर.** **उत्तरवादी क्रं.१**

**३) जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक,**
**माध्यमिक शिक्षण विभाग, जि.प. नागपूर.** **उत्तरवादी क्रं.२**

**(आदेश पारित दिनांक २८.१.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ८.१०.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या अपीलाची अंतिम सुनावणी आज २८.१.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता श्री अंबादास पैकूजी बोंदरे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी हजर आहेत.

२. सदरील अपील क्रमांक २५३९/२००७ मध्ये दिनांक ७.१.२००९ रोजी सुनावणी ठेवण्यात आली होती. त्यासंदर्भामध्ये अंतरिम आदेश पारित करण्यात आला असून अपीलकर्ता यांचे म्हणण्यानुसार त्यांना काही माहिती मिळाली व काही माहिती अजून मिळालेली नाही. त्याबाबत त्यांना जी माहिती मिळाली नाही त्या दस्तऐवजाची त्यांनी यादी तयार करुन उपशिक्षणाधिकारी यांचेकडे दिली असून त्या यादीनुसार माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी यांनी कबूल केले आहे. यादीप्रमाणे माहिती आजपासून ८ दिवसांच्या आंत अपीलकर्ता यांना देण्यात यावी व त्याकरीता अपीलाची अंतिम सुनावणीची तारीख २८.१.२००९ रोजी सकाळी १०.०० वाजता देण्यात येत आहे, असे अंतरिम आदेश देण्यात आले होते. त्याप्रमाणे दिनांक १६.१.२००९ रोजी अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),

जिल्हा परिषद, नागपूर यांनी अपीलकर्ता यांना मुद्या क्रमांक १ ते ३ प्रमाणे उपलब्ध असलेल्या आदेशाच्या छायांकित प्रती पंजीबध्द डाकेने उपलब्ध करुन दिलेल्या आहेत, असे त्यांनी दाखल



केलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते. तसेच अपीलकर्ता हे सुध्दा आज हजर नसल्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध झालेली आहे, असे गृहित धरुन सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना दिनांक १६.१.२००९ च्या पंजिकृत पत्राप्रमाणे माहिती उपलब्ध झालेली आहे असे गृहित धरुन सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २८.१.२००९**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर/अमरावती यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २५०४/२००७**

**१) श्री एच.एन. गवई,**
**कार्यालय, समाज कल्याण अधिकारी,**
**जिल्हा परिषद, वर्धा.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी, अपंग कल्याण आयुक्तालय, पुणे,**
**३ चर्च रोड, पुणे-१.**
**३) जन माहिती अधिकारी, विभागीय समाज कल्याण कार्यालय,**
**नागपूर विभाग, नागपूर सदर, नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २८.१.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १०.१०.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २८.१.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा विभागीय समाज कल्याण अधिकारी श्री एम.बी.शेल्टे हजर आहेत. त्यांचे म्हणणे ऐकूण घेतले.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १३.७.२००७ रोजी (अर्जावरील स्वाक्षरीखाली दिनांक १३.८.२००७ व जन माहीती अधिकारी यांचे कार्यालयात प्राप्त दिनांक २२.८.२००७) जन माहिती अधिकारी म्हणून विभागीय समाज कल्याण अधिकारी, नागपूर विभाग यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. माहितीचा कालावधी १०.११.२००५ ते १३.७.२००७ असा दिलेला असून सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले दिसून येते.

**आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन** :"मा.आयुक्त अपंग कल्याण, म.रा.पूणे यांचे कारणे दाखवा नोटीस दि. ३.७.२००७ अन्वये आपण मा. आयुक्त महोदयांनी अपंग बोगस ओळखपत्रा बाबत अहवाल सादर केलेला होता. त्या अनुषंगाने मला उपरोक्त दिनांकान्वये कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली आहे. त्या बाबत माझे स्वाक्षरीनिशी एकुण तपासणी अंती किती अपंग

बोगस ओळखपत्र आढळून आले त्याबाबतची संख्या व साक्षांकित झेरॉक्स प्रति मला देण्यात याव्यात, ही विनंती."

// २ //

३. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दिनांक ४.९.२००७ रोजीचे पत्रान्वये सदरची मागणी ही चौकशी प्रकरणाच्या संदर्भात असल्यामुळे माहिती द्यावी किंवा कसे याबाबत मार्गदर्शन मागितले आहे. व त्या पत्राची प्रत अर्जदाराला दिलेली आहे, असे दिसून येते. व मा.आयुक्त, अपंग कल्याण आयुक्तालय यांचे अभिप्राय प्राप्त होताच आपणास माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल, असे कळविलेले दिसून येते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १३.८.२००७ रोजी आयुक्त, अपंग कल्याण, म.रा.पुणे यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भात सुध्दा कोणताही निर्णय दिलेला दिसून येत नाही. व त्यामुळेच अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

४. द्वितीय अपील मेमो मध्ये एक महिन्याच्या वर वेळ होऊनही त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही असे नमूद केले आहे. जन माहिती अधिकारी यांनी खुलासा केला की, अपीलकर्ता यांना दिनांक २४.७.२००७ च्या आदेशाप्रमाणे निलंबित करण्यात आलेले असून त्यांचे विरुध्द विभागीय चौकशी सुरु आहे. व त्यामुळे त्यांना सदरची माहिती उपलब्ध करुन देण्याबध्दल आयुक्त कार्यालयाचे मार्गदर्शन मागितले होते. तसेच त्यांची विभागीय चौकशी सुरु असल्यामुळे प्रथम अपीलाची सुनावणी घेवून निर्णय देण्याची आवश्यकता नाही म्हणून निर्णय देण्यात आला नाही. व त्यामुळेच अपीलकर्ता यांना दिनांक ४.९.२००७ रोजी जी प्रत उपलब्ध करुन दिलेली आहे ती माहितीच उपलब्ध करुन दिलेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो व अधिनियमाच्या कलम ८(ज) प्रमाणे कोणत्याही प्रकारची चौकशी सुरु असेल तर चौकशीच्या कालावधीमध्ये माहिती उपलब्ध करुन देण्यास अपवाद करण्यात आलेला आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक २८.१.२००९**

**(विलास पाटील)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर/अमरावती यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २५११/२००७**

**१) श्री राजु किसन वानखेडे,**
**श्रीराम वार्ड, बल्लारपूर, ता.बल्लारपूर,**
**जिल्हा चंद्रपूर.** **अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक निबंधक,**
**सहकारी संस्था, तालुका चंद्रपूर, प्रशासकिय इमारत,**
**बस स्टँडचे समोर, ता.जि. चंद्रपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी,**
**श्रीराम नागरी सहकारी पत संस्था मर्या.,**
**गुप्ता बिल्डींग, कॅालरी रोड, बल्लारपूर,**
**ता. बल्लारपूर, जिल्हा चंद्रपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २९.१.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.१०.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २९.१.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत. त्यांचे म्हणणे एकूण घेतले.

**२.** अपीलकर्ता यांनी दिनांक ७.६.२००७ रोजी व्यवस्थापक, श्रीराम नागरी सहकारी पत संस्था मर्या. यांचेकडे जन माहिती अधिकारी म्हणून खालीलप्रमाणे चार मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते.

आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन : "सन १९९३ पासून आतापर्यंत पुढीलप्रमाणे माहिती पाहिजे. (१) कोणत्या कारणासाठी श्री सरपाते, सहा.अधिकारी, स.संस्था ता. चंद्रपूर यांची प्रशासक म्हणून नेमणुक करण्यात आली. (xerox) (२) श्री सरपाते यांची प्रशासक म्हणून

नेमणुक झाल्यावर आपल्या कार्यालयातर्फे त्यांना देण्यात आलेल्या स्थगनादेशची प्रत (xerox) (३) आपण सहा.निबंधक, सह.संस्था, ता. चंद्रपूर कार्यालयाला स्थगनादेश प्रत दिल्यानंतर त्यांनी



आपल्याला दिलेल्या आदेशाची प्रत (xerox) (४) आपल्या कार्यालयातील कर्मचारी व अधिकारी यांनी रक्कमेची अफरातफर केल्यानंतर त्यांचे कडून घेण्यात आलेल्या शपथपत्रांची (xerox) (श्री हरडे, श्री पांडे, री तांश, श्री पायताडे)." सदरची माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमूद केले आहे. परंतु, विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक ९.७.२००७ रोजी अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक निबंधक यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाच्या अनुषंगाने दिनांक २७.७.२००७ रोजी अपीलकर्ता यांना, सहकारी पत संस्थांना हा अधिनियम लागू होत नाही, असे कळविलेले दिसून येते. परंतु, त्यानंतर दिनांक २१.८.२००७ रोजी अपीलकर्ता यांनी माहिती आयुक्त यांना तक्रार केलेली दिसून येते. सदर तक्रारीच्या संदर्भामध्ये द्वितीय अपील दाखल करावे, असे अपीलकर्ता यांना कळविण्यात आलेले असल्यामुळे त्यांनी द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

**३.** परंतु, आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्यानंतर अपीलाच्या सुनावणीचे पत्र आल्यानंतर दिनांक २८.१२.२००८ रोजी अपीलकर्ता व संबंधीत संस्थेची सुनावणी संस्थेच्या कार्यालयात घेवून अर्जदाराला हवी असलेली माहिती विना मुल्य पुरविण्याचे या कार्यालयाने आदेशित केले आहे. व त्याप्रमाणे संस्थेने श्री वानखेडे यांनी मागितलेली संपूर्ण माहिती माझे समक्ष पुरविली व तसे अर्जदाराने त्यांना माहिती प्राप्त झाल्याचे लेखी कबुल सुध्दा केले आहे, असा खुलासा आयोगाकडे सादर केला आहे.

**४.** अपीलकर्ता यांनी, माहिती उपलब्ध झालेली असली तरी व्यवस्थापकांचे प्रतिज्ञा पत्राची छायांकित प्रत त्यांना उपलब्ध झालेली नाही, असे त्यांचे म्हणणे आहे. व्यवस्थापक तथा माहिती अधिकारी यांना विचारले असता त्यांनी असे सांगितले की, प्रतिज्ञा पत्र केले होते व ते संस्थेच्या अध्यक्षाकडे जमा केले होते. त्यांनी केलेल्या अफरातफरी बध्दल पैशांचा भरणा केला असल्यामुळे अध्यक्षांनी सदरचे प्रतिज्ञापत्र हे नष्ट केले असावे, असे त्यांनी आयोगास सांगितले. व तसे ते अपीलकर्ता यांना लेखी देण्यास सुध्दा तयार आहे, असे त्यांनी आयोगास सांगितले. व

त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत आयोगापुढे त्यांच्या शपथपत्राबध्दल जी माहिती दिलेली आहे ती जशीच्या तशी लेखी, संस्थेच्या पत्रावर प्रमाणिम करुन विना मुल्य, रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक हे अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे शास्तीस पात्र राहातील.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २९.१.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर/अमरावती यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २५४७/२००७**

**१) श्री राजू राहुलकर,**
**कार्यालय-शेठ प्रताप वार्ड, गर्ल्स कॅालेज रोड,**
**गजानन स्टोर्स के सामने , गोंदिया, ता.जि. गोंदिया. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा.प्र.)**
**नगर पालिका प्रशासन, नागपूर. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी,**
**नगर परिषद, गोंदिया, ता.जि. गोंदिया. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २९.१.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ४.१०.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये व्दितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या व्दितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २९.१.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हजर असून कागदपत्रे दाखल केली आहेत. जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी यांना सदरच्या अपीलाच्या सुनावणी करीता दिनांक १५.१२.२००८ रोजी आयोगाचे कार्यालयातून नोटीस काढण्यात आली होती. परंतु, दिनांक ८.१.२००९ रोजी शासकिय सुटी असल्यामुळे पुढे ढकलण्याचे पत्र निर्गमित करण्यात आले होते व पुढील तारीख ही दिनांक २९.१.२००७ देण्यात आली होती. परंतु, जन माहिती अधिकारी हजर नाही हा त्यांचा बेजबाबदारपणा दिसून येतो. परंतु त्यांनी दूरध्वनीवरुन मा. आयुक्तांचा दौरा असल्यामुळे उपस्थित राहू शकत नाही असे कळविण्यांत आले आहे.

**२.** अपीलकर्ता यांनी दिनांक २९.१.२००७ रोजी शासकिय माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद गोंदिया यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

**आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन** : "सार्वजनिक शौचालय होण्याबाबत व न.प.निधी रस्ता अनुदान. माहितीचा कालावधी- २०.१०.२००६ ते आज पर्यंत. प्रभाग क्रं. १ वल्लभभाई वार्ड येथील N.M.D. कॅालेज समोरील श्री जगने, रंगारी (खेमराज) यांच्या घरा समोर सार्वजनिक संडास तोडण्यात आली. त्याचे वर्क ऑर्डर किंवा तोडण्याचे आदेश, जागेचा नकाशा, नत्थू नेवारे यांनी दान दिलेल्या जागेचा दान पत्र, न.प.ने. कोर्टातून जिंकले त्याचे संपूर्ण कागदपत्रे क्रमांक नपगो/प्रकिर्ण/८३६/२००६ चे निविदाचा तुलनात्मक तक्ता." सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दिनांक २७.२.२००७ रोजी अपीलकर्ता यांना नगर परिषद अभियंता, नगर परिषद, गोंदिया यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक ५.३.२००७ रोजी प्रथम अपील हे जिल्हाधिकारी यांचेकडे दाखल केले होते. परंतु, अपीलीय अधिकारी हे उपआयुक्त, नगर पालिका प्रशासन हे असल्यामुळे सदरचे अपील त्यांचेकडे हस्तांतर करण्यात आले होते. व सदरच्या अपीलाचा निर्णय दिनांक ७.४.२००७ रोजी देण्यात आलेला असून माहिती पुरविली असल्यामुळे अपीलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीकरीता नगर पालिका प्रशासनामधील अभिलेखे तपासणी करीता उपलब्ध करुन देण्यात यावे. अपीलार्थीनी अभिलेख्यांची तपासणी केल्यानंतर त्यांना आवश्यक असलेलया माहिती करीता त्यांनी माहिती अधिकारी, नगर परिषद, गोंदिया यांचेकडे अर्ज सादर करावा. अर्ज प्राप्त झाल्यापासून ७ दिवसांचे आत विना मुल्य माहिती उपलब्ध करुन द्यावी, अशा प्रकारचे आदेश दिलेले दिसून येते. परंतु सदरच्या आदेशाप्रमाणे अपीलकर्ता यांनी मात्र अभिलेख्यांची तपासणी केलेली दिसून येत नाही व माहिती करीता दिनांक ४.१०.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी सुरुवातीला त्यांना कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध झालेली नाही असे सांगितले. परंतु, जन माहिती अधिकारी, नगर परिषद यांनी दिनांक २७.२.२००७ रोजी जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्यामध्ये कोणत्याही प्रकारचे कार्यआदेश दिलेले नसल्यामुळे

कागदपत्रे उपलब्ध नाही व निविदा सुध्दा रद्द करण्यात आलेल्या आहेत, असे उत्तर दिलेले आहे. वास्तविक, सदरच्या उत्तराच्या नंतर अपीलार्थींना प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे



अभिलेख्यांची तपासणी करुन स्वत:चे समाधान करुन घेता आले असते. कार्यादेश उपलब्ध नाही असे कळविण्यात आले असल्यामुळे जर कार्यादेश उपलब्ध झाले असते तर अपीलार्थीस खोटी माहिती दिली असा निष्कर्ष काढता आला असता. व त्यामुळे अपीलकर्ता यांना अजूनही त्यांना उपलब्ध झालेल्या माहिती बध्दल काही शंका येत असल्यास त्यांनी नगर परिषदे मधील संबंधीत नस्तींची पाहाणी करुन स्वत:ची खात्री करुन घेणे संयुक्तिक राहील. प्रथम अपीलाचा निर्णय योग्य दिसून येतो. व सदरच्या निर्णयाचे पालन हे अपीलकर्ता यांनी करणे संयुक्तिक राहील. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांच्या प्रथम अपीलाचा निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २९.१.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर/अमरावती यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २५५४/२००७**

**१) श्री चंद्रशेखर मोतीराम बावनकर,**
**महात्मा फुले वार्ड, पवनी, ता.पवनी, जि. भंडारा. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपआयुक्त,**
**नगर पालिका प्रशासन, नागपूर. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी,**
**नगर परिषद कार्यालय, पवनी, ता. पवनी, जि. भंडारा. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २९.१.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २.११.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २९.१.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत. त्यांचे म्हणणे एकूण घेतले.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २३.५.२००७ रोजी शासकिय माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, पवनी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्त्तीशः किंवा लेखी स्वरुपात घेणार असे नमूद केलेले दिसून येते.

**आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन** : "अवैद्य विनामंजूरीचे बांधकाम काढून टाकण्याबाबत दिलेल्या अर्जाच्या संबंधात केलेल्या कारवाई संबंधी माहिती पुरविण्याबाबत. माझे आपल्या कार्यालयाला दिलेले अर्ज दिनांक ५.१.२००७ व ११.५.२००७ ला विनामंजूरीचे केलेले बांधकाम बाबत. मी विकत घेतलेल्या श्री संजय कृष्णाजी राऊत यांनीच त्या जागेवरती आपले बांधकाम करुन पुर्ण केले असता नगर परिषदेकडे तक्रार केली असता त्यावरती दिनांक २६.१.२००७ व दिनांक १२.३.२००७ ला नोटीस पाठविण्यात आल्यामुळे अंतिम नोटीस दिनांक ५.५.२००७ ला पाठविण्यात आले. व त्यांची मुदत (दिलेली संधी) संपलेली आहे. तरी आपण गैरअर्जदार श्री संजय कृष्णाजी राऊत यांच्याकरीता कोणती कार्यवाही करण्यात आली, त्या बाबतची माहिती मला पुरविण्यात यावी."

३. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकता यांना दिनांक ३१.५.२००७ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ८.८.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १४.९.२००७ रोजी देण्यात आला असून माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात आलेले दिसून येते. व त्यामुळेही समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. द्वितीय अपील मेमोमध्ये अवैद्य बांधकाम काढण्याविषयी माहिती, तसेच नगर परिषदेने तक्रार केल्यापासून अजून पर्यंत योग्य ती कार्यवाही न करता केलेले अवैद्य बांधकाम काढण्यात आले नाही, अशा प्रकारची विनंती केलेली दिसून येते.

४. अपीलकर्ता यांना दिनांक ३१.५.२००७ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली असली तरी त्यांनी युक्तिवाद करताना अवैद्य बांधकामावर संपूर्ण कार्यवाही व्हावी, अशी त्यांची अपेक्षा दिसून येते व तसे त्यांनी प्रथम अपीलात सुध्दा नगर परिषद पवनी कडून अतिक्रमण हटविण्याबाबत कार्यवाहीला विलंब करण्याची कारणे दिलेली आहे. व त्यामुळे प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये अपीलार्थी यांनी, श्री संजय कृष्णाजी राऊत यांनी अवैद्य बांधकाम केले आहे, ते पाडणे ही कार्यवाही अभिप्रेत आहे. परंतु, माहितीच्या अधिकारा मध्ये कार्यवाही करता येत नसून मागणी केलेली माहिती पुरविणे हे आहे. कार्यवाही करण्याच्या संदर्भात कोणतेही आदेश देण्याची तरतूद नाही. व माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपील खारीज करण्याचा दिलेला निर्णय हा योग्य दिसून येतो व त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे व अवैद्य बांधकाम काढून टाकण्याच्या संदर्भात कार्यवाहीचे आदेश करण्याची विनंती मान्य करता येत नसल्यामुळे अपीलकर्ता यांचे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २९.१.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर/अमरावती यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २५१०/२००७**

**१) श्री राम लोखंडे,**
**द्वारा- दै. "नयाखून",**
**मोक्ष धाम रोड, कॅाटन मार्केट, नागपूर-४४००१८. अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी,**
**विभागीय समाज कल्याण, जाती प्रमाणपत्र पडताळणी विभाग,**
**सदर, नागपूर. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा**
**विभागीय समाज कल्याण, जाती प्रमाणपत्र पडताळणी विभाग,**
**सदर, नागपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २९.१.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २३.१०.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २९.१.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांना माहिती दिलेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना माहिती दिलेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर**
**दिनांक २९.१.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर/अमरावती यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २५१२/२००७**

**१) श्री राधाकिसन राघोजी चुटे,**
**मु.पो. बनिया मोहल्ला, वार्ड नं.१, आमगांव,**
**ता. आमगांव, जिल्हा गोंदिया. ..अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी,**
**पंचायत समिती, आमगांव, ता. आमगांव, जिल्हा गोंदिया. ..उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी, खंड विकास अधिकारी कार्यालय,**
**पंचायत समिती, आमगांव, ता. आमगांव, जिल्हा गोंदिया. ..उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३०.१.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.१०.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३०.१.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत. त्यांचे म्हणणे एकूण घेतले.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १८.६.२००७ रोजी माहिती अधिकारी, पंचायत समिती, आमगांव यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

**आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल** : "आपल्या पं.स.बांधकाम विभागा अंतर्गत केलेल्या संपूर्ण कामाची माहिती २००१ पासून ३१ मार्च, २००६ पर्यंत झालेल्या कामांची सविस्तर माहिती देण्यात यावी. (१) उपरोक्त कार्यालया अंतर्गत रेगुलर व रो.ह.यो. नवीन कच्चे रस्ते, रस्ते दुरुस्ती, इमारत बांधकाम, लहान मोठे सि.डी. वर्कचे बांधकाम इत्यादि केलेल्या सर्व कामाची सविस्तर माहिती तसेच संबंधीत कामाकरीता शासनाकडून किती निधी मिळाली व किती खर्च झाली. केलेल्या सर्व कामाचा मस्टर व मोजमाप पुस्तीकाची सत्यप्रत देण्यात यावी. तसेच या सर्व कामाची ग्राम पंचायत प्रमाणे कोणकोणत्या अभियंत्यांनी कामाची पाहाणी केली त्यांचे संपूर्ण नांव देण्यात यावे."

३. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ५.७.२००७ रोजी, अपीलकर्ता यांनी सन २००१ पासून मार्च, २००७ पर्यंत कोणती नेमकी माहिती मागितली आहे हे सविस्तररित्या कळून येत नाही, व त्यामुळे दिनांक ७.७.२००७ ला सकाळी ११.३० वाजता चर्चा करण्या करीता प्रत्यक्ष व्यक्तीशः हजर राहावे जेणेकरुन आपणास माहिती उपलब्ध करुन देण्यास सुलभ होईल, असे कळविण्यात आलेले दिसून येते. परंतु, अपीलकर्ता यांनी दिनांक २३.७.२००७ रोजी अपीलीय अधिकारी यांचेकडे आदेश मिळाले नाही म्हणून प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते.

४. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांच्या अपीलाच्या सुनावणीकरीता अपीलकर्ता यांना पत्र दिलेले दिसून येते. व त्यात माहिती खूपच जास्त असल्यामुळे जवळपास २६०० एवढया प्रती देणे शक्य नाही. त्यामुळे दिनांक २७.८.२००७ ला कार्यालयात येवून माहिती बघून घ्यावी व जी माहिती आवश्यक वाटते फक्त त्याच्या प्रती आपणास झेरॉक्स करुन देण्यात येईल, असे कळविलेले दिसून येते. त्यावर अपीलकर्ता यांनी दिनांक २७.८.२००७ रोजी संपूर्ण माहिती देण्यात यावी, असे कळविलेले दिसून येते. पुन्हा दिनांक ७.९.२००७ रोजी अपीलकर्ता यांना पत्र दिलेले दिसून येते. त्यावर पुन्हा दिनांक १०.९.२००७ रोजी अपीलकर्ता यांनी हरकत घेतलेली दिसून येते. अपीलकर्ता यांनी अर्जाच्या सोबत दारिद्रय रेषेचे प्रमाणपत्र दाखल केलेले दिसून येते. ते दिनांक २४.४.२००७ रोजीचे ग्राम विकास अधिकारी यांनी दिलेले दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता हे एकुण ६ वर्षाची मोघम माहिती मागत आहे, असे दिसून येते.

५. वास्तविक, अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, त्यांनी अतिशय व्यापक प्रमाणात व मोघम, कोणत्याही प्रकल्पाचे/योजनेचे नांव न देता संपुर्ण बांधकाम विभागात झालेल्या बांधकामाची माहिती मागितलेली दिसून येते. दारिद्रय रेषेखालील असल्यामुळे त्या संबंधात खर्चाची आकारणी करता येत नाही. परंतु, अशा प्रकारची मोघम व मोठया प्रमाणात मागितलेली माहिती उपलब्ध करुन दिल्यास त्याबाबत निधीचा प्रश्न उपस्थित होतो. तसेच सदरची माहिती संकलीत करण्याकरीता सार्वजनिक प्राधिकरणाची यंत्रणा ही प्रमाणाबाहेर सुध्दा वळवावी लागते. व यात कोणत्याही प्रकारचे व्यापक जन हित आहे, असे दिसून येत नाही. आयोगापुढे अपीलकर्ता यांनी खर्चाचा भरणा करायला तयार आहे असेही

सांगितले. यावरुन अपीलकर्ता यांचे दारिद्रय रेषेचे प्रमाणपत्र याबाबत चौकशी करणे क्रमप्राप्त आहे व तशी खंड विकास अधिकारी यांनी चौकशी करुन दारिद्रय रेषेखाली प्रमाणपत्राबाबत निर्णय करावा.

६. अपीलकर्ता यांना जन माहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहिती प्रत्यक्ष पाहाणी करुन आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन देण्याची तयारी दाखविली असल्यामुळे माहिती देण्यासाठी टाळाटाळ करीत आहे, असा निष्कर्ष काढता येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात जावून त्या संबंधीत माहितीच्या कागदपत्रांचे निरीक्षण करुन, त्यातून आवश्यक असलेल्या कागदपत्राच्या छायांकित प्रती त्यांना उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात जावून मागितलेल्या माहितीच्या संदर्भातील अभिलेख्यांची पाहाणी करावी व सदरची पाहाणी सुरु असतांना कार्यालयातील जबाबदार कर्मचारी उपस्थित राहील व अपीलकर्ता यांनी आवश्यक त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती मागितल्यास त्या त्यांना उपलब्ध करुन देण्यात याव्या व त्याबाबतची पोच घेण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ३०.१.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर/अमरावती यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**
**अपील क्रमांक २५०९/२००७**

**१) श्री निशांत लक्ष्मणराव पापडकर,**
**डॉ. अप्पलवार यांच्या दवाखान्यामागे,**
**धानोरा रोड, गडचिरोली. ..अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा सचिव,**
**शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, गडचिरोली. ..उत्तरवादी**
**३) जन माहिती अधिकारी,**
**शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, गडचिरोली. ..उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३०.१.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २३.१०.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३०.१.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी त्यांचे पत्र दिनांक ३०.१.२००९ अन्वये "अपीलाच्या अनुषंगाने मला जन माहिती अधिकारी यांचेकडून संपूर्ण माहिती प्राप्त झालेली आहे. माझी अपीलाच्या अनुषंगाने कोणतीही तक्रार राहीली नाही. करीता मी माझे अपील क्रं.२५०९/२००७ मागे घेत आहे. कृपया खारिज करण्यात यावी, ही नम्र विनंती," असे आयोगास लेखी दिल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ३०.१.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

January,०९HGBalki

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २५२२/२००७**

**१) श्री ओमप्रकाश मदनमोहन चांडक,**
**चार्टड अकाऊंटंट, एसएस २०३, दुसराा मजला**
**स्वामी समर्थ कॅाम्प्लेक्स, बाजार रोड, गोकुळपेठ, नागपूर. ..अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अपर आयुक्त व विशेष निबंधक,**
**सहकारी संस्था, सेंट्रल बिल्डींग, रेल्वे स्टेशन जवळ, पुणे. ..उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी, सहकार निबंधक कार्यालय,**
**सेंट्रल बिल्डींग, रेल्वे स्टेशन जवळ, पुणे. ..उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३०.१.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १७.१०.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३०.१.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहेत. उत्तरवादी यांचे वतीने श्री डी.एल. सिडाम, विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ९.७.२००७ रोजी जन माहिती अधिकारी म्हणून सहकार आयुक्त यांचे कार्यालयात खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती स्पिड पोस्टाने घेणार असे नमूद केलेले आहे.

आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल : "Enquiry Report of Samta Sahakari Bank Limited, Nagpur. Detailed Enquiry Report alongwith all lthe enclosures and annexures of Samata Sahakari Bank Limited, Nagpur conducted by Shri Surendra Duragkar (C.A.) under Section ८३ of the Maharashtra Co-operative Societies Act, १९६०."

३. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २७.७.२००७ रोजी समता सहकारी संस्था मर्यादित, नागपूर यांना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम

८८ अन्वये चौकशी सुरु असल्यामुळे आपणास अहवाल प्राप्त करुन देता येणार नाही, असे कळविण्यात आलेले आहे. त्यानंतर अपीलकर्ता यांनी व्यथित होऊन दिनांक २४.८.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २०.९.२००७ रोजी अपीलकर्ता यांना कळविण्यात आलेला आहे. प्रथम अपीलाच्या निर्णयाच्या विरुध्द अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

४. जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देताना चौकशी सुरु आहे व म्हणून माहिती उपलब्ध करुन देता येत नाही, हा दिला निर्णय योग्य दिसून येतो. मात्र चौकशी संपल्यानंतर मागितलेली माहिती विहित शुल्क प्राप्त करुन घेऊन, उपलब्ध करुन देण्यात यावी, असे आदेश प्रथम अपीलामध्ये दिलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या आदेशाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी कोणत्याही प्रकारचा शुल्काचा भरणा केलेला नाही असे दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देता आली नाही असा प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या खुलाशात म्हटलेले असून माहिती शुल्क भरल्यास माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल, असे दिलेले आहे. व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांनी अपीलाच्या निर्णयानंतर माहिती करीता विहित अतिरिक्त शुल्काचा भरणा केलेला नसल्यामुळे माहिती उपलब्ध करुन दिली नाही, हा खुलासा ग्राहय असून सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ३०.१.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर/अमरावती यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २५२९/२००७**

**१) श्री मारोतराव विश्वनाथराव मोते,**
**महालक्ष्मीनगर नं.१, प्लॅाट नं.२१,**
**मानेवाडा रोड, नागपूर शहर.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त,**
**परिमंडळ क्रं.२, नागपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,**
**पांचपावली विभाग, नागपूर शहर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३०.१.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १.१०.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३०.१.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत. त्यांचे म्हणणे एकूण घेतले.

**२.** अपीलकर्ता यांनी दिनांक २६.७.२००७ रोजी शासकिय माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, पाचपावली यांचेकडे खालीलप्रमाणे ३ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे.

**आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन** : (१) "तत्कालीन सहा.पो.आयुक्त, पांचपावली विभाग श्री गोरे हयांच्या दिनांक २०.१.२००६ ते १०.३.२००६ च्या आठवडी डायरीच्या सत्यप्रती मिळणेस विनंती आहे. (२) तत्कालीन स.पो.आयुक्त, पांचपावली श्री गोरे हे ७.३.२००६ रोजी अथवा त्याचे आसपास E.L. रजेवर रवाना झाले होते. त्यांची E.L. रजेवर रवाना होण्याची व परत येण्याची तारीख व वेळ हयाची माहिती मिळणेस विनंती आहे. (३) दुय्यम पोलीस निरीक्षक, श्री एस.जे. पाली, पो.स्टे. पांचपावली हयांच्या दिनांक १.१.०६ ते २५.२.०६ च्या आठवडा डायरीच्या सत्यप्रती पुरविणेस विनंती आहे."

**३.** सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दिनांक ९.८.२००७ रोजी विहित मुदतीत अपीलकर्ता यांना तीन मुद्यांच्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन देण्यात आली आहे. परंतु, मुद्या क्रं. १ च्या संदर्भात अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळै त्यांनी दिनांक १३.८.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दिनांक २५.७.२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांनी जो निर्णय दिला होता तो कायम करण्यात आलेला दिसून येतो. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

**४.** अपीलाच्या सुनावणीच्या सुरुवातीलाच अपीलकर्ता यांनी मुद्या क्रमांक १ मध्ये मागितलेली आडवठी डायरीची प्रत त्यांना उपलब्ध झाली नसल्यामुळे ती त्यांना उपलब्ध करुन देण्यात यावी, अशी त्यांनी विनंती केली. परंतु, जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, सदरच्या डायरीमध्ये मोका या गंभिर गुन्याच्या तपासची नोंद सुध्दा असल्यामुळे सदरची डायरीची सत्यप्रत उपलब्ध करुन देता येत नाही. त्यानंतर अपीलकर्ता यांनी आठवडी डायरीच्या बाबत खुलासा करताना असे सांगितले की, गुन्हयाचा तपास करताना अधिका-यांच्या वैयक्तिक नोंदी तपास केल्याच्या तारखेच्या व वेळेच्या त्यात असतात. त्यात कोणत्याही प्रकारचा गुन्हयाच्या संदर्भातील तपशिल नसतो व त्यामुळे सदरची आठवडी डायरीची प्रत उपलब्ध करुन दिल्यास कोणत्याही प्रकारे मोका गुन्हयातील तपासाची माहिती प्रकट होईल असे नाही. जन माहिती अधाकारी यांनी असे सांगितले की, सदरची डायरी ही अधिका-याची वैयक्तिक डायरी असल्यामुळे तत्कालीन सहा. पोलीस आयुक्त, श्री गोरे यांनी त्यांची बदली झाल्यावर स्वतः घेवून गेली असावी असा त्यांचा अंदाज आहे. परंतु अधिका-यांची वैयक्तिक डायरी जर असेल तर त्या डायरीतील नोंदीच्या संदर्भामध्ये वरिष्ठ अधिका-यांकडे प्रत्येक वेळेस प्रत पाठविली जाते व याचा अर्थ, गुन्हयाच्या तपासाशी त्या डायरीचा संबंध असेल तर ती वैयक्तिक डायरी होऊ शकत नाही. व ती तशी तत्कालीन जन माहिती अधिकारी हे घेवून जावू शकत नाही, असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. व त्याकरीता सदरच्या डायरीचा शोध घेवून अपीलकर्ता यांना त्या डायरीतील दिनांक २०.१.२००६ ते १०.३.२००६ च्या आठवडी डायरीच्या सत्यप्रती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील व ती उपलब्ध न झाल्यास तत्कालीन सहाय्यक पोलीस आयुक्त,

श्री गोरे यांना त्याबाबत विचारणा करणे आवश्यक राहील. व त्यांना विचारणा केल्यानंतर माहिती उपलब्ध करुन घेऊन देणे आवश्यक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून त्यांच्या दिनांक २६.७.२००७ च्या अर्जातील मुद्या क्रमांक १ च्या संदर्भातील माहिती हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आंत त्यांना व्यक्तीशः उपलब्ध करुन देण्यात यावी. त्याकरीता सदरच्या डायरीचा शोध घ्यावा. तसेच तत्कालीन सहाय्यक पोलीस आयुक्त श्री गोरे यांना त्याबाबत विचारणा करण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ३०.१.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २५७०/२००७**

**१) श्री नाना माणिकरावजी बावणे,**
**मु.पो.ता. पारशिवनी, जिल्हा नागपूर. — अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**सहा. जिल्हा निबंधक(वर्ग-१, निम्न श्रेणी) — उत्तरवादी**
**शंकरनगर चौक, प्लॅाट नं.८९, श्री जुनघरे यांचे घर**
**नागपूर.**

**३) जन माहिती अधिकारी तथा दुय्यम निबंधक, कामठी**
**तहसिल कार्यालय परिसर, कामठी, जिल्हा नागपूर. — उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३१.१.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १२.११.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३१.१.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत. त्यांचे म्हणणे एकूण घेतले.

**२.** अपीलकर्ता यांनी दिनांक १०.९.२००७ रोजी जन माहिती अधिकारी तथा दुय्यम निबंधक तथा विवाह नोंदणी निबंधक, कामठी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती स्वत: व्यक्तीश: घेणार असे नमूद केलेले दिसून येते.

**पाहिजे असलेल्या माहितीचे वर्णन** : "(१)उपरोक्त कालावधीत झालेल्या पॅावर ऑफ अटर्नी नोंदणीबाबत दिनांकासह (२) श्री कैलास आनंदराव मरसकोल्हे रा. पेठ जिल्हा नागपूर यांनी पॅावर ऑफ अटर्नी दिली असल्यास त्या नोंदणी संबंधीत झालेल्या कार्यवाही (नोंदणी)चे संपूर्ण दस्तऐवजांची प्रत मिळणेबाबत."

**३.** सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २५.९.२००७ रोजी शासकिय माहिती अधिकारी यांनी, नोंदणी अधिनियम, १९०८ चे कलम ५७(३) अन्वये आपण मागितलेली माहिती बुक ४ (आम मुखत्यारपत्र) चे संदर्भात असल्यामुळे दस्तऐवजाची माहिती संबंधीत दस्तऐवजाचे निष्पादन करणा-या किंवा दस्तऐवज लिहून देणार व ज्यांना आममुखत्यार पत्रान्वये

अधिकार दिलेले आहे त्यांनाच देण्याचा कायद्यात तरतूद आहे. त्यामुळे आपणास विनंती करुन कळविण्यात येते की, कायद्यातील तरतुदी नुसार संबंधीता मार्फत विहित नमुन्यात अर्ज करुन शोध/नकल संबंधीत दस्ताची प्रत मिळण्याबाबत पुढील कार्यवाही करण्याचे करावे, असे कळविलेले दिसून येते. सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २९.९.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते.

**४.** प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांना सुनावणी करीता दिनांक २५.१०.२००७, २६.१०.२००७ व ३.११.२००७ रोजी पत्र देण्यात आलेले दिसून येतात. परंतु, अपीलकर्ता हजर न झाल्यामुळे अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

**५.** प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांचेकडून वस्तुस्थिती जाणून घेतल्याशिवाय निर्णय देणे शक्य नव्हते व अपीलकर्ता हजर झाले नाही म्हणून प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आलेला नाही. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, ज्या कैलास आनंदराव मरसकोल्हे यांच्या नांवाने पॉवर ऑफ अटर्नी करुन दिलेले आहे, ते त्यांना करुन दिलेले नसल्यामुळे व ते श्री बंडू धर्मसिंग लांजेवार यांनी श्री मरसकोल्हे यांचे नांवे करुन दिलेले असल्यामुळे सदरची माहिती ही मागण्यात आलेली होती. जी शेत जमीन विकण्यात आलेली होती, ती कैलास आनंदराव मरसकोल्हे यांची आहे व ते स्वतः आहे असे भासवून त्यांच्या नांवाने खोटी सही व अंगठा तसेच कबुली जबाब देवून व पॉवर ऑफ अटर्नी करुन शेत जमीनीची नोंद करण्यात आलेली असल्यामुळे सदरची माहिती त्यांनी मागितली होती. तत्कालीन जन माहिती अधिकारी आज उपस्थित नाही. परंतु, सदरची बाब ही त्यावेळेस जन माहिती अधिकारी यांना माहित नसल्यामुळे त्यांनी संबंधीत कायद्याच्या तरतुदींची माहिती दिलेली दिसून येते. मात्र, दुय्यम निबंधक यांनी अपीलकर्ता यांच्या कडून माहिती झाली असावी व त्यानंतर दिनांक ८.११.२००७ रोजी पोलीस निरीक्षक, कामठी यांचेकडे घडलेल्या प्रकरणाच्या संदर्भात तक्रार नोंदविलेली दिसून येते. परंतु, सदरच्या तक्रारी संदर्भात पुढील कार्यवाही अवगत झालेली दिसून येत नाही. मात्र, अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, संबंधीत नोंद ही रद्द करण्यात आलेली असून तशा प्रकारचे घोषणापत्र सुध्दा जाहिर झालेले आहे. असे असेल तर अपीलकर्ता

यांना मागितलेली माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. तत्कालीन दुय्यम निबंधक यांनी नोंद, अधिनियमाच्या तरतुदींच्या जरी आधारे घेतली असली तरी सदर प्रकरणातील संपूर्ण वस्तुस्थिती ही उघड झालेली असल्यामुळे अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक १०.९.२००७ च्या अर्जातील दोनही मुद्यांमध्ये मागितलेल्या दस्तऐवजाच्या छायांकित प्रती व्यक्तीशः विना मुल्य उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून त्यांच्या दिनांक १०.९.२००७ च्या अर्जातील मागितलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांच्या आंत व्यक्तीशः उपलब्ध करुन द्याव्या व पोच घ्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ३१.१.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २५६८/२००७**

**१) श्री डॅा. अशोक भाऊराव जाधव,**
**७०२, विक्रांत, आठ रस्ता चौक, लक्ष्मीनगर,**
**नागपूर.** **अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अति. उपायुक्त (II),**
**महानगर पालिका, नागपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक,**
**अतिक्रमण विभाग, महानगर पालिका,**
**महात्मा फुले मार्केअ** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३१.१.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २६.११.२००७रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३१.१.२००७ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. जन माहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कागदपत्रे दाखल केली आहेत. त्यांचे म्हणणे एकूण घेतले.

**२.** अपीलकर्ता यांनी दिनांक २७.५.२००७ रोजी राज्य जन माहिती अधिकारी, अतिक्रमण विभाग, कॅाटन मार्केट म्युनिसिपल कॅार्पोरेशन, नागपूर यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे.

**माहितीचे वर्णन** : "Vikram Flat system situated on plot no.VI of Scientific Society, Aath rasta Chowk Laxmi Nagar is purely a residential complex. Inspite of this, it is encroached by commercial activities. I have already complained to Municipal Corporation, Laxmi Nagar Zone on ५.१.२००७ but till date no action is initiated. Encroachment Officer Mr. Patil had been here with police force but still after months commercial activities are being on. I would like to know why there is inaction by Nagpur Municipal

Corporation in evacuating commercial encroachers whose presence is illegal."

**३.** सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १९.१०.२००७ रोजी प्रवर्तन अधीक्षक, महानगरपालिका, नागपूर यांनी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २४.१०.२००७ रोजी प्रथम अपील अतिरिक्त उपआयुक्त यांचेकडे दाखल केलेले दिसून येते. अति. उपआयुक्त यांनी दिनांक २४.१०.२००७ रोजी अपीलाच्या सुनावणीच्या संदर्भात दिनांक २.११.२००७ रोजी उपस्थित राहावे म्हणून नोटीस काढण्यात आलेली दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २५.१.२००८ रोजी दिलेला असून अपीलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे उपस्थितीत चर्चेअंती प्रकरण निकाली काढण्यात आले आहे, असा निर्णय दिलेला आहे. तसेच सहआयुक्त व सहाय्यक माहिती अधिकारी लक्ष्मीनगर झोन यांना आदेशीत करुन अपीलार्थी यांना सुनावणी देवून त्यांचे समाधान करावे, असे आदेश दिलेले दिसून येतात. परंतु, अपीलकर्त्यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. द्वितीय अपील मेमो सोबत अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलाचा निर्णय दाखल केला नाही.

**४.** अपीलाच्या सुनावणीस अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, उपलब्ध करुन दिलेली माहिती ही चुकीची आहे व त्यात कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्यात आलेली नाही. परंतु, अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे, त्या माहितीच्या अर्जामध्ये माहिती अधिकारी, अतिक्रमण विभाग, अशी मागितली असल्यामुळे अतिक्रमण विभागाने केलेल्या कार्यवाहीची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. अपीलकर्ता यांनी असेही सांगितले की, त्यांनी मुळ तक्रार लक्ष्मीनगर झोन यांचेकडे केली आहे व त्यामुळे त्यांनी त्यासंदर्भामध्ये माहिती लक्ष्मीनगर झोन याचे माहिती अधिकारी यांचेकडें मागणी करणे आवश्यक होते. अतिक्रमण विभागाचे माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यांना लक्ष्मीनगर झोनकडून जे आदेश प्राप्त झाले त्या आदेशाप्रमाणे त्यांनी कार्यवाही केली. अतिक्रमण पथक असल्यामुळे त्यांना अतिक्रमणाच्या प्रकरणाशिवाय कोणत्याही प्रकारचे अधिकार नसतात व नाही. त्यामुळे वस्तुस्थिती अपीलकर्ता

यांना कळविण्यात आली आहे. व अपीलकर्ता यांची तक्रार अतिक्रमणाची नसून वापर बध्दलची दिसून येते. पण त्यास ते अतिक्रमण असे समजत असल्याने अतिक्रमण पथकास पाठविण्यात आलेले होते. प्रथम अपीलाच्या सुनावणीत अपीलकर्ता यांचेशी चर्चा झालेली दिसून येते व त्यातही त्यांना वस्तुस्थिती ही अवगत केलेली दिसून येते. परंतु त्यामुळेही त्यांचे समाधान झालेले दिसून येत नाही. थोडक्यात, निवासी वापराचे व्यापारी वापरात बदल करण्यात आलेला आहे, असे त्यांच्या युक्तिवादावरुन दिसून येते व त्याकरीता नगर रचना शाखेकडे याबध्दलच्या संपूर्ण कार्यवाहीची माहिती मागणे आवश्यक असते व तशी ती माहिती त्यांना त्या विभागाकडून उपलब्ध होऊ शकेल. परंतु अपीलकर्ता यांची कारवाईची अपेक्षा दिसून येते, ती अधिनियमाचे तरतुदीप्रमाणे नाही. व त्याप्रमाणे प्रथम अपीलात सुध्दा सहाय्यक आयुक्त व सहाय्यक माहिती अधिकारी, लक्ष्मीनगर झोन यांना माहिती उपलब्ध करुन देण्यास आदेशित केलेले दिसून येते. यावरुन प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा योग्य आहे असे दिसून येते. कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणामध्ये प्रशासनिक कार्यपध्दतीचे खाते वाटप विषयानुसार करण्यात आलेले असते व त्या खातेवाटपानुसार माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ५ प्रमाणे माहिती अधिकारी नियुक्त करण्यात यावी अशी तरतूद आहे जेणेकरुन माहिती योग्य व तीस दिवसात उपलब्ध होऊ शकेले. त्यामुळे अपेक्षित माहिती ज्या विभागाकडे असेल किंवा शाखेकडे असेल त्या विभागाचे किंवा शाखेचे माहिती अधिकारी यांना माहिती मागणे अपेक्षित आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांना दिनांक १९.१०.२००७ रोजी प्रवर्तन अधीक्षक यांनी दिलेली माहिती योग्य असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २७.५.२००७ च्या अर्जाप्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ३१.१.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

January,०९Balki

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २१९४/२००७**

**१) श्री उत्तम गंगाधरराव खापेकर,**
**जूनी मंगळवारी, जगन्नाथ स्वामी मंदीराजवळ,**
**रेड क्रॉस दवाखाना, पो. लकडगंज, नागपूर-८. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अति. उपायुक्त-१,**
**महानगरपालिका, नागपूर. उत्तरवादी**
**३) जन माहिती अधिकारी तथा निगम अधीक्षक**
**महानगरपालिका, नागपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३१.१.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३.८.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३१.१.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत. त्यांचे म्हणणे एकूण घेतले.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ९.५.२००७ रोजी जन माहिती अधिकारी म्हणून अधीक्षक, महानगरपालिका यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

आवश्यक माहितीचा तपशिल : (१) "केस नं.५९६/९० दि.११.१०.९० प्रमाणे ऑर्डर दिले. पण मला पगाराची वेतन श्रेणी दिली नाही. जुना वेतन श्रेणी ९५-१३० (१९७४ मधील आणि सुधारीत वेतन श्रेणी ८२५-१२५० आहे. यासंबंधात मी वेळोवेळी पत्रव्यवहार केला परंतु कार्यालयाचे कोणतीही अद्यापपावेतो कार्यवाही केलेली नाही. (२) यामधील बकाया अंकात देण्यात आला तसेच बोनससंबंधी रक्कम व सुधारीत वेतनचा बकाया देण्यात आला नाही. तरी कृपया बोनस व सुधारीत वेतनाचा बकाया देण्यात यावा. (३) अवमान याचिका न्यायालयात दाखल केली. त्यात महानगर पालिकेने निर्णया प्रमाणे बकाया देण्यांचे मान्य केले. (४) मला माझ्या ज्या कामाकरीता नियुक्ती (मुळपद) करण्यात आली त्याप्रमाणे काम देण्यात येत नाही. मला जबरीने माझ्या कामाव्यतिरिक्त दूसरेच काम देण्यात येते, जो नियमाच्या विपरीत आहे. (५) मागील चार महिन्याचा पगार देण्यात आला नाही. अशा त-हेने अधिकारी वर्ग मला त्रास देत आहेत. (६)

सहा वर्षापासून माझी सलेन्डर सुटटी का नाकारण्यात येत आहे. (७) सतरा वर्षापासून इन्क्रीमेन्ट का रोखण्यात आले याचा खुलासा अजून पर्यंत करण्यात आला नाही. (८) सतरा वर्षापासून थकीत इन्क्रीमेन्टचा बकाया देण्यात यावे. (९) बारा वर्षाचे बढत का रोखण्यात आली व त्याचा बकाया सुध्दा मला मिळालेला नाही."

**३.** सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १४.६.२००७ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. सदरच्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक ११.६.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १२.७.२००७ रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांना दिनांक १२.७.२००७ रोजी कळविण्यात आलेला आहे. व त्यामुळेही समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

**४.** अपीलकर्ता यांनी महापौरांना दिलेल्या पत्राच्या संदर्भामध्ये ९ मुद्यांवर माहिती मागितलेली होती. त्या माहितीमध्ये वेतन श्रेणी चुकीची आहे अशा प्रकारचे प्रतिपादन केले आहे. तसेच औद्योगिक न्यायालयाने त्यांना उच्च वेतन श्रेणी दिलेली आहे व त्या उच्च वेतन श्रेणी प्रमाणे त्यांना वेतन श्रेणी दिलेली नाही, असे त्यांचे म्हणणे आहे. त्याकरीता औद्योगिक न्यायालयाने दिलेल्या उच्च वेतन श्रेणीचा निर्णय हा अपीलकर्ता यांनी आयोगाचे निदर्शनास आणला. परंतु, संपूर्ण निर्णयाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपीलकर्ता हे मुळ ज्या मजदूर पदावर होते त्या मजदूर पदावरुन त्यांची बदली शववाहन कुली म्हणून करण्यात आली होती. परंतु, औद्योगिक न्यायालयाने शववाहिका कुली या पदावर देणे अवमानकारक होईल या कारणाकरीता पुन्हा मजदूर पदावर त्यांची नियुक्ती करावी, असे आदेश दिल्यामुळे त्यांची नियुक्ती ही मजदूर पदावर दिलेली होती. अपीलकर्ता यांचा समज वेतन श्रेणी होती, असा दिसून येतो व तसे त्यांनी औद्योगिक न्यायालयात सुध्दा सांगितले होते. परंतु, त्यांचे सेवा पुस्तक जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगाचे निदर्शनास आणले व त्यात १९७४ ला त्यांची नियुक्ती मजदूर या पदावर रुपये ७५-१०० या वेतन श्रेणीत
झाल्याचे दिसून येते. व त्यामुळेच शववाहिका कुली मधून मजदूर पदावर आल्यावर सुध्दा त्यांना मुळचीच वेतन श्रेणी रुपये ७५-१०० ही देय होती, हे सिध्द होते. व त्यामुळे त्यांना उपलब्ध

करुन दिलेली माहिती योग्य आहे असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा जन माहिती अधिकारी यांचा निर्णय कायम केलेला असल्यामुळे व तो योग्य असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ३१.१.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**